इचलकरंजी R.N.I. Regi. No. 63119/94 ■ पोस्टल रजि.नं. KLR/78/2024-2026 ■ अंक - ४४ ■ वर्ष - ४२

राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

# महासत्ता

कोल्हापूर - सांगली - सातारा - बेळगांव




रविवार,ता. १४ जून २०२६ | अधिक ज्येष्ठ कृष्ण १४ | www.emahasatta.com | E-mail : mahasatta@gmail.com | पाने १२+४=१६ | किंमत ₹ ५.००

# अमेरिका-इराण शांतता कराराबाबत संभ्रम कायम

## पाकच्या मध्यस्थीला मर्यादा ; तणाव निवळण्याची शक्यता



तेहरान/वॉशिंग्टन,ता.१३-

**अमेरिका आणि इराण यांच्यातील प्रस्तावित शांतता करारावर रविवारी स्वाक्षरी होणार नाही, असे इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते इस्माईल बघाई यांनी स्पष्ट केले आहे. कराराची शक्यता भविष्यात असली तरी अद्याप कोणतीही निश्चित तारीख ठरलेली नसल्याचे त्यांनी सांगितले.**

बघाई यांच्या मते, पाकिस्तानच्या मध्यस्थीने सुरू असलेल्या चर्चेचा मुख्य उद्देश केवळ युद्धविराम साधणे हा आहे. या टप्प्यावर अणु कार्यक्रमासंदर्भातील मुद्द्यांवर चर्चा होणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. अमेरिकेची भूमिका सतत बदलत असल्याने या प्रक्रियेकडे सावधपणे पाहणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.दरम्यान,

◄ पान २ वर

### जागतिक बाजारात अस्थिरता

फेब्रुवारीच्या अखेरीस अमेरिका आणि इस्रायलने केलेल्या लष्करी हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून इराणने होर्मुझच्या सामुद्रधुनीतील जलवाहतुकीवर निर्बंध घातल्यावर तणाव वाढला. या निर्णयामुळे जागतिक ऊर्जा बाजाराला मोठा धक्का बसला, कारण जगातील सुमारे एक-पंचमांश तेल आणि एलएनजी याच मार्गातून जाते. होर्मुझच्या सामुद्रधुनीतील अडथळ्यामुळे तेलाच्या किमती वाढल्या आणि जागतिक बाजारात अनिश्चितता वाढली. दोन्ही बाजूंना हजारो जहाजे अडकून पडली, ज्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारात व्यत्यय आला आहे.

# धीरज सेठ यांची लष्करप्रमुखपदी नियुक्ती

नवी दिल्ली,ता.१३-

**केंद्र सरकारने लेफ्टनंट जनरल धीरज सेठ यांची पुढील लष्करप्रमुख म्हणून अधिकृतपणे नियुक्ती जाहीर केली आहे. संरक्षण क्षेत्रात प्रदीर्घ आणि उल्लेखनीय अनुभव असलेले लेफ्टनंट जनरल सेठ ३० जून रोजी आपल्या नवीन पदाचा कार्यभार स्वीकारतील.**



राष्ट्रपतींनी लेफ्टनंट जनरल धीरज सेठ यांच्या भारतीय लष्कराचे पुढील प्रमुख म्हणून नियुक्तीला मंजुरी दिली आहे. ते ३० जून २०२६ रोजी विद्यमान लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांची जागा घेतील आणि त्यांना जनरल हा स्थायी दर्जा मिळेल. लेफ्टनंट जनरल धीरज सेठ यांचा नव्या लष्करप्रमुखपदाचा कार्यकाळ ३१ ऑगस्ट २०२८ पर्यंत असेल.

लेफ्टनंट जनरल धीरज सेठ हे खडकवासला येथील राष्ट्रीय संरक्षण अकादमीचे माजी विद्यार्थी आहेत. डिसेंबर १९८६ मध्ये ते आर्मर्ड कॉर्प्समध्ये अधिकारी म्हणून रुजू झाले. त्यांची लष्करी कारकीर्द जवळपास चार दशकांची आहे. त्यांनी ऑपरेशनल, स्ट्रॅटेजिक आणि क्षमता विकास यासह विविध क्षेत्रांमध्ये व्यापक अनुभव मिळवला आहे. त्यांनी भारतीय लष्कराच्या लढाऊ क्षमतेत आणि दीर्घकालीन परिवर्तनात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. या अधिकाऱ्याने विविध ऑपरेशनल वातावरणात प्रत्येक स्तरावर नेतृत्व केले आहे. त्यांच्या कमांड असाइनमेंटमध्ये डेझर्ट सेक्टरमधील

◄ पान २ वर



# आसाममध्ये विमान अपघात हवाई दलाचे ५ जवान हुतात्मा

जोराहाट,ता.१३-

**आसामच्या जोरहाट येथे भारतीय हवाई दलाच्या वाहतूक विमानाचा अपघात होऊन ५ जवान हुतात्मा झाले आहेत. भारतीय हवाई दलाच्या अधिकाऱ्यांनी या मृत्यूंची पुष्टी केली आहे. हा अपघात शनिवारी जोरहाट हवाई तळावर झाला.**

प्राथमिक माहितीनुसार, हवाई दलाचे एएन-३२ हे वाहतूक विमान जोरहाट स्टेशनवर कोसळले. आदळल्यानंतर त्याला आग लागली. अपघाताच्या फोटो आणि व्हिडिओमध्ये वाहतूक विमानाचे दोन तुकडे झाल्याचे दिसत होते. आता हवाई दलाकडून अधिकृत पुष्टी मिळाल्यानंतर, या अपघातात पाच जवानांचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले आहे. हवाई दलाची आपत्कालीन प्रतिसाद पथके सध्या घटनास्थळी कार्यरत आहेत. हवाई दलाने



अपघाताचे कारण निश्चित करण्यासाठी चौकशी समितीचे आदेशही दिले आहेत. हवाई दलाने सांगितले की, आसाममधील जोरहाट हवाई तळावर एएन-३२ या वाहतूक विमानाचा अपघात होऊन पाच भारतीय हवाई दलाचे जवान शहीद झाले आहेत. सह-वैमानिक बचावले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

◄ पान २ वर

## मनोज जरांगे आज कोल्हापुरात

कोल्हापूर,ता.१३(प्रतिनिधी)-

**मराठा आरक्षण लढ्याचे नेते संघर्ष योद्धा मनोज जरांगे-पाटील रविवार, दि.१४ जून रोजी कोल्हापूर दौऱ्यावर येत आहेत. रात्री ८.३० वाजता कावळा नाका येते त्यांचे स्वागत केले जाईल.**



या दौऱ्यादरम्यान सोमवारी (दि. १५) सकाळी ते खासदार शाहू महाराज छत्रपती यांच्यासमवेत नवीन राजवाडा येथे विशेष बैठकीला उपस्थित राहणार आहेत. या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर

◄ पान २ वर

## रोहित पवारांच्या मागण्यांबाबत मंगळवारी बैठक

# चर्चेतून सकारात्मक मार्ग निघेल-ना.भरणे

मुंबई,ता.१३-

**सरसकट कर्जमाफी, साताबारा कोरा करा आदी मागण्यांसाठी राष्ट्रवादीचे (शप) आमदार रोहित पवार यांचे पंढरपूरात अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे. आंदोलनाचा आद दुसरा दिवस होता. कृषीमंत्री दत्ता भरणे यांनी त्यांना चर्चेचे निमंत्रण दिले आहे. पण जोपर्यंत मागण्यांवर विचार होत नाही, तोपर्यंत आंदोलनात माघार घेणार नसल्याचे रोहित पवार यांनी स्पष्ट केले.**



दरम्यान अन्नत्याग आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर आमदार रोहित पवार यांच्या मागण्यांची राज्य सरकारने दखल घेतल्याचे संकेत कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले आहेत. रोहित पवार यांच्याशी दोन वेळा फोनवरुन चर्चा झाल्याचे सांगत भरणे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबतही याबाबत चर्चा झाल्याची माहिती दिली. रोहित पवार यांच्या कर्जमाफी संदर्भातील मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यासाठी मंगळवारी बैठक बोलावण्यात आली असून त्यातून सकारात्मक मार्ग निघेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय घेण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचे सांगतानाच, सर्वांचे समाधान होणार नसले तरी शेतकऱ्यांसाठी मोठा निर्णय घेतल्याचे भरणे यांनी स्पष्ट केले.

दोन दिवस सुरू असलेल्या आंदोलनामुळे माझा बीपी व्यवस्थित आहे. मात्र शुगर कमी झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले असल्याचे रोहित पवार म्हणाले. कर्जमाफीतील काही जाचक अटी सरकारने घातल्यात. त्या मागे घेतल्याशिवाय आमचे अन्नत्याग आंदोलन थांबणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. कृषीमंत्री दत्ता भरणे यांनी रोहित पवार यांना चर्चेचे निमंत्रण दिले, त्यानंतर त्यांनी ही प्रतिक्रिया दिली आहे. मी सरकारला आज अल्टीमेटम देणार नाही

◄ पान २ वर

## ऑपरेशन टायगरच्या पार्श्वभूमीवर

# ठाकरे गटाच्या खासदारांची आज मातोश्रीवर बैठक

मुंबई,ता.१३-

मागील अनेक दिवसांपासून राज्यात ऑपरेशन टायगरची चर्चा आहे. शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि मंत्री संजय शिरसाट यांनी देखील अनेकदा बोलताना ऑपरेशन टायगरचा उल्लेख केला आहे. मध्यंतरी शिवसेना ठाकरे गटाचे खासदार हे एकनाथ शिंदे यांच्या संपर्कात असल्याचा दावा केला जात होता. या सर्व पार्श्वभूमीवर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी उद्या, १४ जून रोजी 'मातोश्री' निवासस्थानी खासदारांची बैठक बोलावली आहे.

◄ पान २ वर

## विमानतळावर सोन्याची तस्करी उधळली

अहमदाबाद,ता.१३-

**अहमदाबाद आंतरराष्ट्रीय विमानतळावर एक मोठी कारवाई केली आहे. दुबईहून आलेल्या इंडिगो विमानातील शौचालयातून सुमारे ४ कोटी रुपये किमतीचे बेकायदेशीर सोने जप्त करण्यात आले आहे.**

तपासणी दरम्यान, अधिकाऱ्यांना शौचालयातील स्पीकर बॉक्समध्ये काळ्या टेपने गुंडाळलेल्या दोन पिशव्या सापडल्या.

◄ पान २ वर

## विठ्ठल-रूक्मिणी मंदिर २३,२४ जूनला बंद

पंढरपूर,ता.१३-

**पंढरपूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या मूर्तीची होत असलेली झीज रोखण्यासाठी आणि मूर्तीचे दीर्घकालीन जतन व संवर्धन करण्यासाठी विशेष उपक्रम हाती घेण्यात आला आहे.**

या संवर्धन प्रक्रियेसाठी आवश्यक तांत्रिक कामे सुरक्षितपणे पार पाडता यावीत तसेच मूर्तीचे पावित्र्य आणि सुरक्षा अबाधित राखता यावी, यासाठी २३ व २४ जून रोजी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर भाविकांच्या दर्शनासाठी बंद ठेवण्यात येणार आहे. मूर्ती संवर्धनाचे काम भारतीय

◄ पान २ वर

# रोड रोलरखाली सापडून बालिकेचा दुर्दैवी मृत्यू

कोल्हापूर,ता.१३(प्रतिनिधी)-

**करवीर तालुक्यातील वरणगे पाडळी येथे गाव ते नदीकडे जाणाऱ्या रस्त्याचे काम सुरू असताना तीन वर्षांची बालिका रोड रोलरखाली चिरडल्याने तिचा जागीच मृत्यू झाला. शनिवारी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास हा प्रकार घडला. मोनिका रवी चव्हाण (रा.विजापूर,कर्नाटक) असे मृत बालिकेचे नाव आहे. मुलीच्या अपघाती मृत्यूमुळे नातेवाईकांनी केलेला आक्रोश हृदय पिळवटून टाकणारा होता.**

**वरणगे पाडळी येथील घटना**

कर्नाटकातील विजापूर येथील कामगार रस्त्याच्या कामासाठी वरणगे पाडळी गावात आले आहेत. शनिवारी दुपारी जेवण केल्यानंतर सर्व कामगार कामात व्यस्त होते. रवी चव्हाण यांची तीन वर्षांची मुलगी मोनिका ही कामाच्या ठिकाणीच खेळत होती. आई-वडील कामात असल्याने त्यांचे मुलीकडे दुर्लक्ष झाले.

◄ पान २ वर

# विलीनीकरण चर्चेला विराम

पुणे,ता.१३-

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष काँग्रेसमध्ये विलीन करण्याच्या संदर्भात काँग्रेसकडून कोणताही प्रस्ताव आला नसल्याचे खासदार आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय कार्याध्यक्ष सुप्रिया सुळे यांनी स्पष्ट केले आहे. पत्रकारांशी बोलताना त्यांनी या सर्व चर्चांना पूर्णविराम देत पक्षाच्या भूमिकेवर स्पष्टता दिली.**

**काँग्रेसकडून कोणताही प्रस्ताव नाही**



तृणमूल काँग्रेसमधील अंतर्गत फूट आणि प बंगाल विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर काही राजकीय वर्तुळात तृणमूल काँग्रेस काँग्रेसमध्ये विलीन होण्याच्या चर्चा सुरू झाल्या होत्या. त्याच पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसबाबतही अशा प्रकारच्या चर्चा रंगू लागल्या होत्या. मात्र, सुप्रिया सुळे यांनी या सर्व चर्चांना कोणताही आधार नसल्याचे सांगितले. त्यांनी स्पष्ट केले की, काँग्रेसकडून कोणताही प्रस्ताव आलेला नाही आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या अंतर्गतही विलीनीकरणाबाबत कोणतीही चर्चा झालेली नाही. 'राष्ट्रवादी काँग्रेस काँग्रेसमध्ये विलीन होणार' अशा चर्चांचा उगम नेमका कुठून झाला याची माहितीही नसल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी बोलताना त्यांनी भारतीय जनता पक्षावर फोडफोडीच्या राजकारणाचा आरोप करत जोरदार टीका केली. भाजपने आधी शिवसेना आणि नंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पाडल्याचा प्रकार घडवला असून आता तृणमूल काँग्रेसच्या बाबतीतही तेच घडत असल्याचे त्यांनी म्हटले.आम्ही कधीही पक्ष किंवा कुटुंबात फूट पाडण्याचे राजकारण केले नसल्याचा दावाही त्यांनी केला.

# भरधाव कारच्या धडकेत वृद्ध ठार; चालक फरार

## बोलवाड रस्त्यावरील दुर्घटना

मिरज,ता.१३(प्रतिनिधी)-

मिरज तालुक्यातील बोलवाड येथे रस्त्याकडेला बसलेल्या वृद्ध व्यक्तीला स्विफ्ट कारणे जोरात धडक दिल्याने सदर वृद्ध व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना घडली. घटनेची नोंद मिरज ग्रामीण पोलीस ठाण्यात झाली असून पोलिसांनी याप्रकरणी अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. अपघातानंतर वाहन चालक अपघातग्रस्त व्यक्तीस कोणतीही मदत न करता, पोलिसांना माहिती न देता घटनास्थळावरून पळून गेला आहे. मिरज ग्रामीण पोलीस वाहन चालकाचा शोध घेत आहेत.



◄ पान २ वर

| सोने प्रति तोळा | चांदी प्रति किलो |
| --- | --- |
| १४८८०० रु. | २४८५०० रु. |

अंडी ६७० रुपये शेकडा

### हास्यतुषार




# अल निनोमुळे पर्जन्यमानावर परिणाम

मुंबई,ता.१३-

**भारतीय हवामान विभागाने पॅसिफिक महासागरात अल निनो परिस्थितीची अधिकृत घोषणा केली असून, यंदाच्या नैऋत्य मान्सून हंगामात त्याचा प्रभाव मध्यम ते तीव्र स्वरूपाचा राहण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. अल निनोमुळे देशातील पर्जन्यमानावर परिणाम होण्याची शक्यता असल्याने खरीप हंगामातील पिकांबाबत चिंता वाढली आहे. दरम्यान, पावसावर प्रभाव टाकणारा आणखी एक महत्त्वाचा हवामान घटक असलेला भारतीय महासागर द्विध्रुवीयता मान्सून हंगामाच्या अखेरपर्यंत तटस्थ स्थितीत राहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.**

◄ पान २ वर



खरीप हंगामातील पिकांबाबत चिंता वाढली

### यंदा दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होणार

१८७१ ते २०२२ या १५२ वर्षांच्या कालावधीत आलेल्या १६ अल निनो वर्षांचा अभ्यास केल्यानंतर शास्त्रज्ञांनी यंदा दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली आहे. अमेरिकेतील नॅशनल ओशिएनिक अँड अ‍ॅटमॉस्फेरिक अ‍ॅडमिनिस्ट्रेशन या संस्थेने यंदा देशात पावसात मोठी घट होण्याचा अंदाज वर्तवला आहे. जून ते ऑगस्ट या कालावधीत अल निनोचा प्रभाव कायम राहणार असून, त्यामुळे मान्सूनच्या प्रमुख महिन्यांमध्ये पर्जन्यमान कमी राहू शकते, असे संस्थेचे म्हणणे आहे.

# दूधसागर नदीपात्रात बुडून चौघांचा मृत्यू

## तीन सख्ख्या भावांचा समावेश

पणजी,ता.१३-

**गोव्याच्या कुळे येथील मेटावाडा भागात पुलाजवळील दूधसागर नदीपात्रात पोहण्यासाठी उतरलेल्या वास्को परिसरातील चार युवकांचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. मृत सर्वजण १९ ते २५ वयोगटातील आहेत. मृतांमध्ये चिखली-मुरगाव येथील तीन सख्ख्या भावांचा समावेश आहे. या घटनेने परिसरावर शोककळा पसरली असून आहे.**

रामण्णा मदार, लक्ष्मण मदार, हिरण्णा मदार आणि विजय साजिली अशी मृत चारही युवकांची नावे आहेत. वास्को आणि चिखली परिसरातील पाच मित्र शनिवारची सुट्टी साजरी करण्यासाठी आणि निसर्गाचा आनंद घेण्यासाठी कुळे येथील

◄ पान २ वर

## भारतीय जहाजांवर हल्ले चिंताजनक

### भारताचा निषेध

नवी दिल्ली,ता.१३-

**भारताचे परराष्ट्र मंत्री एस.जयशंकर यांनी अमेरिकेचे परराष्ट्र सचिव मार्को रुबियो यांच्याशी फोनवर संवाद साधला आणि आखाती प्रदेशात अमेरिकन नौदलाच्या हल्ल्यात तीन भारतीय खलाशांच्या मृत्यूवर भारताचा निषेध व्यक्त केला. परराष्ट्र मंत्र्यांनी**



◄ पान २ वर

# जवाहर कारखान्याचे संचालक आण्णासो गोटखिंडे यांचे निधन

**यळगुड,ता.१३(वार्ताहर) –**
**येथील कल्लाप्पाण्णा आवाडे जवाहर सहकारी साखर कारखान्याचे जेष्ठ संचालक व माजी डे. सरपंच आण्णासो गोपाल गोटखिंडे यांचे वयाचे ७८ व्या वर्षी निधन झाले.**



यळगुड येथील सर्वसामान्य कुटुंबात जन्मलेले आण्णासो गोपाल गोटखिंडे हे १९७५ पासून आवाडे गटाचे कट्टर कार्यकर्ते म्हणून ओळखले जात होते. मा.खा.कल्लाप्पाण्णा आवाडे यांनी हुपरी-यळगुड माळावरती उभारलेल्या जवाहर साखर कारखान्याच्या उभारणीत त्यांचा सिंहाचा वाटा होता.आण्णासो गोटखिंडे हे आबा नावाने ओळखले जायचे. आवाडे गटाचे गावातील नेतृत्व म्हणून ते कार्यरत होते. यळगुड गावचे उपसरपंच म्हणूनही त्यांनी काम पाहिले आहे. आवाडे यांचेशी एकनिष्ठ राहिलेने त्यांना जवाहर सहकारी साखर कारखान्याचे संचालक, केन कमिटी चेअरमन अशा पदावरती काम करणेची संधी मिळाली.

आणासो गोटखिंडे यांनी गावात शेतकरी उद्योग समूह उभारला असून त्यामध्ये शेतकरी पतसंस्था, शेतकरी दुध संस्था, शेतकरी विकास सेवा सोसायटी या संस्थाचा समावेश असून आज त्या संस्था कार्यरत आहेत. आबांच्या निधनामुळे गावातील राजकारणात पोकळी निर्माण झाली आहे. त्यांचे निधनाची माहिती कळताच यळगूडसह परीसरात शोककळा पसरली आहे.

माजी. आ. प्रकाशराव आवाडे, उत्तम आवाडे, यळगुडचे सरपंच सुजितसिंह मोहिते, उपसरपंच, सदस्य, जवाहर कारखान्याचे संचालक व कर्मचारी, विविध संस्थांचे पदाधिकारी, शिवसेनचे नेते मुलीधर जाधव, जि.प.सदस्य शिवाजी जाधव यांनी आणासो गोटखिंडे यांचे अंतिम दर्शन घेवून श्रद्धांजली वाहिली. गावातील व्यवहार बंद ठेवून ग्रामस्थांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली. आण्णासो गोटखिंडे यांची अंतयात्रा गावभागातून काढून त्यांच्या पार्थिवावर अंतिम संस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.



# संकेश्वर पोलिसांकडून गुंडांच्या घराची झडती

**संकेश्वर,ता.१३(प्रतिनिधी)–**
**संकेश्वर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणपती कोगनोळी यांच्या नेतृत्वाखाली येथील दोघा गुंड प्रवृत्तीच्या युवकांच्या घराची भल्या पहाटे झडती घेण्यात आली.**

बेळगांव जिल्हा पोलीस प्रमुख के रामराजन यांच्या मार्गदर्शनाखाली संकेश्वर पोलीसांनी ही कारवाई केली आहे. या गुंड प्रवृत्तीच्या युवकांच्या घरी पोलीसांनी अचानक छापा घातल्याने गावात चर्चेचा विषय बनला आहे. पोलीसांनी त्या युवकांच्या घराची कसून तपासणी करून काही शस्त्रे, अवैध वस्तू हाती लागतात काय ते पाहिले.

संकेश्वर पोलीस निरीक्षक गणपती कोगनोळी यांनी त्या गुंडांना बजावले असून अवैध धंदे केल्याचे दिसून आल्यास याद राखा, असा दम भरला आहे. तुम्ही कोणताही अपराध केल्यास कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल असे त्यांनी सांगितले. पोलीस कारवाईत पोलीस उपनिरीक्षक यु.एस. शेट्टेण्णावर, पोलीस कर्मचारी यु.बी. मुर्कीभावी, एस.एल. गळतगी, दुंडप्पा करोशी सहभागी झाले होते.

## बनावट दाखले वितरीत केल्याप्रकरणी

# उपजिल्हाधिकारी, महसूल अधिकारी यांच्यावर गुन्हे

**मुंबई,ता.१३(प्रतिनिधी)–**
**पद, अधिकार तसेच कनिष्ठ महिला अधिकाऱ्याच्या डिजिटल स्वाक्षरीचा गैरवापर करत मुंबईत बनावट दाखले वितरित केल्याचा प्रकार उघडकीस आल्यामुळे, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून चार अधिकाऱ्यांच्या चौकशी पथकाद्वारे तपासणी करून पोलिसात तक्रार दाखल करण्याचे आदेश दिले.**

याप्रकरणी, मुंबई शहर सामान्य प्रशासन विभागाचे उपजिल्हाधिकारी गणेश सांगळे आणि महसूल सहायक नागनाथ लोलेवार यांच्यावर माता रमाबाई आंबेडकर मार्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाची प्राथमिक चौकशी झाल्यानंतर व्याप्ती लक्षात घेऊन तपासणी जारी राहणार असल्याने चौकशी पथक कायम राहील असे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

मुंबई शहर जिल्ह्यातील एफ/साऊथ आणि एफ/नॉर्थ विभागाचे तहसीलदार संदीप आवारी हे ८ मे २०२६ पासून रजेवर गेले होते. त्यांच्या अनुपस्थितीत या पदाचा अतिरिक्त कार्यभार तहसीलदार संकेत यमगर यांच्याकडे सोपवण्यात आला होता.

या संधीचा फायदा घेत उपजिल्हाधिकारी गणेश सांगळे यांनी नायब तहसीलदार दीपाली कुलकर्णी यांना त्यांची डिजिटल स्वाक्षरी बनवण्याचे तोंडी आदेश दिले. त्यानुसार कुलकर्णी यांनी स्वाक्षरी बनवून सांगळे यांच्याकडे सुपूर्द केली. त्यानंतर, सांगळे यांनी कुलकर्णी यांच्या संमतीशिवाय, महसूल सहायक नागनाथ लोलेवार याच्याशी संगनमत करून एफ/साऊथ आणि एफ/नॉर्थ विभागातील शेकडो प्रमाणपत्रे वितरित केली.

या संशयास्पद कारभाराचा सुगावा लागताच चार तपास पथके नेमून वितरित प्रमाणपत्राची तपासणी सुरू झाली. निम्मी प्रमाणपत्रे तपासून झाल्यावर पोलिसात तक्रार करण्याचे आदेश दिले गेले.

कार्यकारी दंडाधिकारी धैर्यशिल जाधव यांनी पोलिसात दिलेल्या तक्रारीनुसार, महिनाभरात २०३९ प्रमाणपत्रे वितरित झाली. त्यापैकी निम्मी म्हणजे, १०२३ तपासण्यात आली. त्यातील २२१ प्रमाणपत्रे बनावट असल्याचे दिसून आले.

ही प्रमाणपत्रे आवश्यक कागदपत्रांची किंवा पुराव्यांची पूर्तता नसताना, बेकायदेशीर आणि त्रुटीयुक्त पद्धतीने जारी करण्यात आली. उपजिल्हाधिकारी गणेश सांगळे आणि नागनाथ लोलेवार यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# अल निनोमुळे पर्जन्यमानावर परिणाम

(पान १ वरून)

महाराष्ट्रात एल निनोवर काम करण्यासाठी टास्क-फोर्सची निर्मिती करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांना पेरणीसंदर्भात सूचना दिल्या आहेत. शेतकऱ्यांनी घाईघाईने पेरणी करू नये. राज्य सरकारच्या कृषी सल्ल्यानुसार पेरणी केल्यास दुबार पेरणीची वेळ येणार नाही. मात्र पावसाची खात्री नसताना पारंपरिक पद्धतीने पेरणी केल्यास नुकसान होऊ शकते. एसएमएस, महाविस्तार ॲप आणि कृषी विभागाच्या सूचनांवर विश्वास ठेवूनच पेरणीचे निर्णय घ्यावेत, असा सल्लाही फडणवीस यांनी दिला आहे.

अल निनो म्हणजे विषुववृत्तीय पॅसिफिक महासागरातील समुद्राच्या पाण्याचे तापमान नेहमीपेक्षा जास्त वाढणे. याउलट ला निनो म्हणजे याच भागातील समुद्राचे तापमान नेहमीपेक्षा कमी होणे. अल निनो आणि ला निनो या उष्णकटिबंधीय पॅसिफिक महासागरातील नैसर्गिक हवामान प्रक्रियेचा भाग असून, त्यांचा जगभरातील हवामानावर मोठा परिणाम होतो. अल निनोमुळे अनेक देशांमध्ये पाऊस कमी होण्याची शक्यता असते, तर काही भागांत अतिवृष्टीही होऊ शकते.

अल निनोच्या संभाव्य परिणामांबाबतच्या अंदाजांमुळे केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयात चिंता व्यक्त करण्यात आली आहे. यामुळे मंत्रालयाने भारतीय कृषी संशोधन परिषद, राज्य कृषी विद्यापीठे आणि कृषी विभागांना अल निनोच्या परिस्थितीचा विशेष विचार करून आपत्कालीन कृती आराखड्यांचे पुनरावलोकन करण्याचे निर्देश दिले आहेत. खरीप हंगामाचा जोर वाढण्यापूर्वी हे सुधारित आराखडे २० जूनपर्यंत मंत्रालयाकडे सादर करण्याची अपेक्षा आहे.

भारतीय हवामान विभागाच्या दीर्घकालीन अंदाजाच्या आधारे १५० ते २०० जिल्हे सर्वाधिक संवेदनशील म्हणून ओळखण्यात आले आहेत. मराठवाडा-उत्तर कर्नाटक पट्ट्यात सरासरीपेक्षा कमी पावसाचा सर्वाधिक धोका व्यक्त करण्यात आला आहे. याशिवाय राजस्थान, गुजरात, मध्य प्रदेश, छत्तीसगड तसेच पूर्व उत्तर प्रदेश, बिहार आणि झारखंडच्या काही भागांमध्येही पावसातील तुटीचा धोका अधिक असल्याचे मानले जात आहे. तेलंगाणातील काही भाग आणि दक्षिण भारतातील काही किनारी क्षेत्रे वगळता देशातील जवळपास सर्वच भागांवर अल निनोचा काही ना काही परिणाम होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

# आसाममध्ये विमान अपघात

(पान १ वरून)

अपघाताचे कारण निश्चित करण्यासाठी चौकशी समितीचे आदेश देण्यात आले आहेत. भारतीय हवाई दलाने या अपघातात पाच जवानांच्या मृत्यूची पुष्टी केली आहे. त्यांनी एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर लिहिले आहे की, आसाममधील जोरहाट येथे झालेल्या एएन-३२ विमान अपघातात आपल्या पाच जवानांना गमावल्याने भारतीय हवाई दल अत्यंत दुःखी आहे. स्काड्रन लीडर प्रशांत सिंग, फ्लाइट लेफ्टनंट शुभम कुमार, सार्जंट जितेंद्र शर्मा, अग्निवीर एअरमन खेमाराम कुमावत आणि अग्निवीर एअरमन दानिश आलम यांनी कर्तव्य बजावत असताना सर्वोच्च बलिदान दिले. हवाई दलाने आपल्या पोस्टमध्ये नमूद केलेय की, भारतीय हवाई दल शोकाकुल कुटुंबियांप्रति तीव्र शोकसंवेदना व्यक्त करते आणि दुःखाच्या या प्रसंगी त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे.

एएन-३२ हे एक मालवाहू विमान आहे. भारतीय हवाई दलाच्या ताफ्यात अशी १०० विमाने आहेत. लष्करासाठी उत्कृष्ट वाहतुकीकरिता डिझाइन केलेले हे विमान, भारतीय हवाई दलाच्या वाहतूक क्षमतेत सातत्याने वाढ करत आहे आणि उष्ण हवामान व जास्त उंचीवरील मोहिमांदरम्यान लष्कराला अधिक मजबूत करत आहे. यामुळे हे विमान अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. ते एका वेळी ६ ते ७ टन माल आणि ४० ते ५० सैनिक वाहून नेऊ शकते. एएन-३२ ची रचना कठीण परिस्थितीतही सर्वोत्तम कामगिरी करण्यासाठी केली आहे.

(पान १ वरून)

# विठ्ठल-रूक्मिणी मंदिर २३,२४ जूनला बंद

पुरातत्त्व सर्वेक्षण, राज्य पुरातत्त्व विभाग आणि मूर्ती संवर्धन क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येणार आहे.

यासंदर्भात ११ जून रोजी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. बैठकीस विविध तज्ज्ञ, पुरातत्त्व विभागाचे अधिकारी, स्थानिक महाराज मंडळी, मंदिर समितीचे पदाधिकारी, सल्लागार परिषद सदस्य आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत प्राप्त झालेल्या तांत्रिक मार्गदर्शन व शिफारशींच्या आधारे २२ ते २४ जून या कालावधीत श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या मूर्तींच्या संवर्धनाचे काम करण्यात येणार असल्याची माहिती मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली. या पार्श्वभूमीवर भाविकांनी मंदिर दर्शनाच्या नियोजनात आवश्यक बदल करावेत, असे आवाहन मंदिर समितीकडून करण्यात आले आहे.

# जरांगे आज कोल्हापुरात

जिल्हा सकल मराठा समाजाने जय्यत तयारी केल्याची माहिती प्रवीण पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

रविवारी कावळा नाका येथे त्यांचे समाज बांधवांकडून स्वागत होणार असून, सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहनही केले आहे. सोमवारी सकाळी ते अहिल्यादेवी होळकर स्मारक येथे अभिवादन, करवीर निवासिनी आई अंबाबाईचे दर्शन घेतील. शिवाजी चौक येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करतील. सकाळी १०.३० वाजता छत्रपती शाहू महाराज समाधीस्थळाला भेट देतील. यानंतर खासदार शाहू छत्रपती यांच्यासमवेत बैठक होईल. रविवारी कावळा नाका येथे त्यांच्या स्वागतासाठी सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहनही केले आहे. पत्रकार परिषदेला राहुल इंगवले, संदेश पाटील उपस्थित होते.

# चर्चेतून सकारात्मक मार्ग निघेल–ना.भरणे

मात्र उद्या त्यांना अल्टीमेटम देणार. मुळात आता शेतकऱ्यांना या कर्जमाफिचा फसवेपणा कळत आहे. त्यामुळे कुठे काही झाले तर त्याला आम्ही जबाबदार नाही.

कृषिमंत्री भरणे यांनी शेतकरी कर्जमाफीच्या निवेदनावर बोलताना म्हटले की, 'शेतकऱ्यांचं म्हणणं होतं, जी आपण कर्जमाफी दिली आहे त्यामध्ये सुधारणा करा. आमच्या भावना दोन्ही उपमुख्यमंत्री आणि मुख्यमंत्र्यांच्या कानावर घाला. त्यांनी जे निवेदन दिले आहे ते मी मुख्यमंत्र्यांच्या कानावर घालणार आहे. मला विश्वास आहे मुख्यमंत्री योग्य तो निर्णय घेतील. भरणे पुढे म्हणाले की, दोन अटी १०० टक्के आहेत, तिजोरीवर ताण असताना सुद्धा मुख्यमंत्री साहेबांनी माझ्या शेतकऱ्यांसाठी खूप मोठा निर्णय घेतला आहे. रोहित दादांना एवढंच सांगतो मंगळवारी एकदा आपली बैठक होईल त्यातून नक्कीच सकारात्मक मार्ग निघेल. आता मंगळवारची बैठक होऊ द्या, त्यानंतर मुख्यमंत्री निर्णय घेतील. शेतकऱ्यांनाही आश्वासित करतो की, मी खरच सांगतो समाधान सगळ्यांचेच होणार नाही, पण खूप मोठी घोषणा शेतकऱ्यांसाठी केलेली आहे. चर्चा झाल्याशिवाय पर्याय निघणार नाही.

# जहाजांवर हल्ले चिंताजनक

ही माहिती एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर दिली. जयशंकर यांनी एक्सवर लिहिले, मी शुक्रवारी संध्याकाळी अमेरिकेचे परराष्ट्र सचिव मार्को रुबियो यांच्याशी बोललो. आखाती प्रदेशात अमेरिकन नौदलाच्या हल्ल्यात तीन भारतीय खलाशांच्या मृत्यूवर भारताचा निषेध मी पुन्हा एकदा व्यक्त केला. व्यापारी जहाजांवरील अशी प्राणघातक कारवाई अन्यायकारक आहे. यापूर्वी, भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने दुसऱ्यांदा एका अमेरिकन राजदूताला बोलावून ओमानच्या किनाऱ्याजवळ व्यापारी जहाजांवरील हल्ल्यांविरोधात आपला निषेध नोंदवला होता. भारताने अमेरिकन राजदूत जेसन मीक्स यांना बोलावले होते. भारताने व्यापारी जहाजांवरील हल्ल्यांना 'अत्यंत चिंताजनक' म्हटले आणि अमेरिकेकडे हा मुद्दा तीव्रतेने मांडला.

# बालिकेचा दुर्दैवी मृत्यू

(पान १ वरून)

यावेळी रोड रोलरखाली मोनिका सापडली. तिच्या डोक्याला गंभीर मार लागला. कामगारांनी खासगी वाहनातून बेशुद्ध मोनिकाला तातडीने सीपीआर रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र, उपचारापूर्वीच तिचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. कोवळ्या मुलीचा अशा प्रकारे अपघातात मृत्यू झाल्याने पालकांनी हंबरडा फोडला. इतर कामगारांनाही हुंदका दाटून आला. उत्तरीय तपासणीनंतर रात्री मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. करवीर पोलीस ठाण्यात याची नोंद झाली आहे.

**पोटासाठी परगावी, पण नियतीने हिरावले लेकरू**

उदरनिर्वाहासाठी शेकडो किलोमीटर दूर कर्नाटकातून कोल्हापूर जिल्ह्यात आलेल्या चव्हाण दाम्पत्यावर नियतीने मोठा आघात केला. रस्त्याच्या कामावर मजुरी करत असताना त्यांच्या डोळ्यांसमोरच काळाने त्यांच्या तीन वर्षांच्या चिमुकलीला हिरावून नेले. त्यामुळे संपूर्ण कामगार वसाहतीत शोककळा पसरली.

# नदीपात्रात बुडून चौघांचा मृत्यू

(पान १ वरून)

दूधसागर नदी पात्रात उतरले. मात्र पाण्याचा अंदाज न आल्याने चौघांचा बुडून मृत्यू झाला आहे. नशिब बलवत्तर म्हणून पाच पैकी एक युवक बचावला.

या घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलीस आणि आपत्ती विभागाच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर, बुडालेल्या युवकांचे मृतदेह पाण्यातून बाहेर काढण्या आले असून शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले आहेत.

# भरधाव कारच्या धडकेत वृद्ध ठार

(पान १ वरून)

मिरज-बोलवाड रोडवरील बोलवाड फाटा येथे साडेअकरा वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला. सुरेश सदाशिव पाटील (वय ६१, रा. बोलवाड) असे मयत वृद्ध व्यक्तीचे नाव आहे. (एमएच ११ बीयु २८८८) या क्रमांकाच्या पांढऱ्या रंगाच्या स्विफ्ट कारणे त्यांना धडक दिली. याप्रकरणी मयत पाटील यांची मुलगी सुजाता सुजित मोरे (रा. सुभाष नगर) यांनी पोलिसात फिर्याद दिली आहे.

या अपघाताबाबत पोलिसात देण्यात आलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, सदरच्या कारचालकाने त्याच्या ताब्यातील कार भरधाव वेगाने चालवून रस्त्याकडेला बसलेल्या ठिकाणी सुरेश पाटील यांना जोरात धडक दिली. या अपघातात पाटील यांच्या डोक्याला, खांद्याला, छातीला दुखापत झाल्याने ते गंभीर जखमी झाले. यात त्यांचा मृत्यू झाला. अपघातग्रस्त पाटील यांना कोणतीही वैद्यकीय मदत न करता व पोलिसांना माहिती न देता कार चालकाने घटनास्थळावरून पलायन केले आहे.

पोलिसात देण्यात आलेल्या या फिर्यादीनुसार मिरज ग्रामीण पोलिसांनी सदरच्या स्विफ्ट कारच्या अज्ञात चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. मिरज ग्रामीण पोलीस पुढील तपास करीत असून कारचालकाचा शोध घेत आहे.

# सोन्याची तस्करी उधळली

**(पान १ वरून)** यामध्ये एकूण २,७९९.३ ग्रॅम (सुमारे २.८ किलो) वजनाचे सोन्याचे २४ बिस्किट्स होते.विमानातून सोन्याची तस्करी होत असल्याची माहिती अधिकाऱ्यांना मिळाली होती. गुरुवारी दुबईहून इंडिगोचे विमान ६-१४७८ अहमदाबादला पोहोचताच तपासणी सुरू करण्यात आली. या तपासणीदरम्यान पथकाने विमानातील शौचालयाची कसून तपासणी केली. जेव्हा अधिकाऱ्यांनी शौचालयातील स्पीकर बॉक्स काढला, तेव्हा तो असामान्यपणे जड असल्याचे त्यांच्या लक्षात आले. तो उघडल्यावर त्यांना आत काळ्या टेपने गुंडाळलेल्या दोन पिशव्या आढळल्या. तस्करीचे सोने विमानात आणणाऱ्या व्यक्तीची ओळख पटवण्यासाठी तपास यंत्रणा सध्या काम करत आहेत.

# धीरज सेठ यांची लष्करप्रमुखपदी नियुक्ती

(पान १ वरून)

एका आर्मर्ड रेजिमेंटचा समावेश आहे. त्यांनी पश्चिम रणांगणात एका चिलखती ब्रिगेडचे नेतृत्व केले आहे आणि जम्मू आणि काश्मीरमध्ये बंडखोरीविरोधी दलाचे नेतृत्व केले आहे.

लेफ्टनंट जनरल म्हणून त्यांनी सुदर्शन चक्र कॉर्प्सचे नेतृत्व केले. तसेच दिल्ली क्षेत्राचे जनरल ऑफिसर कमांडिंग म्हणूनही त्यांनी काम केले.

# ठाकरे गटाच्या खासदारांची आज मातोश्रीवर बैठक

(पान १ वरून)

ऑपरेशन टायगरच्या पार्श्वभूमीवर या बैठकीला महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे राज्याच्या राजकारणात काही मोठ्या घडामोडी घडणार आहेत का याची आता चर्चा सुरू झाली आहे.

मध्यंतरी शिवसेना ठाकरे गटाचे खासदार हे एकनाथ शिंदे यांच्या संपर्कात असल्याचा दावा केला जात होता. नागेश पाटील आष्टीकरांनी देखील एकनाथ शिंदे यांची भेट घेतली होती, तर खासदार संजय पाटील यांच्या पत्नीच्या तब्येतीची विचारपूसही एकनाथ शिंदेंकडून करण्यात आली होती.

ऑपरेशन टायगर राबवले जाणार असल्याचे सांगून केवळ अफवा पसरविण्याचा व संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. गेल्या काही दिवसापासून काहीच होत नाही, हे आपण बघितलेले आहे.

अशा प्रकारच्या अफवा महिन्या-दोन महिन्यानंतर पसरविण्याचे काम केले जात आहे. त्या अफवांवर विश्वास ठेऊ नका. आमचे नेते उद्धव ठाकरे यांना सर्वच गोष्टी माहित आहेत. सत्ताधारी मंडळींकडून कोणत्या तरी विषयावरुन लक्ष विचलित करण्यासाठी अशास्वरूपाच्या अफवा पसरविल्या जात असल्याचे ठाकरे गटाचे हिंगोलीचे खासदार नागेश पाटील-आष्टीकर यांनी स्पष्ट केले.

नांदेड येथे प्रसार माध्यमांशी बोलताना नागेश पाटील-आष्टीकर यांनी ऑपरेशन टायगरची हवाच काढली. त्यासोबतच नांदेड विधान परिषदेच्या निवडणूक प्रचारात सक्रिय असल्याचे सांगत एकीकडे महायुतीची धाकधूक वाढवली आहे. या निवडणुकीच्या रिंगणात महाविकास आघाडीकडून त्यांचे चिरंजीव कृष्णा पाटील-आष्टीकर यांना उतरविण्यात आले आहे.

# अमेरिका-इराण शांतता कराराबाबत संभ्रम कायम

(पान १ वरून)

पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी यापूर्वी दावा केला होता की अमेरिका आणि इराण यांच्यात २४ तासांत शांतता करार होऊ शकतो आणि पुढील आठवड्यात तांत्रिक चर्चांना सुरुवात होईल. मात्र इराणने जिनिव्हामध्ये करार झाल्याच्या बातम्याही फेटाळून लावल्या असून अद्याप प्रक्रिया अपूर्ण असल्याचे सांगितले आहे. इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनीही दोन्ही देश कराराच्या अधिक जवळ आले असल्याचे सांगत, माध्यमांनी अटींबाबत तर्कवितर्क टाळावेत असे आवाहन केले आहे.

या घडामोडींदरम्यान भारताने भारतीय खलाशी असलेल्या जहाजांवरील हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर अमेरिकन राजदूताला दुसऱ्यांदा बोलावून तीव्र आक्षेप नोंदवला आहे. माजी अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणवर भारतीय जहाजांवर ड्रोन हल्ल्याचा आरोप केला असून होर्मुझ सामुद्रधुनीतील तणाव वाढला आहे. इराणने मात्र या सामुद्रधुनीवर आपले नियंत्रण असल्याचा दावा केला आहे.अमेरिकेतील काही अधिकारी आणि विश्लेषकांच्या मते, हा करार लवकरच अंतिम स्वरूप घेऊ शकतो. व्हाईट हाऊसनेही दोन्ही देश कराराच्या अगदी जवळ पोहोचले असल्याचे संकेत दिले आहेत, मात्र त्याच्या अटी आणि अंमलबजावणीचा आराखडा अद्याप अस्पष्ट आहे.दुसरीकडे, पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री इशाक दार यांनी इजिप्तच्या परराष्ट्र मंत्र्यांसोबत झालेल्या चर्चेत अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यातील तणाव कमी होण्याची आशा व्यक्त केली आहे.

इराणच्या न्यायव्यवस्थेचे प्रमुख गुलाम-हुसेन मोहसेनी-एजेई यांनी अमेरिकेवर अविश्वास व्यक्त करत, संघर्षात इराणने शत्रूंना मोठे नुकसान पोहोचवले असल्याचा दावा केला आहे. एकूणच, अमेरिकाइराण शांतता कराराबाबत आशा आणि संभ्रम दोन्ही कायम असून पुढील काही दिवस या चर्चेसाठी निर्णायक ठरू शकतात, असे राजकीय वर्तुळात मानले जात आहे.


**॥ भावपूर्ण श्रद्धांजली ॥**



**श्रीमती सुमन इरगोंडा पाटील**
कबनूर गावचे माजी सरपंच कै.श्री. इरगोंडा म्हादगोंडा पाटील यांच्या सुविद्य पत्नी व आमच्या काकी श्रीमती सुमन इरगोंडा पाटील यांचे रविवारी निधन झाले. त्यांना आमची भावपूर्ण श्रद्धांजली... ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो...

– शोकाकुल –
**आप्पासाहेब पिरगोंडा पाटील**
**प्रमोद पिरगोंडा पाटील**
**अमोल आण्णासो पाटील**

टीप- माती सावडणे आज सोमवार दि.१४ जून सकाळी ७.३० वा.फॅक्टरी रोड, कबनूर येथे आहे.

**॥ शोक संदेश ॥**



**श्री. बजरंगलालजी जीवनरामजी मुंदडा**
अत्यंत दु:ख के साथ सुचित करना पड रहा है की हमारे पिताजी श्री. बजरंगलालजी जीवनरामजी मुंदडा का आकस्मिक निधन शुक्रवार, दि. १२ जून २०२६ को इचलकरंजी में हो गया है।
हरि इच्छा प्रबल है। ईश्वरसे प्रार्थना करते है कि दिवंगत पुण्यात्मा को अपने श्री चरणों में श्रेष्ठ स्थान प्रदान करे।

**शोकाकुल**
भाई - बद्रीनारायण
भतीजा - द्वारकाप्रसाद, नंदकिशोर
पुत्र - प्रेमरतन, शिवरतन, गजानंद
पौत्र - अरविंद, आशीष, आयुष
प्रपौत्र - कृष्णा, चिराग, नील, वीर

**समस्त मुंदडा परिवार,** इचलकरंजी-नापासर
ससुराल पक्ष - मोहनलाल नारायणप्रसाद झंवर, इचलकरंजी

* उठावणा - आज रविवार, दि. १४/६/२०२६ को दोपहर ४.३० बजे निवासस्थानपर

## मोटारसायकल चोरटे गजाआड : सात गाड्या जप्त

**सांगली, ता.१३(प्रतिनिधी )–**

**दोन अल्पवयीनसह तीन मोटारसायकल चोरट्यांना पोलिसांनी पकडले आहे. त्यांच्याकडून एकूण सात गाड्या जप्त करण्यात आल्या आहेत. तेजस केदार साळुंखे ( वय १८, कुंभारगाव, ता. कडेगाव) हा या टोळीचा म्होरक्या असल्याचे समोर आले आहे. साळुंखे याला पोलिसांनी अटक केली असून त्याचा साथीदार धैर्यशील मदने( रा.रामानंदनगर, पलूस ) हा पसार झाला आहे.**

दुचाकी चोरीचे गुन्हे वाढत असल्याने स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीसांना धामणी रोडवरील पलाश बिल्डकॉमचे इमारतीचे परिसरात एक बिना नंबर प्लेटची काळया रंगाची गोल्डन पट्टा असलेल्या यामाहा मोटारसायकल वरुन एकजण संशयितरित्या थांबला असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी तेजस सांळुखे याला ताब्यात घेतले.सहाय्यक पोलीस निरीक्षक यादव यांनी केलेल्या अधिक चौकशीत तेजस सांळुखे याने त्याचा मित्र धैर्यशील मदने आणि दोन अल्पवयीन असे मिळून मोटर सायकली चोरल्याची कबुली दिली. सांगली ग्रामीण पोलीस ठाणे, ईश्वरपुर पोलीस ठाणे, आष्टा पोलीस ठाणे, पलुस पोलीस ठाणे, बोरगाव पोलीस ठाणे, तळबिड पोलीस ठाणे (जि. सातारा) येथून त्यांनी चोरलेल्या मोटरसायकल पोलिसांच्या स्वाधीन केल्या आहेत. या चोरट्याला पुढील तपास कामी सांगली ग्रामीण पोलीसांकडे वर्ग करण्यात आले आहे.

## अडीच तोळ्यांचा दागिन्यांवर चोरट्यांचा डल्ला

**सांगली, ता.१३(प्रतिनिधी )–**

**शहरातील तरुण भारत मंडळाच्या मैदानावर सुरू असलेल्या धार्मिक कार्यक्रमातील गर्दीचा फायदा घेत चोरट्यांनी अडीच तोळे सोन्याच्या दागिन्यावर डल्ला मारला आहे. याप्रकरणी डॉ.कुमुदिनी सदाशिव नष्टे ( रा. विटा) यांनी शहर पोलिसात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी १ लाख २० हजार रुपयांचा ऐवज चोरीला गेल्याचा गुन्हा दाखल केलेला आहे.**

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सांगलीतील तरुण भारत व्यायाम मंडळाच्या मैदानावर जिल्हा वीरशैव लिंगायत समाज व शिवबसव सांस्कृतिक कला क्रीडा मंडळाचा अधिक मासानिमित्त कार्यक्रम सुरू होता. डॉ. नष्टे आणि त्यांच्या आई या कार्यक्रमासाठी विट्याहून सांगलीला आलेल्या होत्या. गुरुवारी रात्री कार्यक्रमाच्या ठिकाणी शिवपुराण कथा संपल्यानंतर सर्व भाविक महाप्रसादासाठी भोजन कक्षाकडे जात होते. त्यावेळी झालेल्या गर्दीचा फायदा घेत चोरट्याने डॉ. नष्टे यांचे दीड तोळ्याचे गंठण आणि एक तोळ्याची चैन चोरून पोबारा केला. आपला ऐवज गायब झाल्याचे लक्षात येताच डॉ. नष्टे यांनी शहर पोलिसात जाऊन चोरीची फिर्याद दिली.

## गळफास घेऊन युवकाची आत्महत्या

**कोल्हापूर, ता.१३(प्रतिनिधी)–**

**बापट कॅम्प मार्केट यार्ड येथे एकाने गळफास घेऊन आत्महत्या केली. संतोष महादेव खोत (वय ३६ रा. सध्या रा. बापट कॅम्प मुळ रा.कुरुंदवाड) असे मृताचे नाव आहे.**

संतोष यांनी शुक्रवार १२ रोजी रात्री दहाच्या सुमारास राहत्या घरी छताच्या अँगलला साडीने गळफास घेतला होता. नातेवाईकांनी गळफास सोडवून बेशुध्द अवस्थेत उपचारासाठी सीपीआर रुग्णालयात दाखल केले होते. मात्र, उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला होता. असे डॉक्टरांनी घोषीत केले. या घटनेची नोंद सीपीआर पोलीस चौकीत झाली आहे.

## टाकाऊ वस्तूंपासून उपयुक्त व आकर्षक कलाकृती

### प्रभाग १५ मध्ये नागरिकांच्या सहभागातून उपक्रम

**इचलकरंजी,ता.१३–**

**प्रभाग क्रमांक १५ मध्ये स्वच्छता निरिक्षक कविता साळुंखे यांनी नागरिकांच्या सहभागातून टाकाऊ वस्तूंपासून उपयुक्त व आकर्षक कलाकृती निर्माण करून शहर सुशोभिकरणाचा राबविलेला उपक्रम शहरातील सर्वच भागांसाठीही प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन आयुक्त पल्लवी पाटील यांनी केले.**



शहरातील प्रभाग क्रमांक १५ रिंगरोडवरील आचार्य महाश्रमण कन्या सुरक्षा सर्कल या चौकामध्ये स्वच्छता निरिक्षक कविता सोळंकी यांनी लोक सहभागातून टाकाऊ वस्तूंचा पुनर्वापर करत केलेल्या आकर्षक सुशोभिकरण उपक्रमाची आयुक्त पल्लवी पाटील यांनी पाहणी केली. स्वच्छता निरिक्षकाच्या पुढाकारातून आणि नागरिकांच्या सक्रिय सहभागातून जुन्या टायर, सिमेंट पाईप, लोखंडी साहित्य तसेच इतर टाकाऊ वस्तूंचा वापर करून या चौकाचे सुशोभिकरण केले आहे. या उपक्रमामुळे परिसराचे सौंदर्य वाढण्याबरोबरच पर्यावरण संवर्धनाचा संदेशही नागरिकांपर्यंत पोहोचत आहे.

शहरातील अधिकाधिक चौक व सार्वजनिक ठिकाणी लोकसहभागातून अशा प्रकारचे सुशोभिकरण उपक्रम राबविण्यात यावेत, असे निर्देश आयुक्त पाटील यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. यावेळी पर्यावरण दिनाचे औचित्य साधत आयुक्तांचे हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

## मुरगूडमध्ये दोन घरावर छापा : दीड किलो गांजा जप्त

**मुरगूड ,ता.१३ (प्रतिनिधी)–**

**मुरगूड येथे दोन घरावर छापा टाकून विक्रीसाठी आणलेला सुमारे दीड किलो गांजा मोबाईल ,मोटरसायकल असा सुमारे १ लाख १० हजार ६८० रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याबाबत संशयित आरोपी रवि राजू डोंबारी(वय ३०) ,विजय विलास भोई (वय २७ दोघे रा. मुरगूड) यांच्यावर मुरगूड पोलिसात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

मुरगूड येथे गेल्या काही वर्षापासून गांजा विक्री जोमात सुरु असल्याच्या चर्चा होत्या.याबाबत मुरगूड पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार पोलिसांनी अचानक रात्री रवी डोंबारी व विजय भोई यांच्या रहात्या घरावर छापा टाकून घर झडती घेतली असता रवी डोंबारी याच्या घरी १ किलो १८८ ग्रॅम वजनाचा ४७ हजार ५२० रुपयाचा तसेच त्याच्या मोटरसायकल मध्ये लपवलेला ३४ ग्रॅम वजनाचा १३६० रुपयाचा गांजा सापडला तर विजय भोई यांच्या घरी ३७० ग्रॅम वजनाचा १४ हजार ८०० रुपयाचा गांजा सापडला आहे.असा एकूण ६३ हजार ६८० रुपयाचा गांज्याचा साठा सापडला आहे तसेच या दोन्ही संशयिताकडून २ मोबाईल, १ नंबर प्लेट नसलेली मोटरसायकल असा एकूण १ लाख १० हजार ६८० रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याबाबतची फिर्याद हेड कॉनस्टेबल बजरंग पाटील यांनी दिली असून संशयित आरोपोवर गुंगीकारक औषध द्रव्य आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियमा नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे.अधिक तपास स.पो.नि.क्रांती पाटील करीत आहेत.

## कोल्हापूर जिल्हा मजूर संस्थेवर पुन्हा प्रशासक

**इचलकरंजी ता.१३–**

**कोल्हापूर जिल्हा मजूर संस्थांचा सहकारी संघावर सहाय्यक निबंधक युसुफ शेख यांच्या अध्यक्षतेखाली तीन सदस्य प्रशासकीय मंडळाची शुक्रवारी जिल्हा उपनिबंधक निळकंठ करे यांनी नियुक्ती केली. त्यामध्ये युसुफ शेख अध्यक्ष सभासद मधून कृष्णात शिंदे (इचलकरंजी) व राहुल पोवार (पिंपळे तर्फ ठाणे) यांची सदस्य म्हणून समावेश करण्यात आला आहे.**

कोल्हापूर जिल्हा मजूर संघाची २०२२ मध्ये पंचवार्षिक निवडणूक झाली होती. पंधरा संचालकापैकी १४ संचालक मुकुंद पोवार गटाचे निवडून आले होते. मात्र, अडीच वर्षाच्या कारभारानंतर दहा संचालकांनी सामुदायिक राजीनामा दिला होता. संचालक मंडळ अल्पमतात आल्याने डिसेंबर २०२५ मध्ये संघावर युसुफ शेख यांना प्रशासक म्हणून नियुक्त केले होते. पण जिल्हा उपनिबंधकाच्या कार्यवाहीला चेअरमन पोवार यांनी विभागीय सहनिबंधक महेश कदम यांच्याकडे याचिका दाखल केली होती. त्यांनीही करे यांचे आदेश कायम केले होते. त्यानंतर पोवार यांनी सहकार राज्यमंत्री यांच्या कडे तक्रार केली होती. मात्र, जिल्हा उपनिबंधक करे यांनी मजूर संघाच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरू केली होती. त्यासाठी ठराव मागण्यात आले होते. याच्या विरोधात पोवार यांनी कोल्हापूर सर्किट बेंच मध्ये याचिका दाखल केली होती. ठराव मागणीच्या अखेरच्या दिवशी ही प्रक्रिया थांबून राजमंत्र्यांच्या निर्णयासाठी दोन महिन्याची मुदत दिली होती. दोन महिन्यानंतर राजमंत्र्यांनी जिल्हा उपनिबंधक यांना कारवाईचे आदेश दिले. त्यानुसार त्यांनी पाच संचालकांची समिती बरखास्त करून शुक्रवारी प्रशासक मंडळाची नियुक्ती केली.

## शालेय प्रवेशासाठी घंटागाडीवरून जनजागृती मोहिम

### महानगरपालिकेचा अभिनव उपक्रम

**इचलकरंजी,ता.१३–**

**इचलकरंजी महानगरपालिका शिक्षण विभागामार्फत सन २०२६–२७ या शैक्षणिक वर्षातील प्रवेश अभियान अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी एका अभिनव उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. घंटागाडीवर शालेय सुविधांची माहिती देणारी ध्वनिफीत लावून घराघरांपर्यंत जनजागृती पोहोचवण्याच्या या मोहिमेचा शुभारंभ महानगरपालिका मुख्यालय येथे अत्यंत संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महापौर उदय धातुंडे होते.**

इचलकरंजी महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढावी यासाठी प्राथमिक शाळांमध्ये आवश्यक त्या सोयी–सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. त्याची माहिती पालकांना व पाल्यांना व्हावी यासाठी शिक्षण समिती सभापती सौ. विद्या साळुंखे यांच्या संकल्पनेतून हा अनोखा उपक्रम राबविला जात आहे. शहरातील बहुतांशी सर्वच भागात घंटागाडीच्या माध्यमातून महानगरपालिका शाळांमधील गुणवत्तापूर्ण शिक्षण, अनुभवी शिक्षक वर्ग, आधुनिक शैक्षणिक सुविधा, डिजिटल वर्ग, विज्ञान प्रयोगशाळा, क्रीडा व सांस्कृतिक उपक्रम, मोफत दिल्या जाणाऱ्या शालेय सुविधा तसेच प्रवेश प्रक्रियाबद्दल पालकांसह नागरिकांमध्ये व्यापक जनजागृती केली जाणार आहे. मान्यवरांच्या हस्ते फीत कापून व नारळ फोडून या घंटागाडी जनजागृती मोहिमेचा रीतसर शुभारंभ करण्यात आला.



यावेळी स्थायी सभापती सतीश मुळीक, महिला व बालकल्याण सभापती सौ. रुपाली सातपुते, शिक्षण उपसभापती सौ. पूनम माळी आदींसह भाऊसो आवळे, सौ. मनीषा नवनाळे, शिक्षणाधिकारी बी. एम. कासार, प्रशासनाधिकारी इरफान पटेल, शहर पर्यवेक्षक राजेंद्र घोडके, विनय महाजन, मनोज साळुंखे तसेच मनपा शाळांचे मुख्याध्यापक उपस्थित होते.

इचलकरंजी महानगरपालिका शिक्षण विभाग विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत असून, ही प्रवेश जनजागृती मोहीम त्याच दिशेने उचललेले एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. या मोहिमेच्या माध्यमातून जास्तीत जास्त पालकांनी आपल्या पाल्यांचा प्रवेश इचलकरंजी महानगरपालिकेच्या शाळांमध्ये निश्चित करावा आणि येथील दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन शिक्षण समिती सभापती सौ. विद्या मनोज साळुंखे यांनी केले आहे.

## पूरपरिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आयुक्तांकडून मळेभागाची पाहणी

**इचलकरंजी,ता.१३–**

**संभाव्य पूरपरिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आयुक्त पल्लवी पाटील यांनी शहरातील जुना चंदुर रोड येथील मळेभागाची पाहणी करून पूरपरिस्थिती निर्माण झालेस तातडीने कराव्या लागणाऱ्या उपाययोजनांचा आढावा घेतला.**



आयुक्त पल्लवी पाटील यांनी मळेभाग येथे पाणी साचणारे भाग, नाले, मोठ्या सारण गटारी, पाणंद रस्ते तसेच संभाव्य पूरग्रस्त क्षेत्रांची प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. अतिपावसामुळे पूरपरिस्थिती निर्माण झालेस नागरिकांना त्याचा कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये यासाठी आवश्यक उपाययोजना तातडीने राबविण्याच्या सूचना दिल्या. तसेच पावसाच्या पाण्याचा तात्काळ निचरा होणेसाठी नाले व सारण गटारांची नियमित स्वच्छता करण्याबाबत निर्देश आरोग्य विभागास देण्यात आले. महानगरपालिका प्रशासन निर्माण होणाऱ्या संभाव्य परिस्थितीवर लक्ष ठेवणार असून नागरिकांनी कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास महानगरपालिकेच्या २४ तास सुरू असलेल्या नियंत्रण कक्षातील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन केले.

यावेळी मुख्य लेखापरिक्षक आरती खोत, संतोष शेळके, अमृत भोसले, राजू पुजारी, नागेश पाटील, सहा. आयुक्त रामचंद्र कांबळे, सहा. आयुक्त नितिन बनगे, मुख्य स्वच्छता निरीक्षक रफिक पेंढारी, स्वच्छता निरीक्षक सचिन भुते, करण लाखे, बाळासाहेब शिंगे आदी उपस्थित होते.

## आडी येथे आजपासून श्री दत्तयागाचे आयोजन

**इचलकरंजी,ता.१३–**

**आडी (ता.निपाणी) संजीवनगिरीवरील श्री दत्त देवस्थान मठाच्यावतीने अधिक मास, कर्क राशीतील वर्गोत्तम उच्चस्थ गुरू आणि पंचरात्रिपर्व यांच्या दुर्मिळ संयोगावर आयोजित करण्यात आलेल्या श्रीदत्तयाग महोत्सवाची सर्व तयारी करणे चालू असून, परिसरात उत्साहाचे आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. रविवार दि. १४ जून व सोमवार दि. १५ जून २०२६ रोजी संजीवनगिरीच्या पायथ्याशी वल्भालय भवनाच्या प्रांगणात हा भव्य धार्मिक सोहळा संपन्न होणार आहे.**

सुमारे ८० ते ९५ वर्षांनी एकदाच लाभणाऱ्या या दुर्मिळ आध्यात्मिक योगामुळे यंदाच्या श्रीदत्तयागाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे राज्यासह देशाच्या विविध भागांतून भाविक, साधक आणि दत्तभक्त मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. श्रीदत्तयाग रूप महायज्ञासाठी भव्य व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच पिण्याचे पाणी, वाहनतळ, निवास व अन्य आवश्यक सुविधांचीही योग्य नियोजनपूर्वक व्यवस्था करण्यात आली आहे.

यज्ञस्थळाची सजावट, यज्ञकुंडांची उभारणी, पूजासाहित्याची तयारी, भाविकांच्या स्वागतासाठी आवश्यक व्यवस्था आणि सुरक्षा नियोजन अशी सर्व कामे अंतिम टप्प्यात आहेत. देवस्थान समिती, स्वयंसेवक तसेच परिसरातील अनेक गावांतील भाविक गेल्या अनेक दिवसांपासून या सोहळ्याच्या तयारीत कार्यरत आहेत.

अधिक मासातील वद्य चतुर्दशी आणि अमावास्या या पुण्यप्रद तिर्थींच्या औचित्याने होत असलेल्या या श्रीदत्तयागाबाबत भाविकांमध्ये प्रचंड उत्सुकता दिसून येत आहे.

देवस्थानतर्फे दत्तयागासाठी नोंदणी केलेल्या सर्व भाविकांनी सकाळी ७ ते ८ या वेळेत यज्ञस्थळी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.



## पोलिसांसाठी निधीची कमतरता भासू देणार नाही

### पालकमंत्री प्रकाश आबिटकर



नव्याने दाखल झालेल्या वाहनांचे पूजन करताना पालकमंत्री प्रकाश आबिटकर, खास. श्रीमंत शाहू महाराज, आम. सतेज पाटील व इतर.

**कोल्हापूर ता.१३ (प्रतिनिधी)–**

**धार्मिक आणि पर्यटनस्थळ म्हणून कोल्हापूरची ओळख असल्याने येथे गर्दी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे पोलीस यंत्रणेवरील ताण लक्षात घेऊन २ कोटी ८० लाख रुपयांच्या निधीतून २६ वाहने पोलीस प्रशासनाला प्रदान करण्यात आली आहेत. तसेच आगामी वर्षात पोलीस सुरक्षेसाठी ५ कोटी ७५ लाख रुपयांची तरतूद करण्यात येणार असल्याची घोषणा पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी केली. शनिवारी पोलीस कवायत मैदान येथे आयोजित लोकार्पण सोहळ्यानंतर ते बोलत होते.**

कार्यक्रमाला खासदार श्रीमंत शाहू महाराज, आमदार सतेज पाटील, आमदार अशोकराव माने, जिल्हाधिकारी विजय राठोड, पोलीस अधीक्षक नीलोत्पल,जि. प.मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जास्मिन, उपअधीक्षक तानाजी सावंत, उपअधीक्षक प्रिया पाटील, सुशांत चव्हाण आणि संतोष डोके उपस्थित होते.पोलीस ही अत्यावश्यक सेवा आहे. त्यांना कमतरता भासू नये याची सरकार काळजी घेईल, असे ना. आबीटकर यांनी स्पष्ट केले.

CHANGE OF NAME

My old Name

IMRAN MEHABUB INAMDAR

Do Hereby Solemnly Declare My New Name as

IMRAN MEHBOOB INAMDAR

For Passport Issuance

हार्दिक अभिनंदन !



चि. शार्दुल प्रकाश मोरबाळे



आमचे परममित्र, हितचिंतक,

मा.श्री. प्रकाश गणपतराव मोरबाळे (साहेब)

यांचे चिरंजीव **शार्दुल प्रकाश मोरबाळे** यांची

**भारतीय सैन्यात लेफ्टनंट कर्नलपदी**

निवड झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन..!

व भावी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा..!

**सौ. मनिषा संतोष कुपटे**


नगरसेविका, इचलकरंजी महानगरपालिका

**संतोष विष्णू कुपटे (आण्णा)**

**अवधुत संतोष कुपटे**

**गणपती कट्टा ग्रुप, इचलकरंजी**

॥ हार्दिक शुभेच्छा ॥



**मा.श्री. स्वप्निल आवाडे**

आमचे मार्गदर्शक, आधारस्तंभ, कल्लाप्पाण्णा आवाडे जनता बँकेचे चेअरमन, मा.श्री. स्वप्निल आवाडे यांना वाढदिवसाच्या मन:पूर्वक शुभेच्छा..!

**विल्सन उर्फ महेश वास्कर**
चेअरमन

**सौ. अरूणा वास्कर**
मुख्याध्यापिका

**सौ. स्मिता निकम**
ॲडमिनिस्ट्रेटर

**विश्वास निकम**
सदस्य

✻ वास्कर-निकम परिवार ✻

**जिझस् इंग्लिश मेडियम हायस्कूल, इचलकरंजी**

# खरीप हंगामाच्या चिंतेने बळीराजाच्या मनात प्रश्नांचे काहूर

## कोल्हापूर जिल्ह्यात पावसाअभावी पेरण्या खोळंबल्या

कोल्हापूर,ता.१३(प्रतिनिधी)–

**जून महिन्याचा तिसरा आठवडा उजाडला तरीही मान्सून पावसाची सुरुवात झाली नाही, त्यामुळे जिल्ह्यातील पेरण्या खोळंबल्या आहेत. ढगाळ व काही प्रमाणात सूर्यप्रकाशयुक्त वातावरण असले तरीही पेरणीयुक्त पाऊस न झाल्याने शेतकरी चिंताग्रस्त बनला असून त्यांनी आभाळाकडे डोळे लावले आहेत.**

जिल्ह्यात पुरेसा पाऊस सुरु न झाल्याने शेतकऱ्यांनी खरीप पेरणीची घाई करु नये, असा सल्ला कृषी विभागकडून देण्यात आला आहे.जिल्ह्यात खरीपाचे सर्वसाधारण क्षेत्र १ लाख ८० हजार ७४६ हेक्टर इतके आहे, त्यामध्ये भात,ज्वारी,नाचणी,मका, तूर, मूग, उडीद, भुईमूग, कारळा, सोयाबीन या पिकांचा समावेश आहे. जिल्ह्यात खरीपाच्या पेरणीसाठी काही प्रमाणात भाताची धुळवाफ पेरणी केली जाते, तसेच उर्वरित क्षेत्रामध्ये रोपलागण केली जाते. धुळवाफ पेरणीला सुरवात झाली असून पाण्याच्या उपलब्धतेनुसार आतापर्यंत १४ हजार २३९ हेक्टर क्षेत्रावर पेरणी झालेली आहे.त्याचप्रमाणे रोपलागणीसाठी रोपवाटीका तयार करण्यात आल्या आहेत. तथापी अद्याप पुरेसा पाऊस झालेला नसल्याने भुईमुग, सोयाबीन व इतर पिकांच्या पेरण्या खोळंबल्या आहेत. त्यामुळे शेतकरी चिंतातूर आहे.

गेल्या वर्षी मे महिन्यांच्या मध्यापासूनच पूर्व मान्सून व मोसमी पाऊस असा सलग महिनाभर पाऊस झाला होता. त्या अनुभवावर यावर्षीही शेतकऱ्यांनी खरीप पेरणीचे नियोजन केले होते, पण पावसाने मारलेली दडी व आखाती युध्दाच्या पार्श्वभूमीवर बियाणे व खतांच्या उपलब्धतेमध्ये निर्माण झालेल्या अडचणी यामुळे शेतकरी अडचणीत सापडल्याचे आज चित्र आहे.

सर्वसाधारणपणे केरळमध्ये मान्सून १ जून वा तत्पूर्वी सुरु होत असतो, मात्र यंदा १४ जून उजाडला तरीही पावसाचा पत्ता नाही. पेरणीयोग्य पावसासाठी आणखी काही दिवस वाट पाहवी लागणार असल्याचे हवामान विभाग सांगत आहे.त्यामुळे कृषी विभागानेही शेतकऱ्यांनी लगेचच पेरणीची घाई करु नये असा सल्ला दिला आहे. याउलट काही भागात शेतकऱ्यांनी धुळवाफेवर पेरणी केली असून हे शेतकरी पावसाच्या प्रतिक्षेत आहेत.

> धुळवाफ पेरणी करून बरेच दिवस उलटले आहेत पण पाऊस नसल्याकारणाने बियाणे उघडे पडत आहेत, हे बियाणे पक्ष्यांकडून फस्त केले जात आहेत. त्यामुळे शेतकऱ्यावर दुबार पेरणीचे संकट ओढावेल अशी अवस्था आहे.आखाती युध्दामुळे सर्वच क्षेत्रात महागाई वाढली असून रासायनिक खते, बी बियाणे, किटकनाशकांचे दर गगणाला भिडले आहेत, त्यामध्ये महागाईने अगोदरच कंबरडे मोडले असताना पाऊस लांबत असल्यामुळे शेतकरी पुरता खचला आहे. काही भागामध्ये जेथे सिंचनाची सोय आहे तेथे शेतकरी भात शेतीला पाणी देऊन पुढील शेतीच्या कामाला सुरवात करत आहे. पण जेथे सिंचनाची सोय नाही अशा ठिकाणी शेतकरी आभाळाकडे डोळे लावून बसला आहे.



## निसर्गाच्या लहरीपणाचा शेती व्यवसायाला फटका

शिरगाव,ता.१३(प्रतिनिधी)–

**गेल्या काही वर्षामध्ये निसर्गाच्या लहरीपणाचा फटका शेती व्यवसायाला बसत आहे. कधी अवर्षण, कधी अवकाळी पाऊस तर अतिवृष्टीमुळे शेती पिकांचे मोठे नुकसान होत आहे. या बिकट परिस्थितीत ही हार न मानता जगाचा पोशिंदा काळ्या आईची सेवा करून हिरवे सपान पहात आहे. खरीपाच्या तोंडावर रासायनिक खतांच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. तर डिझेल दर वाढीबरोबरच टंचाईचे संकट निर्माण झाले आहे.**

उत्पादन खर्चात मोठी वाढ झाली असताना शेती मालाला योग्य हमीभाव मिळत नाही.या कठीणप्रसंगी आशेचा किरण असलेली कर्जमाफी योजना अटी नियमात अडकली आहे. या पार्श्वभूमीवर चक्रव्युहात सापडलेला बळीराजा 'तुम्हीच सांगा आम्ही शेती करायची तरी कशी' असा आर्त सवाल शासनाला करत आहे.

एकीकडे वैऱ्यासारखा वागणारा निसर्ग दुसरीकडे उत्पादन खर्चात वाढ होऊन ही त्या तुलनेत घामाला योग्य दाम मिळत नसल्याने शेतकरी आर्थिक आरिष्टात सापडला आहे. दिवसेंदिवस कर्जाच्या खाईत लोटला जात आहे. गेल्या दोन वर्षाचा विचार करता राज्यात अवकाळी पाऊस व अतिवृष्टीने शेतकऱ्यांच्या पिकाची मोठी हानी झाली आहे. त्यामुळे पिकांच्या सरासरी उत्पादनात मोठी घट झाल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोडमले आहे. सहकारी सेवा,बँका यांच्याकडून घेतलेले पिककर्जाची परतफेड करणे डोईजड झाले आहे. युती शासनाने विधानसभेच्या निवडणुकीच्या वचननामा व प्रचार सभेत शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याचे दिलेले आश्वासन एक आशेचा किरण होता.मात्र ही कर्जमाफी योजना अटीशर्तीत अडकली आहे. तर शासनाने नियमित कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांची पन्नास हजार रुपये प्रोत्साहनपर अनुदानावर बोळवण केली आहे.

यंदा राज्यात मृग नक्षत्र सुरु झाले तरी मान्सूनने पाठ फिरविली आहे. वाढत्या उन्हाच्या झळाबरोबर धरणातील पाणीसाठे हळूहळू कमी होत चालले आहेत. मान्सून वेळेत दाखल न झाल्यास शेती पिकाचा पाणीपुरवठा थांबल्यास कष्टातून फुलविलेल्या पिकांचे काय होणार, तर खरीपाच्या पेरणीचे भवितव्य काय अशा अनेक प्रश्नांचे काहूर बळीराजाच्या मनात माजले आहे.अशा कठीणप्रसंगी शासनाने शेतकऱ्यांच्या व्यथाचा सारासार विचार करून त्यांना मदतीचा हात देण्याची गरज आहे. शेती व्यवसायाला अच्छे दिन येण्यासाठी शासनाने ठोस पाऊल उचलणे काळाची गरज बनली आहे.

### रांगाच्या भोवऱ्यात अडकला शेतकरी

ग्रामीण भागात खरीपाची पूर्वतयारी व पेरणीची लगबग सुरु आहे.मात्र ऑनलाईन खत विक्री प्रक्रिया व डिझेल टंचाईचे सावट निर्माण झाले आहे. त्यामुळे ऑनलाईन नोंदणीसाठी शेती सेवा केंद्र व डिझेल मिळविण्यासाठी तेल विक्री पंपावर रांगा दिसून येत आहेत. एकंदरीत ऐन कामाच्या दिवसात बळीराजा रांगाच्या भोवऱ्यात अडकल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

# कबनूरमधील प्रभागांची आरक्षण सोडत जाहीर

कबनूर,ता.१३(वार्ताहर)–

**कबनूर ग्रामपंचायत निवडणूक कार्यक्रमानुसार विठ्ठल मंदिर सभागृहात विस्तार अधिकारी एन.आर.राम्माणणा यांच्या अध्यक्षतेखाली कबनूरमधील सर्व सहा प्रभागांचे आरक्षण सोडत काढण्यात आली.**



कबनूरः प्रभागांची आरक्षण सोडत काढताना घेतलेले छायाचित्र.

प्रभाग क्रमांक एकमध्ये अनुसूचित जाती महिला एक, नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला एक,सर्वसाधारण एक.प्रभाग क्रमांक दोनमध्ये अनुसूचित जाती स्त्री एक,नागरिकांचा मागास प्रवर्ग एक, सर्वसाधारण स्त्री एक.प्रभाग क्रमांक तीनमध्ये नागरिकांचा मागास प्रवर्ग स्त्री एक. सर्वसाधारण स्त्री एक व सर्वसाधारण एक.प्रभाग क्रमांक चारमध्ये अनुसूचित जाती एक,सर्वसाधारण एक.प्रभाग क्रमांक पाचमध्ये नागरिकांचा मागास प्रवर्ग एक,सर्वसाधारण स्त्री एक,सर्वसाधारण एक. प्रभाग क्रमांक सहामध्ये सर्वसाधारण स्त्री दोन, सर्वसाधारण असे आरक्षण पडले आहे. यावेळी तलाठी किशोर पाटील, ग्रामपंचायत अधिकारी संजय बर्डे, सहाय्यक तलाठी प्रतीक जाधव हे उपस्थित होते. काही प्रभागाची सोडत चिठ्ठी टाकून सार्थक चौगुले या मुलग्याच्या हस्ते करण्यात आली.

प्रमोद पाटील, बबन केटकाळे, प्रकाश पाटील,जयकुमार काडाप्पा, समीर जमादार, सुधीर पाटील, मधुकर मणेरे,सुलोचना कट्टी, सुरेश आडके,उदय गीते, रियाज चिकोडे, अभिजीत खवरे, विनायक गुंडकल्ले, अमोल पाटील, विशाल दंडवते,अल्ताफ मुजावर यांनी सोडतीच्या दरम्यान चर्चा करून काही सूचना मांडल्या.

# पडसाळी लघुपाटबंधारे तलावात अवघा १० टक्के पाणीसाठा

## पाऊस लांबल्याने पाणी टंचाईचे संकट गडद

बा.भोगाव,ता.१३(प्रतिनिधी)–

**पावसाने अद्यापही अपेक्षित हजेरी न लावल्याने परिसरातील जलस्रोत कोरडे पडू लागले असून, पडसाळी लघुपाटबंधारे तलावातील पाणीसाठा अवघ्या १० टक्क्यांवर येऊन ठेपला आहे. त्यामुळे आगामी खरीप हंगामासह पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धते बाबतही चिंता व्यक्त केली जात आहे.**

यंदाच्या उन्हाळ्यात तापमानाचा पारा मोठ्या प्रमाणात वाढल्याने बाष्पीभवनाचे प्रमाणही वाढले. परिणामी धरणातील पाणीसाठ्यात झपाट्याने घट झाली. शेतकऱ्यांना सिंचनासाठी मोठ्या प्रमाणात पाण्याची गरज असताना धरणातील पाण्याची पातळी दिवसेंदिवस खालावत चालली आहे. धरणाचा तळ उघडा पडल्याचे चित्र सध्या दिसून येत असून, परिसरातील शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण आहे.



पडसाळी लघू पाटबंधारे तलावातील कमी झालेली पाण्याची पातळी

> **'जून महिना सुरू होऊनही पाऊस नसल्याने आगामी काळात पाणीप्रश्न गंभीर होण्याची शक्यता आहे,'**
> **–विलास पाटील,पडसाळी**

पन्हाळा पाटबंधारे विभागाने उपलब्ध पाण्याचे नियोजनबद्ध व्यवस्थापन केल्यामुळे आतापर्यंत सिंचनासाठी काही प्रमाणात पाणी उपलब्ध झाले आहे. मात्र, जून महिना सुरू होऊनही समाधानकारक पाऊस न झाल्यास परिस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. धरणातील पाणीसाठा कमी झाल्याने नदीपात्रातील पाण्याचे प्रमाणही घटले असून, मोटारपंपाद्वारे शेतीला पाणी पुरवणाऱ्या शेतकऱ्यांसमोर अडचणी निर्माण झाल्या आहेत.सकाळी आकाशात ढगांची उपस्थिती जाणवत असली तरी अद्याप जोरदार पावसाची प्रतीक्षा कायम आहे. लवकरच दमदार पाऊस न झाल्यास शेतकरी, नागरिक आणि प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे राहण्याची शक्यता आहे.

पन्हाळा पाटबंधारे विभागाचे शाखा अभियंता सचिन लाड यांनी सांगितले की, 'उन्हाळ्यात तापमान अधिक असल्याने पाण्याची गरज वाढली होती. मात्र विभागाने योग्य नियोजन केल्याने आजपर्यंत पाणी उपलब्ध करून देता आले.'

# गोकुळ दूध संघाची निवडणूक महायुती म्हणूनच लढणार

## -मंत्री चंद्रकांत पाटील यांची माहिती

कोल्हापूर,ता.१३(प्रतिनिधी)–



**कोल्हापूरच्या ग्रामीण भागाचे आर्थिक परिवर्तन करणारी संस्था म्हणजे गोकुळ असून या दूध संघाची निवडणूक महायुती म्हणूनच लढण्याचे निश्चित झाले असल्याची माहिती राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी कोल्हापूर येथे बोलताना दिली.**

गोकुळ दूध संघाच्या निवडणुकीच्या अनुषंगाने अंतिम मतदार यादी झाल्यानंतर नेमके कुणाला किती जागा द्यायच्या याचा निर्णय होईल. गोकुळ दुध संघाच्या अनुषंगाने आमदार शिवाजी पाटील वारंवार उघडपणे बोलत होते. याबाबत मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले की, आमदार शिवाजी पाटील हे आमच्या घरातीलच सदस्य असून त्यांची नाराजी दूर झाली असल्याचेही श्री.पाटील यांनी सांगितले. कोल्हापुरात आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेला राहूल चिकोडे, विक्रम पावसकर, महेश जाधव,भाजप जिल्हाध्यक्ष विजय जाधव उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या बारा वर्षाच्या आपल्या कारकिर्दीत आपल्या कायकर्तृत्वाने देशाचा चेहरामोहरा बदलला आहे. सर्वसामान्यांसाठी सातत्यपूर्ण काम करुन लोकांचा अढळ विश्वास संपादन केल्याचेही मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले. याबाबत पुढे बोलताना ते म्हणाले, बारा वर्षांच्या काळात त्यांनी देशातील जनसामान्यांच्या विकासासाठी आणि उन्नतीसाठी भरीव काम केले असून असून सामान्यांचा विश्वास संपादन केला आहे. पंतप्रधान मोदी यांनी सत्तारुढ होताच महत्वाच्या तीन टप्प्यात काम केले, यामध्ये पहिल्या टप्प्यात मोदीजींनी सर्वसामान्यांच्या विकासाचे धोरण यशस्वीपणे राबविले आणि ते पूर्ण करण्याचा प्रयत्न केला. दुसऱ्या टप्प्यात राम मंदिराची उभारणी केली आणि तिसऱ्या टप्प्यात २०४७ पर्यंत जगात भारत देश आर्थिकदृष्ट्या शक्तिशाली व भक्कम करण्याचा निर्धार केला आहे. मोदी सरकारने देशातील गरीब, शेतकरी, तरुण आणि महिलांना सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. शासनाच्या प्रत्येक योजनेचा १०० टक्के लाभ शेवटच्या माणसापर्यंत पोहोचविण्याचा त्यांनी ध्यास घेऊन तो पूर्ण केला आहे. याबरोबरच गरिबांना वैद्यकीय सुविधा, जलजीवन मिशन, पथविक्रेत्यांसाठी योजना, आदिवासी समाजासाठी मोठा निधी, किसान सन्मान योजना, कर्ज मर्यादित वाढ, ग्रामीण सडक योजना, कृषी सिचन योजना,राष्ट्रीय महामार्गाचे जाळे, रेल्वेचे आधुनिकीकरण, मेट्रोचे नेटवर्क, वीज व इंटरनेट क्षेत्रात विक्रमी काम,शिक्षण अशा अनेक योजनांची प्रभावी अंमलबजावणी करुन देश्यातील जनतेचा विकास व उन्नती साधण्याचा प्रयत्न केल्याचेही मंत्री पाटील म्हणाले.

# अ‍ॅस्टर आधारमध्ये मोबाईल मेडिकल युनिटचे लोकार्पण

कोल्हापूर,ता.१३–

**समाजातील प्रत्येक घटकापर्यंत, विशेषतः ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत दर्जेदार आणि वेळेवर आरोग्यसेवा पोहोचविण्याच्या उद्देशाने अ‍ॅस्टर व्हॉलेंटियर्स आणि यूडीएस फाऊंडेशन यांच्या विद्यमाने सुरू करण्यात आलेल्या ७७ व्या मोबाईल मेडिकल युनिटचा (केअर ऑन व्हील्स) लोकार्पण सोहळा अ‍ॅस्टर आधार हॉस्पिटल, कोल्हापूर येथे उत्साहात संपन्न झाला.**

कोल्हापूरसह ग्रामीण भागांतील नागरिकांना प्राथमिक व मोफत वैद्यकीय सेवा तसेच तज्ज्ञांचा सल्ला त्यांच्या दारापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.



अ‍ॅस्टर आधार हॉस्पिटल येथे मोबाईल मेडिकल युनिटचे लोकार्पणप्रसंगी हॉस्पिटलमधील डॉक्टर्स,अधिकारी व कर्मचारी.

या मोबाईल मेडिकल युनिटमध्ये मोफत प्राथमिक आरोग्य तपासणी, वैद्यकीय सल्ला, आरोग्य जनजागृती तसेच आवश्यक त्या वैद्यकीय सेवांची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यामुळे नागरिकांना वेळेवर निदान, उपचार आणि आरोग्यविषयक मार्गदर्शन मिळण्यास मदत होणार आहे.

या लोकार्पण सोहळ्यास अ‍ॅस्टर आधार हॉस्पिटलचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. उल्हास दामले तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. डॅलन फर्नांडिस प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

यावेळी यूडीएस फाऊंडेशनचे संस्थापक व संचालक पिन्नापराजू कृष्ण मोहन, अ‍ॅस्टर व्हॉलेंटियर्स विभागाचे प्रादेशिक व्यवस्थापक दादा सरगर, अ‍ॅस्टर आधार हॉस्पिटलचे डायरेक्टर्स डॉ. अजय केणी, डॉ. शैलेंद्र नवरे, डॉ.अजित कुलकर्णी, डॉ.संजय देशपांडे, डॉ. दीपक सहस्रबुद्धे, डॉ.उमेश जोशी, डॉ.अमोल कोडोलीकर तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर आणि हॉस्पिटल कर्मचारी उपस्थित होते.

# खोची ग्रामपंचायतीचे प्रभागनिहाय आरक्षण जाहीर

खोची,ता.१३(वार्ताहर)–

**खोची ग्रामपंचायतीच्या आगामी पंचवार्षिक निवडणुकीसाठी प्रभागनिहाय आरक्षणाची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे.या निवडणुकीत एकूण १३ जागांसाठी मतदान होणार आहे.आरक्षण सोडतसाठी विस्तार अधिकारी एस.एस.शिंदे, ग्रामपंचायत अधिकारी एन.एच.मुल्ला, ग्राममहसूल अधिकारी आझादबी मोमीन,प्रशासक सरपंच रोहिणी पाटील प्रमुख उपस्थित होते.**

प्रभागनिहाय आरक्षणाचा तपशील पुढीलप्रमाणे: प्रभाग १: सर्वसाधारण महिला (१ जागा), सर्वसाधारण पुरुष (२ जागा). प्रभाग २: नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग(ओबीसी) महिला(१ जागा), सर्वसाधारण महिला (१ जागा), सर्वसाधारण पुरुष (१ जागा).प्रभाग ३:नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (ओबीसी) महिला (१ जागा), सर्वसाधारण महिला (१ जागा), सर्वसाधारण पुरुष (१ जागा).प्रभाग ४: अनुसूचित जाती पुरुष(१जागा), सर्वसाधारण महिला (१जागा). प्रभाग ५: नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (ओबीसी) पुरुष (१जागा), सर्वसाधारण महिला (१जागा).

यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष अमरसिंह पाटील, ग्रामपंचायत सदस्य अभिजीत चव्हाण, प्रमोद गुरव,पोलीस पाटील मनोज सपकाळ, आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

# वाशी लघु पाटबंधारे तलावाचे काम गतीने सुरू

## सिंचनाची समस्या सुटणार;तलाव ठरणार हरितक्रांतीचा पाया

बाजारभोगाव,ता.१३(राम करले)–

**पन्हाळा तालुक्यातील वाशी येथील लघु पाटबंधारे तलावाचे काम सध्या वेगाने सुरू असून, या प्रकल्पामुळे परिसरातील शेतकऱ्यांच्या आशा नव्याने बळावल्या आहेत. अनेक वर्षांपासून पाण्याअभावी शेती संकटात सापडत होती. सिंचनाच्या अपुऱ्या सुविधांमुळे शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. मात्र या समस्येची तीव्रता ओळखून आमदार चंद्रदीप नरके यांनी शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा करून या प्रकल्पासाठी निधी मंजूर करून घेतला आणि शेतकऱ्यांच्या स्वप्नांना प्रत्यक्ष आकार दिला.**

शेतकऱ्यांच्या सुख–दुःखाशी नाळ जोडलेले लोकप्रतिनिधी म्हणून आमदार नरके यांची ओळख निर्माण झाली आहे. 'शेतकरी समृद्ध झाला तरच गाव समृद्ध होईल.'या विचारातून त्यांनी या तलावासाठी केलेले प्रयत्न आज यशस्वी होताना दिसत आहेत. त्यामुळे वाशीसह संपूर्ण जांभळी खोऱ्यातील शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.



वाशी येथील लघुपाटबंधारे तलावाच्या भरावाचे काम वेगाने सुरू आहे.

प्रकल्पाची कामे गुणवत्तापूर्ण पद्धतीने सुरू आहेत. कामाच्या प्रत्येक टप्प्यावर प्रशासन दक्षता घेत असून, भविष्यात हा तलाव परिसराच्या विकासाचा महत्त्वाचा केंद्रबिंदू ठरणार आहे.ठेकेदारानेही आवश्यक यंत्रसामग्री व मनुष्यबळ तैनात करून कामाला गती दिली आहे.

तलाव पूर्ण झाल्यानंतर हजारो एकर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळणार असून, शेती उत्पादनात वाढ, भूजल पातळीत सुधारणा आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळणार आहे. त्यामुळे हा प्रकल्प केवळ जलसाठा नसून शेतकऱ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी उभारला जाणारा विकासाचा भक्कम पाया ठरणार आहे. आमदार चंद्रदीप नरके यांच्या शेतकरीप्रेमी भूमिकेचे आणि प्रशासनाच्या कार्यक्षमतेचे सर्वस्तरांतून कौतुक होत असून, 'विकासाची गती आणि शेतकऱ्यांच्या प्रगतीची हमी' अशीच भावना नागरिक व्यक्त करत आहेत. वाशी लघु पाटबंधारे तलाव हा भविष्यात या भागातील हरितक्रांतीचा नवा अध्याय ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे.

> ''वाशी लघु पाटबंधारे तलावाची मागणी आम्ही अनेक वर्षांपासून करत होतो. पाण्याअभावी शेती करणे कठीण झाले होते. आमदार चंद्रदीप नरके यांनी आमच्या अडचणी समजून घेत शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला आणि या तलावासाठी निधी उपलब्ध करून दिला. तलाव पूर्ण झाल्यानंतर शेतीला बारमाही पाणी मिळेल, उत्पादन वाढेल आणि शेतकऱ्यांचे आर्थिक जीवनमान उंचावेल. शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी झटणाऱ्या आमदार नरके यांचे आम्ही मनापासून आभार मानतो. तसेच जलसंधारण विभागानेही दर्जेदार काम करून हा प्रकल्प वेळेत पूर्ण करावा, अशी आमची अपेक्षा आहे.''
> **–भिकाजी पाटील शेतकरी, वाशी.**

# बेळगाव जिल्ह्यात मंत्रीपद कुणाला मिळणार

## संभाव्य यादीत सवदी यांचे नाव आघाडीवर; निवडीकडे सर्वांचे लक्ष

अथणी,ता.१३(प्रतिनिधी)

**राज्यामध्ये डी.के.शिवकुमार सरकार सत्तेवर आल्यानंतर आता मंत्रीमंडळाची पुनर्रचना होणार असल्याने बेळगाव जिल्ह्यात कोणाला मंत्रीपदाचे स्थान मिळणार हे निश्चित झाल्याने आता मंत्री पदासाठी अनेक जण इच्छुक आहेत. यामुळे कुणाला मंत्रीपद द्यायचे आता. हे राजकीय नेत्यांसाठी डोकेदुखी बनली आहे.कोणाला मंत्रीपद द्यावे हा निर्णय पक्षाचे वरिष्ठ घेणार आहेत,तो अंतिमच राहील. त्यामुळे सर्वांना समाधान मानावे लागेल.**

सध्या मंत्रीपदाच्या शर्यतीमध्ये विद्यमान आमदार लक्ष्मण सवदी,आमदार लक्ष्मी हेब्बाळकर,आमदार अशोक पट्टण हे रिंगणात आहेत. सध्या लॉबींगला सुरुवात झाली आहे.मंत्रीपदाची माळ कोणाच्या गळ्यात पडणार याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे. अथणीचे आमदार लक्ष्मण सवदींचे नाव आघाडीवर आहे.अथणीचे आमदार लक्ष्मण सवदी हे भाजप सोडून काँग्रेस पक्षात आल्यानंतर मानाचे स्थान देतो,असे



लक्ष्मण सवदी | अशोक पट्टण | प्रकाश हुक्केरी | लक्ष्मी हेब्बाळकर

आश्वासन काँग्रेस पक्षाच्या वरिष्ठांनी त्यावेळी त्यांना दिले होते.दिलेले आश्वासन आता अंमलात आणावे,अशी मागणी कार्यकर्त्यांकडून होत आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये त्यांनी अनेक विधानसभा मतदारसंघात प्रचार करून उमेदवारांना निवडून आणण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता.बागलकोट,दावणगिरी येथे झालेल्या पोटनिवडणुकीत उमेदवार निवडीसाठी अतोनात प्रयत्न करून त्यांना मोठ्या मतांनी विजय केले आहेत त्यामुळे त्यांना मंत्रीमंडळाच्या पुनर्रचनेच्यावेळी स्थान द्यावे,अशी मागणी होत आहे. राज्यांमध्ये तेली समाजाचे तीन आमदार आहेत.तेली समाज हा काँग्रेसच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे.लक्ष्मण सवदी भाजपमध्ये असताना उपमुख्यमंत्री होते परंतु काँग्रेसमध्ये आल्यानंतर त्यांना कोणतेही पद न दिल्याने नाराजी पसरली आहे अन्यथा भविष्यामध्ये ते मोठा निर्णय घेण्याची शक्यता असल्याने त्याचा फटका काँग्रेस पक्षाला बसण्याची शक्यता नाकारता येत नाही. बेळगाव ग्रामीणचे आमदार लक्ष्मी हेब्बाळकर ह्या गेल्या सिद्धरामया सरकारमध्ये मंत्री होत्या.आता डी.के.शिवकुमार सरकारमध्ये मंत्रीपदासाठी त्यांचेही प्रयत्न सुरू झाले आहेत.रामदूर्गचे आम.अशोक पट्टण यांचे नावही मंत्रीपदासाठी चर्चेत आहे. आमदार प्रकाश हुक्केरी सतत काँग्रेसमध्ये विजय होत असून एकही वेळा पराभूत झाले नाहीत.ते सुद्धा आता मंत्री पदाच्या शर्यतीत आहेत त्यामुळे कोणाला मंत्रीपद मिळणार व पक्षाचे वरिष्ठ काय निर्णय घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे. चिकोडी लोकसभा मतदारसंघातील काँग्रेसचे आमदार गणेश हुक्केरी,प्रकाश हुक्केरी पक्षात निष्ठावंत प्रामाणिकपणे काम करत असून त्यांना मंत्रीपदापासून अनेक वेळा वगळण्यात आले आहे. तरी मंत्रीपद मिळेल काय या निरीक्षणामध्ये असून वरिष्ठांच्या संपर्कात ते आहेत.

### इच्छुकांच्या भाऊगर्दीमुळे नेत्यांची डोकेदुखी वाढली

पक्षाच्या वरिष्ठांनी प्रामाणिकपणे पक्षात कोण आहे याकडे लक्ष देऊन पहावे आणि मंत्रीपद द्यावे.चिकोडी मतदार संघातील हुक्केरी पिता-पुत्र सतत विजयाची माळ गळ्यात घातले आहेत परंतु अजूनही मंत्रीपदाची माळ अजून गळ्यात नाही त्यामुळे मतदार संघातील कार्यकर्ते नाराज असून अनेक जण पक्ष बदलून दुसऱ्या पक्षात गेले परंतु हुक्केरी पक्ष सोडले नाहीत.प्रामाणिकपणे काँग्रेस पक्षातच आहेत.त्यांना थांबा आणि पहा म्हणण्याची वेळ आली आहे. तरी मंत्रीमंडळात कोणाला मंत्रीपदाचे स्थान मिळणार याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

# ठेकेदाराच्या हलगर्जीपणाने गडहिंग्लज शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत

गडहिंग्लज,ता.१३(प्रतिनिधी)-

**गडहिंग्लज चंदगड मार्गाचे रुंदीकरणाचे काम सुरू असताना ठेकेदाराने भडगाव रोडवरील पाणीपुरवठा करणारी पाईपलाईन फोडल्याने गडहिंग्लज शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत झाला. याचा जाब विचारण्यासाठी गडहिंग्लज पालिकेचे उपनगराध्यक्ष महेश सलवादे, बांधकाम सभापती गुंडोपंत पाटील, नगरसेवक उदय परीट, मनसेचे जिल्हाप्रमुख नागेश चौगुले यांच्यासह नगरसेवकांनी रास्ता रोको केला. ठेकेदाराने मनमानी करून पाणीपुरवठा यंत्रणा विस्कळीत केली.**

पाईपलाईन फोडण्यात आली. यासह पाण्याचा व्हॉल्व परस्पर गायब केला.याचा जाब विचारण्यासाठी नगरपालिका पदाधिकाऱ्यांनी आंदोलन छेडत ठेकेदारावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. गडहिंग्लज चंदगड राज्यमार्गाचे रस्ता रुंदीकरण सुरू आहे.भडगाव रोडवरील अश्वारूढ शिवाजी महाराज पुतळा ते संजीवनी हॉस्पिटल दरम्यान रस्ता खुदाई



चंदगड-गडहिंग्लज राज्य मार्ग सुरु असताना गडहिंग्लज येथे रस्त्याचे काम करताना पाणीपुरवठा करणारी पाईपलाईन तोडल्याने संतप्त नगरसेवकांनी रास्ता रोको करत आंदोलन केले.

करताना भडगाव रोड येथील पाणीपुरवठा लाईन ठेकेदाराने फोडल्याने नागरिकांसह नगरपालिका पदाधिकारी संतप्त झाले. त्याचा जाब विचारण्यासाठी या रस्त्याचे

### नगरपालिका पदाधिकाऱ्यांचे रास्ता रोको आंदोलन

कामकाज रोखून रास्ता रोको करण्यात आला.संतप्त नागरिकांसह नगरसेवकांनी ठेकेदाराचा धिक्कार करत याप्रकरणी गुन्हा दाखल करावा, अशी मागणी केली.

बांधकाम सभापती गुंडोपंत पाटील म्हणाले, ठेकेदाराने हलगर्जीपणा दाखवून भडगाव रोडवरील नळ पाणीपुरवठा करणारी पाईपलाईन फोडल्याने प्रभाग क्रमांक ९, १० व ११ मधील नागरिकांना पाणीपुरवठा होऊ शकला नाही. त्याला जबाबदार धरून ठेकेदारावर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी केली.दरम्यान संतप्त नागरिक आणि नगरसेवकांनी थेट चंदगड मार्गावर काम सुरू असलेल्या ठिकाणी रस्त्यावरच ठिय्या मांडला. तातडीने पोलीस घटनास्थळी दाखल झाले.त्यामुळे आंदोलन स्थगित करण्यात आले.

## संजय कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांचे यश

बोरगाव,ता.१३(प्रतिनिधी)-

**येथील श्री विद्यासागर शिक्षण संस्थेच्या संजय कॉलेज ऑफ फार्मसी येथील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्षाच्या प्रथम आणि तृतीय सत्र परिक्षेत घवघवीत यश मिळविले असून सीमाभागासह ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना औषध निर्माणशास्त्राचे दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी प्रयत्न करीत असल्याची माहिती शिक्षण संस्थेच्या सीईओ ऐश्वर्या हावले यांनी दिली.**

बोरगांव येथील श्री विद्यासागर शिक्षण संस्थेच्या संजय कॉलेज ऑफ फार्मसी, विद्यार्थ्यांनी चालू शैक्षणिक वर्षातील प्रथम सत्राच्या व तृतीय सत्राच्या परीक्षेतील निकाल जाहीर व गुणी विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ प्रसंगी त्या बोलत होत्या.स्वागत व प्रास्ताविक अपेक्षा कोगनोळे यांनी केले.राजीव गांधी आरोग्य विज्ञान विद्यापीठ, बेंगळुरू यांच्या अंतर्गत घेण्यात आलेल्या फार्मसी परिक्षेत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट गुण मिळवून यश प्राप्त केले आहेत.यामध्ये तिसऱ्या सत्रामध्ये गायत्री चव्हाण हिने ७९.४५ टक्के गुण मिळवून कॉलेजमध्ये प्रथम, तर पहिल्या सत्रामध्ये श्रेया पाटील हिने ७६.२० टक्के गुण मिळवून प्रथम, सुहाना गवंडी हिने ७३.३६ टक्के गुण मिळवून व्दितीय तर ऋतुजा कामगोंडा हिने ७१.२४ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळवला. यावेळी फार्मसी कॉलेजचे प्रिन्सिपल संदीप मुरतले, कॉन्व्हेन्ट शाळेचे मुख्याध्यापक राजू खिचडे, प्रा.दर्शन पाटील, प्रीती मगदूम, अजित हावले, सुजित लाटवडे, तुषार बोरगावे, अभिजीत मानगावे, रमेश हेगाजे, आनंद फिरगन्नावर वि.के.थोरात उपस्थित होते.

# ऊस उत्पादन वाढीसाठी पाणी नियोजन महत्वाचे-डॉ.पाटील

बेडकिहाळ,ता.१३(वार्ताहर)-

**निपाणी, चिकोडी तालुक्यात सतत वाहणाऱ्या नद्यांच्यामुळे या परिसरात ऊस शेतीला चांगले दिवस आले आहेत.या भागातील शेतकरी आपल्या शेती क्षेत्रात अधिक ऊस उत्पादन घेण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहेत. पण अधिक उतारा मिळविण्यासाठी प्रमाणापेक्षा अधिक खत व पाण्याचे व्यवस्थित नियोजन नसल्याने जमिनीची पिकाऊ क्षमता घटत असून, उत्पादनही अपेक्षित साध्य होणार नाही.**

ऊस शेतीत वर्षा वर्षांला एकच पीक घेण्यापेक्षा फेरपालट पीक महत्त्वाचे आहे.त्याच बरोबर रासायनिक खतांचे व पाण्याचे नियोजनही तितकेच महत्वाचे आहे.



ऊसपीक मार्गदर्शक मेळाव्याचे दीपप्रज्वलन करून उद्घाटन करताना बाबासाहेब चौगुले,ए.बी पाटील व इतर मान्यवर.

शेतकऱ्यांनी शेती क्षमता वाढविण्यासाठी सेंद्रिय खतांचा वापर करावा, असे मत कृषी शास्त्रज्ञान डॉ.एस.बी.पाटील यांनी व्यक्त केले.

ते कल्लाप्पाण्णा आवाडे जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखाना (हुपरी) व कर्नाटक कृषी खाते चिकोडी व निपाणी यांच्या सहकार्याने श्री १०८ विद्यानंदी ज्ञान केंद्र,नेज क्रॉस येथे आयोजित करण्यात आलेल्या शेतकरी मार्गदर्शन मेळाव्याप्रसंगी आवर्षण परिस्थितीत ऊस पीक नियोजन या विषयी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.अध्यक्षस्थानी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष बाबासाहेब चौगले हे होते.तर कृषी निर्देशक सहदेव एरगुप्पा, कृषी अधिकारी डॉ. डी. एस.कौजलगी उपस्थित होते.मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.स्वागत व प्रास्ताविक किरण कांबळे यांनी केले.यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी ऊस शास्त्रज्ञ डॉ.पाटील, डॉ.दळवाई यांच्याशी ऊस शेतीबद्दल चर्चा साधली. यावेळी दादासाहेब सांगावे, सुनील नारे, शीतल अम्मानवर, सुनील पाटील, बी. एस. तुकानट्टे, दत्तात्रय म्हेत्रे, सुमेरु पाटील, शेखर पाटील, कृषी अधिकारी एन. ए. जाधव, अनुराधा हलकुंद, भास्कर पटणकुडे, अनिल चौगले,अजित चौगले यांच्यासह बेडकिहाळ, शमनेवाडी, नेज व परिसरातील शेतकरी उपस्थित होते. बाळासाहेब पाटील यांनी सूत्रसंचालन केले. दादासाहेब सांगावे यांनी आभार मानले.

## म.बसवेश्वर हुन्नूरगी शाखा अध्यक्षपदी शिंत्रे,उपाध्यक्षपदी मुरदंडे

निपाणी,ता.१३(प्रतिनिधी)-

**सहकार क्षेत्रातील अग्रेसर असलेल्या श्री महात्मा बसवेश्वर क्रेडीट सौहार्द सहकारी नियमित निपाणीच्या हुन्नूरगी शाखेच्या अध्यक्षपदी वसंत शिंत्रे व उपाध्यक्षपदी अशोक मुरदंडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.**

प्रारंभी संस्थेचे सहकाररत्न संस्थापक चेअरमन डॉ. सी. बी. कुरबेटी, चेअरमन किशोर बाली यांच्या हस्ते प्रतिमापूजन झाले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन किशोर बाली हे होते.दीपप्रज्वलन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रारंभी



वसंत शिंत्रे | अशोक मुरदंडे

संस्थेचे मावळ ते चेअरमन पायगोंडा पाटील तर नूतन चेअरमन वसंत शिंत्रे यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी बोलताना शाखा संचालक सुदीप मुरदंडे यांनी शाखेचा प्रगतीचा आढावा सादर करताना शाखेत १० कोटी ४३ लाखाच्या ठेवी व कर्जे वितरण ५, कोटी ८ लाख व स्वनिधी ४५ लाख व शाखेची वसुली ९५ टक्के तसेच तसेच वार्षिक उलाढाल ३८ कोटी, ३१ मार्च २०२६ अखेर शाखेस २२ लाख ३२ हजार नफा झाल्याचे सांगितले.कार्यक्रमास हेड ऑफिस संचालक डॉ. एस. आर.पाटील, प्रताप पटणशेट्टी, अशोक लिगाडे, महेश बागेवाडी, सुरेश शेट्टी, दिनेश पाटील, राजेश पाटील, पुष्पा कुरबेट्टी, विजया शेट्टी, सुवर्णा पट्टणशेट्टी, सीईओ एस.के अदनावर,युसुफ मुल्ला,देवाप्पा कांबळे,रामगोंडा पाटील,चंद्रकांत खोत,मोहन गोरडे,दत्तात्रय किल्लेदार,बाहुबली मगदूम,व ग्रामस्थ उपस्थित होते.आभार राजेंद्र माळगे यांनी मानले.

# वीजवितरण कार्यालयासमोर शंखध्वनी आंदोलन

## स्मार्ट मीटरची सक्ती न करण्याची शिवसेनेची मागणी

आजरा,ता.१३(प्रतिनिधी)

**येथील वीज वितरण कंपनीच्या कार्यालयासमोर शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने शंखध्वनी आंदोलन करण्यात आले. स्मार्ट मीटर बाबत ग्राहकांना सक्ती करू नये,अशी मागणी करण्यात आली. नही चलेगी.. नही चलेगी दादागिरी नही चलेगी अशा घोषणाही यावेळी देण्यात आल्या. अधिकाऱ्यांनी वरिष्ठांशी चर्चा करून कार्यवाही करू. कोणावरही सक्ती करणार नाही,अशी ग्वाही दिल्यावर आंदोलन मागे घेण्यात आले.**

उबाठाचे जिल्हा उपप्रमुख संभाजी पाटील यांच्या नेतृत्वाखाली ठिय्या आंदोलन झाले. तालुका प्रमुख युवराज पोवार म्हणाले,



स्मार्ट मीटर बसवण्याबाबत कोणीही सक्ती करू नये. ग्राहकांवर स्मार्ट मीटर बसवण्यासाठी दबाव आणल्यास जनता गप्प बसणार नाही.तशी वेळ आल्यास कायदा हातात घेण्यास भाग पाडू नका. देश पातळीवरून स्मार्ट मीटर बसवण्यासाठी सुचना आल्या तरी तामिळनाडूचे मुख्यमंत्र्यांनीच याला विरोध केला आहे. या राज्यानेही तो निर्णय घ्यावा.यावेळी अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. कर्मचाऱ्यांनी उध्दट भाषा ग्राहकांना करू नये. तालुक्यातील गंजलेले विद्युत खांब बदलावे यांच्यासह अन्य मागण्या करण्यात आल्या. अधिकाऱ्यांवर प्रश्नांची सरबत्ती करण्यात आली.यावेळी उपतालुका प्रमुख संजय येसादे, शहर प्रमुख समीर चांद, सागर नाईक, शेतकरी सेनेचे तालुका अध्यक्ष दिनेश कांबळे, महेश पाटील, सुयश पाटील, अमित गुरव, रवी सावंत, राजू बंडगर, दयानंद भोपळे, हणमंत पाटील,प्रभाकर कोरवी यांच्यासह शिवसैनिक उपस्थित होते.

# जाचक अटी रद्द करून सरसकट कर्जमाफी द्या

## राष्ट्रवादी शरद पवार गटाची मागणी

गारगोटी,ता.१३(प्रतिनिधी)-

**राज्यातील शेतकऱ्यांसाठी शासनाने पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना जाहीर केली आहे. या योजनेतील जाचक अटी आणि शर्ती बघता ही कर्जमाफी आहे की कर्जवसुली आहे हेच कळेनासे झाले आहे.**

या अटीमुळे लाखो शेतकरी कर्जमाफी पासून वंचित राहणार आहेत.त्यामुळे या योजनेतील जाचक अटी रद्द कराव्यात, अशी मागणी भुदरगड राधानगरी तालुका राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने केली आहे.याबाबतची मागणी त्यांनी भुदरगड व राधानगरी तहसीलदार यांच्याकडे केली आहे.निवेदनात म्हटले आहे की,या योजनेत सन



भुदरगड तहसीलदार यांना निवेदन देताना राष्ट्रवादी शरद पवार गटाचे संतोष मेंगाणे, मानसिंग देसाई आदी मान्यवर.

२०१९ ते २०२६ पर्यंत घेतलेल्या अल्पमुदत पीक कर्जाची २ लाख पर्यंतची कर्जमाफी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.परंतु २०१९ च्या महात्मा जोतिराव फुले कर्जमाफी योजनेचा लाभ घेतला आहे.त्या शेतकऱ्यांना केवळ ५० हजार रुपयेच कर्जमाफी योजनेचा लाभ मिळणार आहे.२०१९ साली जवळ जवळ ३३ लाख शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेतला आहे, -त्यांना या योजनेचा पूर्ण लाभ मिळणार नाही.शिवाय या योजनेत ज्या शेतकऱ्यांचे कर्ज दोन लाखाच्या वर आहे त्यांनी एकवेळ समझोता अंतर्गत, दोन लाखावरील रक्कम भरली तरच त्यांना दोन लाख रुपये कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे. अशा अनेक जाचक अटी आहेत. तरी या जाचक अटी रद्द कराव्यात, अशी मागणी करण्यात आली. निवेदन देताना संतोषदादा मेंगाणे, धनराज चव्हाण, मानसिंगदादा देसाई, तालुका महिला अध्यक्षा सौ. सुनंदामाई देसाई व हर्ष मेंगाणे उपस्थित होते.

## संकेश्वरात पंतप्रधान मोदींच्या तपपूर्ती कारकिर्दीचा आनंदोत्सव

संकेश्वर,ता.१३(प्रतिनिधी)-

**येथील भाजपा कार्यकर्त्यांनी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजींनी सलग १२ वर्षे ४ हजार ३९९ दिवसांचा ऐतिहासिक टप्पा पूर्ण केलेबद्दल श्री राम मंदिरात पूजा अभिषेक करुन पेढे वाटपाने आनंदोत्सव साजरा केला.**

श्री राम मंदिरात समाजसेवक जयप्रकाश सावंत त्यांच्या पत्नी माजी उपनगराध्यक्षा सौ.सविता सावंत यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदीजींची तपपूर्ती यशस्वी कारकीर्द श्री राम चरणी अभिषेकने अर्पण केली. यावेळी बोलताना जयप्रकाश सावंत, संदीप दवडते यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी हुक्केरी विद्युत संघाचे संचालक गजानन क्वळी,शिवानंद मुडशी, सुनील पर्वतराव,दिपक भिसे, सचिन भोपळे, संदीप दवडते, अप्पासाहेब बोरे, प्रदीप माणगांवी, प्रशांत पाटील, संदीप गंजी, आनंद शेंडे, कुमार संसुध्दी, शकुंतला खानाई, मंजुळा वाली, सुश्मिता बडिगेर, माला गुडशी, सरला कमते, अल्पना पाटील, भारती संकेश्वरी, शोभा मगदूम,बसव्वा कलगडगी वभाजप कार्यकर्ते उपस्थित होते.

### निधन वार्ता

**सुमन पाटील**

कबनूर,ता.१३-

कबनूर गावच्या प्रतिष्ठित



महिला श्रीमती सुमन इरगोंडा पाटील (वय ६८) यांचे निधन झाले.त्या माजी उपसरपंच सुधीर इरगोंडा पाटील यांच्या मातोश्री होत्या.त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.त्यांच्या निधनाने परिसरातून हळहळ व्यक्त होत आहे.

**शिवाजी चौगुले**

गारगोटी,ता.१३(प्रतिनिधी)

म्हसवे (ता.भुदरगड) येथील शिवाजी बापूसो चौगुले (वय ७७) यांचे निधन झाले.



त्यांच्या पश्चात तीन भाऊ व मोठा परिवार आहे. वृत्तपत्र एजंट संभाजी बापू चौगुले यांचे ते ज्येष्ठ बंधू होते.

# तंबाखूमुक्त समाजासाठी प्रत्येकाने पुढे यावे

## न्यायाधीश विजय कुमार ;चिकोडीत व्यसनमुक्ती केंद्राचे उद्घाटन

चिकोडी,ता.१३(प्रतिनिधी)-

**आरोग्यपूर्ण आणि आनंदी जीवनासाठी तंबाखूचा पूर्ण त्याग करणे आवश्यक आहे.तंबाखूमुक्त समाज घडविण्यासाठी प्रत्येक नागरिकाने आपल्या कुटुंबात आणि परिसरात जनजागृती करण्याची जबाबदारी घ्यावी, असे आवाहन सातवे अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश विजय कुमार यांनी केले.चिकोडीत तंबाखूमुक्त जनजागृती रॅली काढून तंबाखू व्यसनमुक्ती केंद्राचे उद्घाटनही करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.**

के.एल.ई.आयुर्वेद वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, के. एल. ई.नर्सिंग महाविद्यालय व विविध विभागांच्यावतीने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. तालुका आरोग्य



चिकोडी : येथे तंबाखूमुक्त जनजागृती रॅलीचा प्रारंभ करताना न्यायाधीश विजयकुमार व इतर.

अधिकारी डॉ.आर.एस.खणदाळे म्हणाले, तंबाखू सेवनाच्या दुष्परिणामांविषयी लोकांमध्ये जागृती करणे अत्यंत गरजेचे आहे.अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक बदल घडू शकतो.

के.एल.ई.आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किरणकुमार मुत्नाळी म्हणाले, भारतात सुमारे २६७ दशलक्ष लोक तंबाखूचा वापर करतात. देशातील २८ टक्के प्रौढ तंबाखू सेवन करतात.त्यात ४२ टक्के पुरुष आणि १४ टक्के महिला आहेत. दरवर्षी सुमारे १३ लाख लोकांचा मृत्यू तंबाखूजन्य आजारांमुळे होतो. तोंडाच्या कर्करोगातील सुमारे ९० टक्के प्रकरणे तंबाखू सेवनाशी संबंधित आहे.यावेळी जनजागृती रॅली अंकली खूट येथून सुरू होऊन के.सी. रोड मार्गे मध्यवर्ती बसस्थानकापर्यंत काढण्यात आली. रॅलीत विद्यार्थ्यांनी तंबाखूविरोधी घोषणा देत नागरिकांचे लक्ष वेधले.विविध फलक,घोषवाक्ये आणि संदेशांद्वारे तंबाखूचे दुष्परिणाम प्रभावीपणे मांडण्यात आले.उपनिरीक्षक बसगौडा नेर्ली यांनीही मनोगत व्यक्त केले.जिल्हा तंबाखू व्यसनमुक्ती केंद्राच्या प्रमुख डॉ.श्वेता पाटील यांनी केंद्राच्या सेवा, समुपदेशन आणि उपचार पद्धती याबाबत माहिती दिली. जिल्हा मानसिक आरोग्य केंद्राचे डॉ.उत्तम शेलार यांनीही मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास प्रांताधिकारी सुभाष संपगावी,वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश अरुणकुमार, आर.बी. हित्तलमणी,आर.एम.मिरजे, अन्नपूर्णा चौगला, मीनाक्षी पाटील, बसवराज बी.व अधिकारी उपस्थित होते.प्रास्ताविक डॉ. कोमल जाधव यांनी केले. सूत्रसंचालन डॉ.सुधींद्र होनवाड यांनी केले,तर महांतेश गुडनवर यांनी आभार मानले.



कुर्ली येथे कुपनलिका कार्यान्वितप्रसंगी किरण निकाडे, दादासाहेब पाटील, प्रमोद कांबळे, शैलेंद्र वड्डुर व मान्यवर.

## कुर्ली येथे कुपनलिका खोदल्याने पाण्याची समस्या मार्गी

कोगनोळी,ता.१३(प्रतिनिधी)-

**आमदार शशिकला जोल्ले आणि बेळगाव जिल्हा बँकेचे अध्यक्ष व माजी खासदार आण्णासाहेब जोल्ले यांच्या विशेष प्रयत्नातून कुर्ली (ता. निपाणी) येथील एस.सी.कॉलनीमध्ये पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली होती. त्याची दखल घेऊन कुपनलिका चालू करुन पिण्याच्या पाण्याची समस्या मार्गी लावण्यात आली. त्यामुळे ग्रामस्थांतून समाधान व्यक्त होत आहे.**

यावेळी हालसिद्धनाथ सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक किरण निकाडे, माजी ग्रामपंचायत सदस्य दादासाहेब पाटील, प्रमोद कांबळे, युवराज पाटील, शैलेंद्र वड्डुर, सचिन पाटील, विजय साजणे, कृष्णात कोरवी, मनिषा पाटील यांच्यासह अन्य मान्यवर, महिला व ग्रामस्थ उपस्थित होते.

# कन्नड शाळांकडील दुर्लक्ष;आंदोलनाचा इशारा

**सांगली,ता.१३ (प्रतिनिधी)–**

**जत तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या कन्नड शाळांकडे जिल्हा परिषदेच्या प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. कन्नड शाळांकडे लक्ष देऊन कन्नड शिक्षकांच्या रिक्त जागा भरण्यासह मागण्या पूर्ण करा, अन्यथा कन्नड शिक्षक संघटनेच्यावतीने संख (ता. जत) येथे २० जूनपासून बेमुदत उपोषण करण्यात येईल असा इशारा दिला आहे. आदर्श कन्नड बळग या शिक्षक संघटनेने याबाबत जिल्हा परिषदेत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे.**

संघटनेने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, कन्नड भाषिक शिक्षकांसाठी आगामी टीईटी (शिक्षक पात्रता परीक्षा) कन्नड माध्यमातूनच घ्यावी. कन्नड माध्यमांच्या शाळांवर कन्नड भाषिक केंद्रप्रमुखाचीच नियुक्ती करावी. कन्नड शाळांमधील शिक्षकांच्या १२५ रिक्त जागा त्वरित भराव्यात, तेथील मराठी शिक्षकांचे अन्य शाळांत समायोजन करावे. सर्व शालेय पुस्तके व डिजिटल साहित्य कन्नड भाषेत उपलब्ध करावे, कन्नड माध्यमात अनुसुचित जाती प्रवर्गातील शिक्षक उपलब्ध होत नसल्याने तेथे अन्य प्रवर्गातील उमेदवारांना संधी देऊन जागा त्वरित भराव्यात, महात्मा बसवेश्वर विकास महामंडळाकडून कन्नड शाळांच्या विकासासाठी निधी मिळावा आणि विद्यार्थ्यांसाठी बसवेश्वर विद्यापीठ स्थापन करावे. स्पर्धा परीक्षांसाठी कन्नड माध्यम उपलब्ध असावे. कन्नड शाळांकडे जिल्हा परिषदेचे दुर्लक्ष होत असल्याने कन्नड विद्यार्थी व शाळांचे भवितव्य अंधारात असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. हे दुर्लक्ष थांबवले नाही तर त्याविरोधात संख अपर तहसील कार्यालयासमोर आंदोलन केले जाणार आहे.निवेदन देण्यासाठी संघटनेचे अध्यक्ष मलिकजान शेख, कांतेश सन्नोळी, गुरुबसू वाघोले, दऱ्याप्पा कट्टीमणी आदी उपस्थित होते.

# हळदीचा बंधारा कोसळण्याच्या उंबरठ्यावर

**हळदी,ता.१३ (प्रतिनिधी)–**

**करवीर तालूक्यातील राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या दूरदृष्टीतून उभारलेला हळदी येथील कोल्हापूर पद्धतीचा बंधारा आज अक्षरश: मरणासन्न अवस्थेत पोहोचला आहे. बंधाऱ्याच्या दुरुस्तीसाठी निधी मंजूर होऊन दोन वर्षे उलटली, मात्र प्रत्यक्षात कामाचा श्रीगणेशा झालेला नाही. परिणामी बंधाऱ्याचे अनेक पिलर ढासळले असून मध्यभागी मोठे भगदाड पडले आहे. बंधारा अखेरची घटका मोजत असतानाही पाटबंधारे विभागाने बघ्याची भूमिका घेतल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.**



गेल्या दहा वर्षांत या बंधाऱ्यावर लाखो रुपयांचा निधी खर्च झाल्याचे सांगितले जाते. मात्र, आजही बंधाऱ्याची अवस्था दिवसेंदिवस खालावत चालली आहे. पाणी साठवणूक होत नसल्याने शेतकऱ्यांना मुरूम टाकून पाणी अडवावे लागत आहे. विशेष म्हणजे, कुर्डू पाणीपुरवठा संस्थेला दरवेळी २० ते २५ हजार रुपये खर्च करून तात्पुरती पाणी साठवणूक करावी लागत आहे. प्रशासनाच्या उदासीनतेमुळे हा अतिरिक्त आर्थिक भार ग्रामस्थांवर पडत आहे.बंधाऱ्यातील पाणीपातळी घसरताच शेतीपंप बंद पडतात. त्याचा थेट परिणाम पिकांवर होत आहे. हळदीसह नदीकाठच्या गावांच्या पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत आहे.

# सदस्यांना विश्वासात घेऊन योजना राबवा

## बांधकाम समिती सभापती पृथ्वीराज पाटील

**सांगली,ता.१३ (प्रतिनिधी)–**

**केंद्र,राज्य आणि जिल्हा परिषद स्तरावरील विविध योजनांच्या निधीचा प्रभावी वापर करा, योजना राबविताना सदस्यांना विश्वासात घ्या असा सूचना बांधकाम समितीचे सभापती पृथ्वीराज पाटील यांनी दिल्या.**

जिल्हा परिषदेत अर्थ समितीची सभा झाली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी सदस्य वर्षा जाधव, शशिकांत जमदाडे, साईतेजस्वी देशमुख, सुजाता पाटील, सुनील पवार, संजय बनसोडे, जयदीप भोसले, प्रियंका महाडिक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी सुनंदा ठवळे उपस्थित होत्या.

यावेळी विविध योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला. जिल्हा परिषदेचा स्वनिधी, हस्तांतरण अनुदान तसेच वित्त आयोगाच्या निधीच्या खर्चाचा विभागनिहाय आढावा घेऊन प्रलंबित कामे तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना संबंधित विभागांना देण्यात आल्या.

# भाविक,पर्यटकांवर लादल्या जाणाऱ्या प्रवेश करास हिंदू एकताकडून विरोध

**कोल्हापूर,ता.१३ (प्रतिनिधी)–**

**कोल्हापूर महानगर पालिकेकडून अंबाबाई देवीच्या दर्शनासाठी संपूर्ण देशभरातून कोल्हापूर नगरीत येणाऱ्या भाविकांवर आणि पर्यटकांवर 'प्रवेश कर' आकारण्याचा ठराव महानगरपालिकेच्या महासभेत मंजुरीसाठी येत आहे. महा नगरपालिका प्रशासनाचा हा अन्यायकारक निर्णय भाविकांची आर्थिक लूट करणारा असल्याचा आरोप करत हिंदू एकता आंदोलनने याचा निषेध केला.**

महानगरपालिका प्रशासन भाविकांना आणि पर्यटकांना पिण्याचे पाणी, स्वच्छ स्वच्छतागृहे, पार्किंग किंवा वाहतूक नियंत्रण यांसारख्या मूलभूत सुविधा देण्यात अपयशी ठरल्याचा आरोप या प्रसिध्दी प्रत्रकात केला आहे. तसेच महानगरपालिकेतील सर्व नगरसेवकांना, आणि राजकीय पक्षांना या जाहीर पत्रकाद्वारे आव्हान केले आहे की स्वत:ला 'हिंदुत्ववादी' म्हणवून घेणाऱ्या नगरसेवकांनी या महासभेत हिंदू भाविकांवर अन्याय करणाऱ्या या ठरावाला आणि प्रस्तावाला कडाडून विरोध केलाच पाहिजे. केवळ निवडणुकांपुरते हिंदुत्व न मिरवता, हिंदू पर्यटकांच्या आणि भाविकांच्या रक्षणासाठी त्यांनी सभागृहात आपली भूमिका स्पष्ट करावी. असे हिंदू एकता आंदोलन जिल्हा अध्यक्ष दिपक देसाई यांनी सांगितले.

बैठकीला उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्ते, हिंदू एकता आंदोलनाचे जिल्हा अध्यक्ष दिपक देसाई, विलास मोहिते, हिंदूराव शेळके, वैभव कवडे, सुधारक वडगावकर, बाबु साखळकर, अनिरुद्ध कोल्हापूरे, केदार मुनिश्वर, अनिकेत पवार यांसह हिंदू एकता आंदोलनचे प्रमुख पदाधिकारी आणि शहरातील हिंदुत्ववादी कार्यकर्ते उपस्थित होते.

# ऑनलाईन योग सत्रातून आज सहभागी होण्याचे आवाहन

**कोल्हापूर,ता.१३ (प्रतिनिधी)–**

**आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने आयुष मंत्रालय, भारत सरकार आणि हॅबिल्ड हेल्थटेक प्रा. लि. यांच्या संयुक्त विद्यमाने एका ऐतिहासिक ऑनलाइन योग सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाद्वारे एकाच वेळी जास्तीत जास्त लोकांनी ऑनलाइन योगासने करून गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड प्रस्थापित करण्याचा मानस आहे. या जागतिक विक्रमाचा भाग बनण्याची सुवर्णसंधी सर्व नागरिकांना उपलब्ध झाली आहे.**

या कार्यक्रमानुसार दिनांक १४ जून सकाळी ६.१५ ते ७.१५ वाजता आयुष मंत्रालयाचे अधिकृत युट्युब चॅनेल (ऑनलाइन) सहभागी होता येणार आहे. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी १८००-३१५-७००८ या टोल-फ्री क्रमांकावर मिस्ड कॉल द्यावा. मिस्ड कॉल दिल्यानंतर नोंदणी पूर्ण होईल आणि सहभागीस सत्राची लिंक तसेच आवश्यक सूचना संदेश किंवा व्हॉट्सॲपद्वारे प्राप्त होईल. गिनीज वर्ल्ड रेकॉर्डसाठी प्रत्येक सहभाग ग्राह्य धरला जावा.

आपले आरोग्य सुधारण्याबरोबरच देशाचे नाव जागतिक स्तरावर उंचावण्यासाठी या उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच सर्व अधिकारी, कर्मचारी, नातेवाईक, मित्रमंडळी आणि सहकाऱ्यांनाही या उपक्रमात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी विद्या शिरस यांनी केले आहे.

## सर्जिकल विभागातील खरेदी प्रकरण

# गैरव्यवहार करणाऱ्यांवर कारवाई करा

## उबाठा गटाची मागणी

**कोल्हापूर, ता. १३ (प्रतिनिधी)–**

**येथील राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व संलग्नित रुग्णालय येथील सर्जिकल विभागातील साधन सामुग्री खरेदी प्रकरणामध्ये झालेल्या गैरव्यवहारात सहभागी असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर तात्काळ कारवाई करावी अशी मागणी शिवसेना (उबाठा) उपनेते संजय पवार यांनी वैद्यकीय शिक्षण संचालिका डॉ. पल्लवी सापळे यांच्याकडे निवेदनाव्दारे केली.**



या गैरव्यवहारामध्ये फक्त पूरवठादारावर कारवाई करण्यात आली आहे व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर विभागीय चौकशी करुन दोषारोपत्र व त्या अन्वये कागदपत्रे तात्काळ सादर करण्याचे आदेश देण्यात आले होते. परंतू या खरेदी समितीमध्ये सहभागी असलेले अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांवर कोणतीही कार्यवाही झाल्याचे दिसून येत नसल्याचा आरोप करत खरेदी प्रक्रियेत सहभागी अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द तात्काळ कारवाई करावी.याप्रकरणी तपास स्वच्छ आणि पारदर्शक होण्यासाठी तसेच शासनाचा महसूल बुडवला गेला आहे त्याची वसूली करणेसाठी सदर अधिकारी व कर्मचाऱ्यांची अन्यत्र बदली अथवा डेप्यूटेशनवर इतरत्र पाठवावे अशीही मागणी यावेळी करण्यात आली. अन्यथा या संदर्भात न्यायालयात जाण्याचा इशाराही त्यांनी दिला. यावेळी संजय पवार, विजय देवणे, प्रसाद कुलकर्णी, युवराज खंडागळे, संजय जाधव, महादेव कुकडे, दिलीप देसाई, सुमित मेळवंकी, भरत आमते, संतोष रेडेकर, स्मिता सावंत, दिनेश परमार, आसावरी सुतार, सुनील कोंडेकर, सुधीर चिले, दिनेश साळोखे, अभिजीत बुकशेट, प्रवीण पालव इ. उपस्थित होते.

* **गुवाहाटी,ता.१३–**

राज्यातील बेकायदेशीर घुसखोरीला आळा घालण्यासाठी आसाम सरकारने एक महत्त्वपूर्ण आणि कठोर निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आता १८ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या व्यक्तींना नवीन आधार कार्ड जारी केले जाणार नाही, असा निर्णय घेण्यात आला.

## खरेदीपुर्व जाहीर नोटीस

१) **मिळकतीचे वर्णन–** जि. कोल्हापूर, ता. हातकणंगले, पैकी का इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील व श्री आदिनाथ को. ऑप. हौसिंग सोसायटी लि. इचलकरंजी या गृहनिर्माण संस्थेच्या मालकीचे मिळकतीचा रि.स.नं. ६४४ पैकी सभासद नात्याने अलौट केलेला **बिगरशेती प्लॉट नं. २४** क्षेत्र २२३.१४ चौ.मी याचे २४०० चौ. फुटाची खुली जागा यांसी चतु:सिमा– **पुर्वेस** – सदर रि.स.नं. पैकी प्लॉट नं. २५/अ ची मिळकत, **पश्चिमेस** – रस्ता, **दक्षिणेस** – सदर रि.स.नं.पैकी बिगरशेती प्लॉट नं.२७ ची मिळकत, **उत्तरेस** – सदर रि.स.नं. पैकी बिगरशेती प्लॉट नं. २३ ची मिळकत.

२) वर नमुद केलेली मिळकत ही सौ. राजश्री देशभुषण रुग्गे, रा. इचलकरंजी यांची सभासद नात्याने मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची असून त्यांनी सदरची मिळकत ही निर्वेध व निष्कर्जी असलेचा निर्वाळा आमचे अशिलांना देवून संचकार दाखल रक्कम स्विकारून मिळकत विक्रीचे संचकारपत्र करुन दिले आहे. सबब, वर नमुद मिळकतीबाबत कोणाचाही हक्क, दावा, पोटगी अर्ज,आरक्षण, तारणगहाणदस्त अगर इतर कोणत्याही प्रकारची हरकत असलेस त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ (सात) दिवसाचे आंत खाली नमुद केले पत्यावर लेखी कळवावे. म्हणून दिली जाहीर नोटीस ता. १३/०६/२०२६ इ. रोजीचे.

**ॲड.सुनिल सु.धुपदाळे**
**रा.१७/२९४, पुजारी मळा, राजमातानगर,**
**इचलकरंजी मो.९३२६०२२३८५**

# ऑनलाईन खत विक्री प्रकल्पाचा शासनाने फेरविचार करावा

## कृषी सेवा केंद्र चालकांची मागणी;अन्यथा कृषी सेवा केंद्रे बंद करण्याचा इशारा

**कोल्हापूर,ता.१३(प्रतिनिधी)–**

**राज्य शासनाने फ्रेमवर्क फॉर फर्टिलायझर सेल हा पथदर्शी प्रकल्प कोल्हापूर जिल्हयात प्रायोगिक तत्वावर सुरु केला आहे,या प्रकल्पाला सुरुवाती पासूनच अडथळयाची शर्यत पार करावी लागत आहे, त्यातच भर म्हणजे जिल्ह्यातील कृषी सेवा केंद्र चालकांनी विशेषत: खत विक्रेत्यांनी या पथदर्शी प्रकल्पाला विरोध दर्शविला आहे.**

खरीप हंगामाच्या तोंडावरच हे ॲप आणल्याने त्याचा वापर करणे अडचणीचे होऊ लागले आहे. यासाठी तत्काळ शासनाने यामध्ये बदल करावा, अशी मागणी कृषी सेवा केंद्र चालकांनी केली असून जिल्हयातील या विक्रेत्यानी जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील महावीर ग्रार्डन येथे बैठक घेऊन शासनाच्या या निर्णयाला विरोध केला. जर शासनाने सोमवारपर्यंत योग्य निर्णय दिला नाही. तर सर्व कृषी सेवा केंद्र बंद करण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. यावेळी ॲग्रो इन्फुट डिलर्स असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष मनमोहन कलंत्री माफदा, राज्याचे अध्यक्ष विनोद तराळ -पाटील, कोल्हापूर जिल्हा संघटनेचे अध्यक्ष विनोद पाटील, उपाध्यक्ष विकास कदम, सचिव सागर खाडे यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातील खत विक्रेते दीड हजार पॉज मशीन घेऊन उपस्थित होते.

या कृषी सेवा केंद्र चालकांची प्रमुख मागणी म्हणजे, खत विक्रीत केंद्र शासनाने सुरू केलेल्या ऑनलाईन खत विक्रीमध्ये बदल करुन पूर्वीप्रमाणेच ऑफलाइन विक्री करण्यास परवानगी द्यावी. ही असून शासनाने या धोरणात बदल केला नाही तर खत विक्री बंद करण्याचा इशारा खत विक्रेत्यांनी दिला आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सर्व कृषी सेवा केंद्र चालकांनी आपले पॉज मशीन शासनाकडे परत करण्याचा निर्णय घेतला असून जिल्ह्यातील दीड हजार पॉज मशीन घेऊन सर्व विक्रेते जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ महावीर गार्डन येथे जमले होते. ५ जूनपासून केंद्र शासनाने ऑनलाईन खत विक्री प्रणाली सुरू केली आहे. मात्र या प्रणालीमुळे अनेक समस्या भेडसावत आहेत. आतापर्यंत या ऑनलाईन प्रणालीव्दारे केवळ एक हजार मेट्रिक टन खताची प्रत्यक्ष विक्री झाली आहे.

यावेळी राष्ट्रीय अध्यक्ष मनमोहन कलंत्री यांनी उपस्थित विक्रेत्यांना मार्गदर्शन केले. तसेच कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, गुणनियंत्रक संचालक सुनील बोरकर यांच्याशी मोबाईलद्वारे संवाद साधून विक्रेत्यांच्या अडचणी सांगितल्या. आपण याबाबत निर्णय घेऊन ऑनलाइन खत विक्रीमधून विक्रेत्यांना सवलत द्यावी, अशी मागणी केली.

# भाजपाच्यावतीने १५ जूनला कोल्हापुरात 'सेवा अभियान'

**कोल्हापूर,ता.१३ (प्रतिनिधी)–**

**भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आमदार रविंद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली कोल्हापूर जिल्ह्यात नागरिकांच्या विविध प्रलंबित शासकीय व शैक्षणिक प्रश्नांच्या निवारणासाठी सोमवार, दि. १५ जून २०२६ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी ४.०० या वेळेत भारतीय जनता पार्टी कार्यालय, नागाळा पार्क, कोल्हापूर येथे 'सेवा अभियान' आयोजित करण्यात आले आहे.**

या अभियानांतर्गत कोल्हापूर जिल्ह्यातील नागरिकांनी त्यांच्या प्रलंबित शासकीय, शैक्षणिक तसेच विविध विभागांशी संबंधित समस्या व मागण्यांची निवेदने भाजपा पदाधिकारी अथवा जिल्हाध्यक्षांकडे सादर करावीत, असे आवाहन करण्यात आले आहे. अभियानादरम्यान संतोष साखरे हे नागरिकांकडून निवेदने स्वीकारणार असून प्राप्त निवेदनांचा संबंधित विभागांकडे पाठपुरावा करून त्यांची कार्यवाही होण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत.

## जाहीर इशारा नोटीस

१) आमचे अशिल श्री अनिल वसंत ठाणेकर व श्री रामकिशोर रामेश्वर तिवाडी रा. इचलकरंजी यांनी दिलेल्या माहितीवरून दाखवलेल्या कागदपत्रावरून जाहीर नोटीस देणेत येते की–

२) मिळकतीचे वर्णन :

जिल्हा व तुकडी कोल्हापूर पोट तुकडी इचलकरंजी मा. सह दुय्यम निबंधकसो वर्ग २ इचलकरंजी यांचे हद्दीतील व तालूका हातकणंगले पैकी कसबा इचलकरंजी नगरपरिषद हद्दीतील शेतजमिन मिळकत रि.स.नं. ५०७ हिस्सा क्रं. १ क्षेत्र हे. आर. ०१.१९ पो.ख. ०.०१ आकार रू. पैसे १३.०७ या पूरे नंबरपैकी तिसरा हिस्सेचे पाच आणे चार पै. क्षेत्र हे. आर ०.३५.६६ आकार रू. पैसे ४.३५ ची शेतजमीन सर्व. यांसी चतुःसिमा पूर्वेस :– रस्ता, पश्चिमेस : ओढा, दक्षिणेस :– श्री गणपती कृष्णा फारणे यांची मिळकत, उत्तरेस :– श्री दत्ता तुकाराम फारणे यांची मिळकत येणेप्रमाणे चतुःसिमेतील शेतमिळकत यातील तदंगभूत वस्तूसह सर्व व वहीवाटीच्या सर्व प्रकारच्या हक्कासह सर्व. यासच यापुढे दावेत 'मिळकत' असे संबोधले आहे.

प्रस्तुत मिळकत ही मुळची फारणे कुटूंबियांची वडीलार्जीत मिळकत होय. सदर मिळकतीमध्ये किसाबाई रामू फारणे यांचा हिस्सा होता तो हिस्सा त्यांनी आक्काताई भूपाल निर्मळ यांना दिला होता. आक्काताई निर्मळ यांनी फारणे कुटूंबातील त्यांचा हिस्सा आमचे अशिलांना करारपत्राने दिला होता. त्यासंदर्भात आमचे अशिलांनी रे. क.नं. ६४/२०१८ हा दाखल केला होता. सदर दावा हा मा. कोर्टासमोर आक्काताई निर्मळ व त्यांच्या वारसांनी आपसात करून मान्य व कबुल केलेला आहे. त्यामुळे फारणे कुटूंबातील आक्काताई निर्मळ यांचे हिस्सेचे मालक आमचे अशिल झालेले आहेत. परंतू आक्काताई निर्मळ व त्यांच्या वारसांनी अद्याप फारणे कुटूंबात वाटणी झालेली नाही असे दर्शवून विविध दावे व दरखास्ती मा. कोर्टामध्ये दाखल केलेल्या आहेत व त्या प्रलंबित आहेत. त्यामुळे सदर जाहीर नोटीसमध्ये नमूद मिळकतीमध्ये आमचे अशिलांचा हिस्सा ठरून ताबा मिळत नाही तोपर्यंत सदर मिळकती संदर्भात कोणताही व कसलाही व्यवहार करू नये. सबब, जाहीर नोटीसीने हरकत घेणेत येत आहे व इशारा देणेत येत आहे. या उपरांत कोणी व्यवहार केलेस अशा व्यक्तींना कायदेशीर कारवाईस सामोरे जावे लागेल. त्यामुळे कोणीही आमचे अशिलांचे संमतीखेरीज जाहीर नोटीसीमध्ये नमूद मिळकतीबाबत व्यवहार करू नये. म्हणून प्रसिद्ध केली जाहीर नोटीसीस हरकत.

**ॲड.भरत देवराज जोशी**
**नोटरी भारत सरकार**
**१५/६९८, देवपुष्प, कलानगर,इचलकरंजी.**
**मो.नं.९४२२४१७१७७**

# सोमवारी जिल्ह्यातील शाळा सुरु होणार

## लोकप्रतिनिधी,अधिकाऱ्यांकडून होणार स्वागत

**कोल्हापूर, ता.१३ (प्रतिनिधी–**

**जिल्हयातील प्राथमिक शाळा येत्या सोमवारी सुरु होणार असून यंदा शाळेमध्ये नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचे जिल्हयातील मान्यवर लोकप्रतिनिधी तसेच प्रशाकीय अधिकाऱ्यांकडुन स्वागत होणार आहे. यासाठी जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाच्या वतीने पूर्ण नियोजन व जय्यत तयारी सुरु आहे. शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके, गणवेश वितरण, पोषण आहार वाटप मान्यवरांच्या हस्ते होणार असल्याचे शिक्षणाधिकारी डॉ. मीना शेंडकर यांनी सांगितले.**

जिल्हयातील सर्व शाळामध्ये विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव कार्यक्रम नेटका होणर असून या उपक्रमातून बालकांना स्फुर्ती आणि प्रेरणा मिळणार आहे. या प्रवेशोत्सव कार्यक्रमातंर्गत जिल्ह्यातील विविध शाळांना मंत्रीमहोदय, खासदार, आमदार, जिल्हा परिषदेचे पदाधिकारी आणि अधिकारी भेटी देणार आहेत, ग्रामीण भागातील मुलांचा जिल्हा परिषदेच्या शाळेत प्रवेश घेण्याकडे कल वाढावा हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश असल्याचे शिक्षणाधिकारी शेंडकर यांनी सांगितले.मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये शाळेमध्ये नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचे जंगी स्वागत केले जाणार आहे.

जिल्हा परिषदेमार्फत जिल्ह्यातील मान्यवर लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांच्या शाळा भेटीच्या कार्यक्रमाचे नियोजन केले आहे. शाळा भेटीदरम्यान मान्यवराकडून शालेय कामकाज, शैक्षणिक गुणवत्ता व इतर सोयी सुविधांची माहिती घेतली जाणार आहे.

## जाहीर नोटीस

मौजे खोतवाडी येथील गट नंबर ८९/८ पैकी भुखंड क्रमांक १ / अ चे क्षेत्र ६२५४-६ चौरस फुट ची खुली जागा.यासी चतु:सिमा **पुर्वेस** – गट नंबर ८९, **पश्चिमेस**–संदीप लाटकर, **दक्षिणेस** २० फुट रस्ता, **उत्तरेस** – व्यास यांची मिळकत. सदरची मिळकत संजय बापुसो खोत रा. इचलकरंजी यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यांनी सदर मिळकतीची संचकार पावती आमचे अशिलांचेकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांना करून दिलेली आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा, करार, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही ता. १३/०६/२०२६

**ॲड. बाबासो पाटील**
**१७/७७, स्वामी विवेकानंद कॉलनी, इचलकरंजी,**
**मो.९२२६८८७००१**

## जाहीर नोटीस

**मौजे तारदाळ** येथील **गट नं. ८४ पैकी प्लॉट नं. ६ चे क्षेत्र – १८३ – ५५ चौ. मी.** खुली मिळकत यासी चतु:सिमा **पुर्वेस** – प्लॉट नं. ५ ची मिळकत, **पश्चिमेस** – प्लॉट नं. ७ ची मिळकत, **दक्षिणेस** – रावण खोत यांची मिळकत, **उत्तरेस** – रस्ता. येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत ही **श्री राजेश सत्यनाराण बांगड** यांचेकडुन **सौरभ अशोक माळी, विजयकुमार पांडुरंग माळी, कपिल विजय चौगुले व महेश प्रकाश भिसे रा. इचलकरंजी** यांनी करारपत्राने घेतलेली असुन त्यांनी आमचे अशिलांशी मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचे सांगुन संचकार रक्कम स्विकारून त्यांच्याशी मिळकत विक्री करण्याचे संचकारपत्र केले आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचा हक्क, दावा, बोजा, वारसा, करार, इजमेंट इ. वगैरे असल्यास सदर नोटीस प्रसिध्दीपासुन ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस – सही
ता. १३/०६/२०२६

**ॲड.अर्जुन तात्यासाहेब माने**
**गाळा नं . ३४, दुय्यम निबंधक ऑफीस शेजारी, राजाराम स्टेडियम, इचलकरंजी,**
**मो .७८२०९०९७०५**

## जाहीर नोटीस

**मौजे खोतवाडी** येथील गट नंबर ८४ पैकी भुखंड **क्रमांक ६ चे क्षेत्र १२०० चौरस फुट** ची खुली जागा.यासी चतु:सिमा **पुर्वेस** बन्सल यांची मिळकत, **पश्चिमेस** २० फुट रस्ता, **दक्षिणेस** भुखंड क्रमांक ५, **उत्तरेस** – भुखंड क्रमांक **७.सदरची मिळकत चंद्रकांत अंबरुषी नवले** रा. इचलकरंजी यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यांनी सदर मिळकतीची संचकार पावती आमचे अशिलांचेकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांना करून दिलेली आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा, करार, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस सही ता. १३/०६/२०२६

**ॲड. शिवकुमार सुखदेव लकडे**
**३/१५३, देवमोरेवाडा, टाकवडे वेस, राणाप्रताप चौक, इचलकरंजी ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर**
**मो.९८८१०१४७२५**

## जाहीर नोटीस

**मौजे तारदाळ** येथील **गट नं.** ५५४ / ६ चे एकुण क्षेत्र हे . १.१०.०० **आर पोट** खराब क्षेत्र हे ०.०८.० आर आकार रू.४.१५ पैकी क्षेत्र हे ०.२५.५० **आर** शेत जमीन मिळकत यासी चतु:सिमा **पुर्वेस –** विहीरपड व चौगुले यांची मिळकत, पश्चिमेस – ओढा, दक्षिणेस – आनंदा दौंडे व संदीप टेके व इतर यांची मिळकत, उत्तरेस मोहन चौगुले यांची मिळकत व रस्ता येणेप्रमाणे चतुः सिमेतील मिळकत ही **नंदकुमार रामराव देसाई रा. इचलकरंजी** यांचे कब्जे मालकीची असून त्यांनी आमचे अशिलांशी मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचे सांगुन संचकार रक्कम स्विकारून त्यांच्याशी मिळकत विक्री करण्याचे संचकारपत्र केले आहे. तरी सदर मिळकती बाबत कोणाचा हक्क, दावा, बोजा, वारसा, करार, इजमेंट इ. वगैरे असल्यास सदर नोटीस प्रसिध्दीपासुन ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस . सही
ता . १३/०६/२०२६

**ॲड.अर्जुन तात्यासाहेब माने**
**गाळा नं . ३४, दुय्यम निबंधक ऑफीस शेजारी, राजाराम स्टेडियम, इचलकरंजी,**
**मो .७८२०९०९७०५**

# कोल्हापूर जिल्ह्यात ३ हजार १८० मेट्रिक टन खताचे बुकिंग

## क्यूआर कोड प्रणालीला शेतकऱ्यांसह खत विक्रेत्यांचा प्रतिसाद

कोल्हापूर,ता.१३(प्रतिनिधी)-

**फ्रेमवर्क फॉर फर्टिलायझर सेल या पथदर्शी प्रकल्पाच्यावतीने कोल्हापूर जिल्ह्यात आतापर्यंत १६ हजार ७४२ क्यूआर कोड तयार करण्यात आले असून त्याद्वारे ३ हजार १८० मेट्रिक टन खताचे बुकिंग करण्यात आले आहे. त्यापैकी ५ हजार ४१२ क्यूआर कोड स्कॅन करून १ हजार ०५७ मेट्रिक टन खताची प्रत्यक्ष विक्री करण्यात आली आहे.ही आकडेवारी शेतकरी व खत विक्रेत्यांकडून प्रणालीला मिळत असलेला सकारात्मक प्रतिसाद तसेच जिल्ह्यातील यशस्वी अंमलबजावणी अधोरेखित होत आहे.**

केंद्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'फ्रेमवर्क फॉर फर्टिलायझर सेल' या पथदर्शी प्रकल्पाची कोल्हापूर जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी सुरू असून शेतकऱ्यांना खत वितरण



प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुलभ व गतिमान करण्यासाठी विविध तांत्रिक सुधारणा करण्यात आल्या आहेत. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ.विजय राठोड यांनी राधानगरी तालुक्यात भेट देऊन प्रत्यक्ष कामकाजाची पाहणी केली. संपूर्ण प्रक्रिया सुरळीत व प्रभावीपणे सुरू असल्याचे यावेळी निदर्शनास आले.

फ्रेमवर्क फॉर फर्टिलायझर सेल ॲपमध्ये शेतकरी व खत विक्रेत्यांच्या सूचनांनुसार अनेक महत्त्वपूर्ण सुधारणा करण्यात आल्या आहेत. यामध्ये आता शेतकरी क्यूआर कोड तयार करून त्याचवेळी स्कॅनिंगद्वारे तात्काळ खत खरेदी करू शकतात त्यामुळे २४ तास प्रतीक्षा करण्याची आवश्यकता राहिलेली नाही. तसेच शेतकरी घरबसल्या खताचे बुकिंग करू शकत असल्याने खतासाठी विक्री केंद्रांवर वारंवार फेऱ्या मारण्याची गरज कमी झाली आहे. दुकानावर जाऊन खत उपलब्ध नसणे अथवा खत खरेदीसाठी लांबच लांब रांगा लागणे अशा अडचणींवरही यामुळे मोठ्या प्रमाणात मात होण्यास मदत होत आहे.

फ्रेमवर्क फॉर फर्टिलायझर सेल प्रणालीमुळे खत वितरण साखळी अधिक पारदर्शक होत असून खताचा काळाबाजार, अनधिकृत साठेबाजी व कृत्रिम टंचाई रोखण्यास मदत होत आहे. खताचा प्रवाह उत्पादन केंद्रापासून शेतकऱ्यांपर्यंत डिजिटल पद्धतीने नोंदविला जात असल्याने प्रत्येक टप्प्यावर प्रभावी देखरेख ठेवणे शक्य होत आहे. परिणामी पात्र शेतकऱ्यांना योग्य वेळी व योग्य प्रमाणात खत उपलब्ध होण्यास मदत होत आहे. यावेळी जिल्हाधिकारी डॉ.विजय राठोड यांनी जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना फ्रेमवर्क फॉर फर्टिलायझर सेल ॲपचा अधिकाधिक वापर करण्याचे आवाहन केले.

## कुरुंदवाडात साने गुरुजी यांची पुण्यतिथी साजरी

कुरुंदवाड,ता.१३(प्रतिनिधी)-

**साने गुरुजी विद्यालय कुरुंदवाड येथे परमपूज्य साने गुरुजी पुण्यतिथी साजरी करण्यात आली. या कार्यक्रमासाठी विद्यालयाचे माजी विद्यार्थी व राष्ट्र सेवा दलाचे कार्यकर्ते रावसाहेब आलासे व श्रेणिक डिग्रजे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.त्यांच्या हस्ते साने गुरुजींच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.**

याप्रसंगी विद्यालयातील विद्यार्थ्यांची भाषणे झाली. श्री.डिग्रजे यांनी साने गुरुजींच्या जीवनपटावर विचार मांडले. याप्रसंगी सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन श्री.मस्के यांनी केले तर आभार सौ.दिवटे यांनी मानले.



मजले येथे डांबरी रस्त्याच्या शुभारंभप्रसंगी खास.धैर्यशिल माने, अरुणराव इंगवले,अजिंक्य इंगवले,वर्षा सावर्डेकर व अन्य मान्यवर.

## मजले ग्रामस्थांचा मतरुपी आशिर्वाद सार्थकी लागला-खास.माने

हातकणंगले,ता.१३(प्रतिनिधी)-

**जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत मजले ग्रामस्थांनी शिवसेनेच्या उमेदवारांना मतदान रुपी दिलेला आशिर्वाद सार्थकी लागला, असे प्रतिपादन खास.धैर्यशील माने यांनी केले.**

मजले (ता.हातकणंगले) येथील ६५ लाख रुपयांच्या खर्चातून केलेल्या डांबरी रस्त्याच्या लोकार्पण सोहळ्यात ते बोलत होते. काम महत्वाचे असल्याने माझ्यासह आम.अशोकराव माने, जिल्हा परिषद सदस्या डॉ.वर्षा सावर्डेकर व पंचायत समितीचे उपसभापती संतोष कांबळे यांनी ही या कामासाठी निधी दिला.जेष्ठ नेते अरुणराव इंगवले यांनीही प्रयत्न केले असे सांगत मशिनरी वापरून दर्जेदार काम करण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. याप्रसंगी माजी जिल्हा परिषद सदस्य अरुण इंगवले, सरपंच अजिंक्य इंगवले, जिल्हा परिषद सदस्या वर्षा सावर्डेकर, सचिन पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास पंचायत समिती उपसभापती संतोष कांबळे, जि.प.सदस्य अतिष शिंगे, उपसरपंच मिनाक्षी कुंभोजे , बाहुबली रेडेकर, नंदकुमार कोठावळे, दादा पाटील, सिकंदर कोठावळे,विनायक कोठावळे,सुनिल देसाई, बाबासाहेब पाटील, अविनाश पाटील, प्रमोद मगदूम, राहूल घारगे, आशिष देसाई, किरण पाटील, मारुती घारगे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.



राजेंद्र निकम यांना राज्यस्तरीय लोकहितवादी कर्मवीर पुरस्काराने सन्मानित करताना सागर शेळके,आग्नेल चव्हाण व इतर.

## राज्यस्तरीय लोकहितवादी कर्मवीर पुरस्काराने राजेंद्र निकम सन्मानित

इचलकरंजी,ता.१३-

**महाराष्ट्र कामगार सेनेचे संस्थापक अध्यक्ष व मनसे जिल्हा उपाध्यक्ष राजेंद्र निकम यांना मंथन फाउंडेशन यांच्यावतीने राज्यस्तरीय लोकहितवादी कर्मवीर हा पुरस्कार मंथन फाउंडेशनचे अध्यक्ष सागर शेळके व आग्नेल चव्हाण तसेच बाजीराव पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. याप्रसंगी आनंदा गुरव, चंद्रकांत शिंदे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.**

यावेळी मंथन फाउंडेशनचे अध्यक्ष सागर शेळके यांनी राजेंद्र निकम हे गेल्या पंचवीस ते तीस वर्षापासून गोरगरीब जनतेचे व कष्टकरी कामगार वर्गाचे काम करीत असून सदरच्या गोरगरीब जनतेला अनेक शासनाच्या योजना पदरात पाडून घेण्यासाठी महाराष्ट्र कामगार सेना या संघटनेच्या माध्यमातून न्याय देण्याचा प्रयत्न करत आहेत असे सांगितले.



साजणीत कृषीदूतांच्या स्वागतप्रसंगी सरपंच शिवाजी पाटील, जंबूकुमार चौगुले, विनोद लाटकर, शंकर पाटील व इतर.

## साजणी येथे कृषीदूतांचे स्वागत

साजणी,ता.१३(वार्ताहर)-

**राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय कृषी महाविद्यालय, कोल्हापूर येथील ग्रामीण कृषी कार्यानुभव व औद्योगिक संलग्नता (आरएडब्ल्यूइ) कार्यक्रमांतर्गत कृषीदूतांचे मौजे साजणी येथे आगमन झाले. या उपक्रमामुळे गावातील शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञान, वैज्ञानिक शेती पद्धती तसेच कृषी क्षेत्रातील नव्या संधींबाबत थेट मार्गदर्शन मिळणार आहे. त्यामुळे साजणी परिसरातील शेती विकासाला नवी दिशा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.**

गावात दाखल झालेल्या कृषीदूतांचे ग्रामस्थांनी उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत केले. यावेळी सरपंच शिवाजी पाटील, माजी सरपंच प्रगतशील शेतकरी जंबूकुमार चौगुले, माजी सदस्य विनोद लाटकर तसेच प्रगतशील शेतकरी शंकर पाटील, रघुनाथ पाटील, एन. डी. पाटील, अशोक हेरवाडे, संजय हेरवाडे व धनंजय पाटील उपस्थित होते. या गटामध्ये प्रियदर्शन भोसले,संग्राम काळे,अमित गोडसे, सत्यजित चांडोले,कृष्णा डहाळे व अविनाश खरात यांचा समावेश आहे.

# जीवनावश्यक वस्तु दरवाढीच्या निषेधार्थ शेकापची निदर्शने

कोल्हापूर,ता.१३(प्रतिनिधी)-

**घरगुती गॅस सिलिंडर दरात शासनाने २९ रूपयांची दरवाढ केली. या गॅस दरवाढीच्या निषेधार्थ शेतकरी कामगार पक्षाचे शहर चिटणीस भाई बाबुराव कदम यांच्या नेतृत्वाखाली शिवाजी चौकात अन्नधान्य जीवनाश्यक वस्तू दरवाढ रद्द करा,वाढत्या महागाईला आळा घाला, डिझेल पेट्रोल दरवाढ रद्द करा, गॅस दरवाढ रद्द करा, असे फलक झळकावत केंद्रातील भाजपा सरकारच्या निषेधार्थ जोरदार घोषणा देत निदर्शने केली. शासनाने ही दरवाढ रोखावी, अशी मागणी यावेळा केली.**



भाजप सरकारच्या निषेधार्थ आंदोलन करताना शेकापचे कार्यकर्ते.

अच्छे दिनच्या नावाखाली केंद्रातील भाजपा सरकारने डिझेल-पेट्रोल दरवाढी बरोबर घरगुती गॅस सिलिंडरच्या दरात २९ रुपयांनी वाढ केली. परिणामी वाढत्या गॅस दर वाढीमुळे स्वयंपाक घरातील महिलांचे बजेट कोलमडले आहे. केंद्रात भाजप सरकार सत्तेत आल्यापासून १२ वर्षात १३ वेळा ही गॅस दरात वाढ झाली. पूर्वी एक सिलिंडर ५२८ रुपयांना मिळत होता. सध्या तोच दर ९१५ वर पोहचला आहे. यावरून महागाई किती पट वाढली आहे. शासकीय नोकरांना वेतन आयोग मिळतो तसे शेतमजूर कामगार अशा श्रमजीवी वर्गाला वेतन आयोग मिळत नाही. याचे भान तरी केंद्र सरकारने ठेवायला पाहिजे होते.याकडे आंदोलनकर्त्यांनी लक्ष वेधले.

२०१४ मध्ये कुटुंबाचा सरासरी खर्च ५ हजार इतका असायचा तो खर्च २०२६ मध्ये तब्बल १२ हजाराहून अधिक झाला. केंद्रातील भाजपा सरकार महागाई रोखण्यात पुरते अपयशी ठरले आहे.

निदर्शनात भाई बाबुराव कदम, संभाजी जगदाळे, दिलीपकुमार जाधव, सुभाष सावंत, संग्राम माने, प्रकाश शिंदे, गीता कदम, वैशाली सुर्यवंशी,प्रिया जाधव,शीतल पोहाळकर,रंगराव पाटील,मोहन पाटील,यशवंत पाटील,चंद्रकांत सुर्यवंशी, अभिजित कदम, इकबाल शेख,बाबुराव पाटील, आनंद पोवाळकर, रुपाली नारे, रेखा पोवाळकर यांचा समावेश होता.

## घरफाळा भरण्यासाठी आज महापालिकेची सर्व नागरी सुविधा केंद्रे सुरु

कोल्हापूर,ता.१३(प्रतिनिधी)-

**महानगरपालिकेच्या घरफाळा विभागाच्यावतीने सन २०२६-२७ या आर्थिक वर्षातील घरफाळा महापालिका करामध्ये ६ टक्के सवलत योजनेचे काहीच दिवस शिल्लक राहिलेले आहेत. ज्या मिळकतधारकांनी अद्यापही आपला घरफाळा भरणा केलेला नाही. त्यांनी ३० जून अखेर घरफाळा बिल भरुन ६ टक्के सवलतीचा लाभ घ्यावा.**

ज्या मिळकत धारकांना अद्यापही पोस्टा मार्फत बिल मिळाले नसल्यास त्यांनी जवळच्या विभागीय कार्यालयात जावून दुबार बिलाची प्रत प्राप्त करुन घेऊ शकतात. तसेच महापालिकेच्या कोणत्याही नागरी सुविधा केंद्रात जावून आपला करदाता क्रमांक सांगून चालू वर्षाची रक्कम भरुन ६ टक्के सवलत योजनेचा लाभ घेता येईल.नागरिकांचे सोयीस्तव महानगरपालिकेची सर्व नागरी सुविधा केंद्र सकाळी ९ ते सांयकाळी ४:३० पर्यंत तसेच आज रविवार ता.१४ जून रोजी सार्वजनिक सुट्टीचे दिवशी देखील सुरु राहणार आहेत, तरी शहरातील नागरिकांनी या ६ टक्के सवलत योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिकेच्या घरफाळा विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

## महाराष्ट्र नवनिर्माण वाहतूक सेनेच्यावतीने जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

कोल्हापूर,ता.१३(प्रतिनिधी)-

**येथील छत्रपती शिवाजी चौकामध्ये शहरातील गरीब व गरजू लोकांसाठी एक हात मदतीचा म्हणून महाराष्ट्र नवनिर्माण वाहतूक सेनेतर्फे शालेय साहित्य व जीवनावश्यक वस्तूंचे वाटप उपक्रम राबविण्यात आला.**

उपक्रमाचे उद्घाटन वाहतूक सेना राज्य उपाध्यक्ष राजू जाधव, पैलवान प्रवीण माने, संभाजी पाटील आदी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी गरजू लोकांना गहू, तांदूळ,कांदा, बटाटे, शालेय उपयोगी वस्तू, वह्या, पेन इ. साहित्यांचे कीट वाटप करण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने महिला वर्गाचा उत्स्फूर्त सहभाग होता. याचा बालचमूने ही आनंद लुटला. नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद या उपक्रमात लाभला. शहरांमधील अनेक गरजू लोकांनी लाभ घेतला.

यावेळी राजु दिंडोर्ले, प्रसाद पाटील, दौलत पाटील, नागेश चौगले, संतोष चव्हाण, परशुराम चव्हाण, आण्णा तिळवे, अतुल भालकर, गणेश बुचडे, राहुल कुंभार,विजय करजगार, अभिजीत राऊत,अंजिक्य शिंदे, श्रीकांत वंदूरे-पाटील,शिवाजी पाटील, अमोल पाटील आदी उपस्थित होते.

# शरद आयटीआयच्या विद्यार्थ्यांची नामांकित कंपनीत निवड

यड्राव,ता.१३-

**यड्राव येथील सहकाररत्न शामराव पाटील-यड्रावकर औद्योगिक प्रशिक्षण संस्था (शरद आयटीआय) येथे टाटा मोटर्स कंपनीचा पुल कॅम्पस इंटरव्ह्यु झाला. यामध्ये सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील ८ औद्योगिक प्रशिक्षण (आयटीआय) कॉलेजमधील विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यामधील १५६ विद्यार्थ्यांची निवड झाली. यामध्ये शरद आयटीआयच्या ८१ विद्यार्थ्यांची निवड झाली. निवडलेल्या विद्यार्थ्यांना कंपनीकडून जॉईनिंग लेटर देण्यात आले.**



यड्राव येथे टाटा मोटर्स कंपनीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा एक्झिक्युटीव्ह डायरेक्टर अनिल बागणे यांनी सन्मान केला.याप्रसंगी उपस्थित शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी.

शरद आयटीआयमध्ये टाटा मोटर्स कमर्शियल कंपनीच्या या कॅम्पस इंटरव्ह्युमध्ये इलेक्ट्रीशन, फिटर, मोटर मेकॅनिकल, वेल्डर, टर्नर, मशिनिस्ट व शिटमेटल ट्रेडमधील विद्यार्थी सहभागी झाले होते. कंपनीकडून विद्यार्थ्यांची कंपनीचे एचआर मॅनेंजर राजेश रोकडे, प्रकाश हावले, सोमेश्वर सोनव्ही यांनी लेखी परिक्षा घेवून विद्यार्थ्यांची निवड केली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन आमदार डॉ.राजेंद्र पाटील-यड्रावकर, एक्झिक्युटीव्ह डायरेक्टर अनिल बागणे यांनी अभिनंदन केले. प्राचार्य आर.बी.भरमगोंडा, प्रा.महावीर चौगुले यांच्यासह विभागप्रमुख, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

श्रीहरी
शुक्रवार, ता. १२/०६/२०२६ पासून
रोज ३ खेळ, दु. १ व ४ वाजता
ओरिजीनल हिंदी इचलकरंजीत प्रथमच
किरायेदार
सायं. ७ वा.
A मिलने का मजा प्रौढांसाठी

श्रीदत्त
शुक्रवार, ता. १२ पासून
रोज ४ खेळ १*४*७ व १० वाजता
मस्त रोमँटीक इंग्रजी चित्रपट
पोर्न स्टार
A फक्त प्रौढांसाठी A

पंचवटी चित्रमंदिर, इचलकरंजी
★ या शुक्रवारपासून दर्शकांच्या भेटीला ★
रोज २ खेळ




शुक्रवार, १२ जून २०२६ पासून
रोज २ खेळ
• दुपारी १२:०० वाजता
• दुपारी ३:०० वाजता
शुक्रवारपासून सुरू
रोज २ खेळ
• सायंकाळी ६:०० वाजता
• रात्री ९:०० वाजता
ॲडव्हान्स बुकिंग सकाळी १०:०० वाजल्यापासून सुरू
DOLBY 7.1 SURROUND SOUND
मनोरंजन, महाकॉमेडी आणि कौटुंबिक अनुभवाचा डबल धमाका!
बुकिंग साठी संपर्क 9623150103
ऑनलाइन पेमेंट स्वीकारले जातील G Pay PhonePe
ऑनलाइन बुकिंग साठी bookmyshow
★ आपल्या आवडत्या चित्रपटांचा आनंद घ्या फक्त पंचवटी चित्रमंदिरात! ★



५७ वर्षे सिनेरसिकांच्या सेवेत
DOLBY DIGITAL
भाग्यरेखा चित्रमंदिर इचलकरंजी
नवीन डॉल्बी डिजीटल साऊंड सिस्टीम
गर्दीचा ४ था आठवडा
रोज ४ खेळ ११.४५-३-६-९ वा.
मूर्तीत अडकण्या पेक्षा माणसातील देव ओळखायला शिकवणारा अप्रतीम सिनेमा....
देवळात गर्दी करण्यापेक्षा माणसाला माणुसकी दाखवा देव स्वतः तुमच्याकडे येईल...



देऊळ बंद-२ आता परीक्षा देवाची...

कल्पना
DOLBY DIGITAL
QUBE CINEMA NETWORK The Power of Cinema Delivered
शुक्रवार ता.१२पासून लेजर प्रोजेक्टरसहीत
रोज २ खेळ १२*३.१५
रोज २ खेळ ६.३०*९.३०




गुरु
शुक्रवार ता.१२ पासून
ऑनलाईन बुकींग bookmyshow
रोज २ खेळ सकाळी १२ व ३.१५
रोज २ खेळ सकाळी ६.३० व ९.२०




RK CINEMA
3 SCREEN MULTIPLEX
राधाकृष्ण सिनेमा
3 स्क्रीन मल्टिप्लेक्स
REAL 3D EFFECTS & DOLBY ATMOS SOUND
ONLY IN RADHAKRISHNA MULTIPLEX
7447440070 bookmyshow



"देऊळ बंद 2"- मराठी
12:30 PM, 03:00 PM
07:00 PM, 09:30 PM
"पेड्डी"- हिंदी
03:30 PM, 10:30 PM
"तुंबाडची मंजुळा" - मराठी
04:15 PM, 06:30 PM
"भारत भाग्य विधाता" - हिंदी
11:30 AM
"हॉन्टेड: इकोज ऑफ द पास्ट"- हिंदी
10:00 AM, 10:15 PM
"महाराष्ट्र फाईल्स" - मराठी
01:00 PM
"मैं वापस आऊंगा" -हिंदी
10:00 AM, 07:15 PM
चित्रपटाचा भरघोस आनंद घ्या आमच्या नवीन खाद्य प्रकारासह, खासकरून पिज्जा, पास्ता, सँडविच, गार्लिक ब्रेड आणि बरिस्ता एक्सप्रेसो कॉफी इचलकरंजीत प्रथमच

फोर्च्युन सिनेफ्लेक्स
इचलकरंजी
Now Book Tickets on bookmyshow
OR Via www.fortuneshahgroup.com
अधिक माहितीसाठी संपर्क +91 88 88 01 51 11



देऊळ बंद 2 (MAR) (U/A)
12.00, 03.30, 07.00, 10.15pm
तुंबाडची मंजुळा (MAR) (U/A)
01.15, 04.15, 07.15, 10.30pm
हॉन्टेड (इकोज ऑफ द पास्ट) (3D) (HIN) (U/A)
10.30am, 10.45pm
पेड्डी (HIN) (U/A)
01.00, 07.15pm
गव्हर्नर (HIN) (U/A)
11.00am
है जवानी तो इश्क होना है (HIN) (U/A)
04.30pm
आज पहा देऊळ बंद 2 मूवी शो फक्त 100 पासून पुढे

# विरोधकांनी सत्तेच्या काळात घोटाळ्यांच्या पलीकडे काय केले?

## डॉ.सुरेश भोसले यांचा सवाल; वाठार येथे जयवंतराव भोसले सहकार पॅनेलची प्रचार सभा

कराड,ता.१३(प्रतिनिधी)-

**थोर विचारवंत स्व. यशवंतराव मोहिते (भाऊ) आणि सहकारमहर्षी स्व. जयवंतराव भोसले (आप्पा) यांच्या मार्गदर्शनातून आणि अनुभवातून कारखाना उत्तम पद्धतीने कसा चालवावा हे आम्ही शिकलो. त्यामुळेच आज कारखाना प्रगतीपथावर नेता आला. पण विरोधकांनी त्यांच्या सत्तेच्या काळात घोटाळ्यांच्या पलीकडे काय केले?, असा थेट सवाल य. मो.कृष्णा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन डॉ. सुरेश भोसले यांनी केला.**



कराड येथील सभेत बोलताना डॉ.सुरेश भोसले,व्यासपीठावर उपस्थित मान्यवर.

वाठार (ता. कराड) येथे जयवंतराव भोसले सहकार पॅनेलच्या जाहीर प्रचार सभेत ते बोलत होते. व्यासपीठावर आमदार डॉ. अतुलबाबा भोसले, ज्येष्ठ नेते मदनराव मोहिते, कारखान्याचे व्हा.चेअरमन जगदीश जगताप, संचालक दत्तात्रय देसाई, लिंबाजी पाटील, संभाजी पाटील, दयानंद पाटील, मलकापूरचे नगराध्यक्ष तेजस सोनावले आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ.भोसले पुढे म्हणाले की, २०१५ साली जेव्हा आम्ही कारखाना ताब्यात घेतला तेव्हा व्यापाऱ्यांची देणी देण्याकरता ही पैसे नव्हते. पण गेल्या ११ वर्षांत आपल्या सर्वांच्या पाठबळामुळे कारखान्याने नवी उंची गाठली असून, आर्थिक व्यवस्थापन चांगल्या पद्धतीने केल्याबद्दल कारखान्याला अनेक पुरस्कार मिळाले आहेत. येणाऱ्या ५ वर्षात सिंचन योजनांचे आधुनिकीकरण करायचे आहे. त्यासाठी केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून निधी आणण्याचा आमचा प्रयत्न राहील. तसेच जमीन क्षारपडमुक्त करण्यासाठी विशेष अभियान राबविले जाणार आहे. कार्यक्षेत्रातील सर्व पाणंद रस्ते पूर्ण करायचे आहेत. तसेच ऊसदरातही एक नंबरला आम्ही राहू, अशी खात्री देतो.

आ.डॉ.अतुल भोसले म्हणाले, डॉ.सुरेशबाबांच्या नेतृत्वाखालील संचालक मंडळाने पारदर्शक कारभार केला. त्यामुळे कारखाना आर्थिकदृष्ट्या सक्षम झाला. पण विरोधक आज खोट्या वल्गना करत आहेत. ते आज १२० किलो मोफत साखर देण्याची घोषणा करत आहेत. पण मग जेव्हा त्यांच्याकडे सत्ता होती तेव्हा का मोफत साखर दिली नाही? आज निवडणुकीच्या तोंडावर खोटी आश्वासने कशाला देता? आज कृष्णा कारखाना चांगल्या पद्धतीने सुरू आहे.गेल्या ११ वर्षात कारखान्याला १४ पुरस्कार मिळाले आहेत. विरोधकांकडे कोणताही अजेंडा नाही. त्यांनी स्वतःच्या ५ वर्षात काय दिवे लावले हे सभासदांना चांगलेच माहिती आहे. त्यामुळे सभासद त्यांच्या भूलथापांना बळी पडणार नाहीत.

राजेश पाटील-वाठारकर म्हणाले, भाऊ-आप्पांनी ज्या कल्पकतेने हा कारखाना उभारला, त्याला आज बदलत्या काळानुसार प्रगतीपथावर नेण्याचे काम डॉ. सुरेशबाबांनी केले आहे. संचालक दत्तात्रय देसाई यांनी डॉ.सुरेशबाबांनी शेतकरी हिताचे धोरण राबवित कारखान्याला महाराष्ट्रात अव्वलस्थानी केल्याचे सांगून, सभासदांनी सहकार पॅनेलला भक्कम साथ द्यावी, असे आवाहन केले.

यावेळी जयवंतराव भोसले सहकार पॅनेलचे उमेदवार अरविंद पाटील,बाळासाहेब जगताप, सुनीता शेवाळे, सुजाता जाधव, जिल्हा परिषद सदस्या प्रियांका साळुंखे, शामबाला घोडके, महेश पाटील, मनिषा पाटील, शिवाजीराव थोरात, वसंतराव शिंदे यांच्या विविध गावातील मान्यवर व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्ह्यातील शिवसेनेत लाभार्थ्यांची टोळी विरुद्ध निष्ठावंतांमध्ये शीतयुद्ध

## जिल्हाप्रमुख रणजीतसिंह भोसले यांचा गौप्यस्फोट

सातारा,ता.१३(प्रतिनिधी)-

**सातारा जिल्ह्यात शिवसेना पक्षात असंतोषाचा भडका उडाला असून जिल्हाप्रमुख चंद्रकांत जाधव यांच्या पाठोपाठ दुसरे जिल्हाप्रमुख रणजीतसिंह भोसले यांनीही नाराजीचा बार उडवून दिला आहे. पक्षात लाभार्थ्यांची टोळी विरुद्ध निष्ठावंत असे शीतयुद्ध सुरू असल्याचा गौप्यस्फोट त्यांनी केला आहे.**



जिल्ह्यात पदाधिकारी नियुक्तीसाठी इच्छुकांच्या मुलाखतींचा कार्यक्रम जाहीर झाल्याने पक्षातील खदखद चव्हाट्यावर आली आहे. काल पक्षात आलेल्यांनी तीस-तीस वर्ष पक्षासाठी खस्ता खाल्लेल्यांच्या मुलाखती घ्यायच्या का? असा सवाल करत जिल्हाप्रमुख चंद्रकांत जाधव यांनी आपला संताप व्यक्त केला आहे. त्यापाठोपाठ सातारा व वाई विधानसभा मतदारसंघाचे जिल्हाप्रमुख रणजितसिंह भोसले यांनीही नाराजीचा बार उडवत चंद्रकांत जाधव यांच्या भूमिकेचे एकप्रकारे समर्थनच केले आहे.पक्षात लाभार्थ्यांची टोळी विरुद्ध निष्ठावंत असे शीतयुद्ध सुरू असून ही टोळी त्यांच्या समर्थकांची टोळी तयार करून निष्ठावंतांच्या अंगावर घालण्याचे उद्योग करत आहे. निष्ठावंतांचे खच्चीकरण करण्याचा प्रयत्न होत आहे. पक्ष विरहित स्वतःला महत्व प्राप्त व्हावे,जिल्ह्यात मला मानणारे कार्यकर्ते पदाधिकारी असावेत त्यासाठी नको त्या व्यक्तींना ताकत दिली जाते, हा पक्षाला घातक असणारा विषय आहे.पक्षाचे पळणारे पदाधिकारी यांना त्रास देऊन आर्थिक लाभार्थी पक्षावर ताबा घेत आहेत,अशी कैफियत भोसले यांनी मांडली आहे.

**शिवसेनेत नियुक्त्या आदेशाने होतात**

शिवसेनेत नियुक्त्या मुलाखतींनी होत नाहीत. आदेशाने होतात. मुलाखतींचे नाटक उभे करून येथे काँग्रेस संस्कृतीचे अनुकरण करत आहे, अशी खरमरीत टीका त्यांनी केली. पक्षाच्या मुख्य नेत्यांनी अशा वरिष्ठ नेतृत्वापासून जिल्ह्यातील निष्ठावंत शिवसैनिकांना वाचवावे, असे जिल्ह्यातील सर्व पदाधिकाऱ्यांचे म्हणणे आहे हीच व्यथा सातारा जिल्ह्याचे तिसरे जिल्हाप्रमुख जयवंतराव शेलार यांनी सातारा येथील शासकीय विश्रामगृह येथे झालेल्या बैठकीत पश्चिम महाराष्ट्र संपर्कप्रमुख दगडू दादा सपकाळ यांच्यासमोर मांडली होती व तसेच उद्योग मंत्री उदय सामंत यांच्यासमवेत झालेल्या बैठकीत ही खदखद स्वतः माऊली शेलार यांनी मांडली होती. ही अदृश्य खदखद येत्या काळात होणाऱ्या पदाधिकारी बैठकीत बाहेर पडेल.त्यावेळी त्यांच्या बाबतीत काय करायचे ते पक्षाने ठरवावे,अशी निर्वाणीची भाषा श्री.भोसले यांनी केली आहे.

# राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाची चर्चा ही अफवाच-शशिकांत शिंदे

कोरेगाव,ता.१३(वार्ताहर)-

**राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाचे स्वतंत्र राजकीय वाटचाल कायम राहणार आहे. राष्ट्रवादी (शरद पवार) काँग्रेसमध्ये विलीनीकरण होणार असल्याच्या चर्चा या अफवा आहेत,असे सांगत प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी चर्चेला पूर्णविराम दिला आहे.**



ल्हासूर्णे येथील निवासस्थानी पत्रकारांशी संवाद साधताना शिंदे म्हणाले, पक्ष दुसऱ्या कोणत्याही पक्षात विलीन होण्याचा प्रश्नच नाही.पक्षाबाबत जाणीवपूर्वक संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे. यापूर्वी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादीत विलीनीकरण होणार असल्याच्या बातम्याही पसरविण्यात आल्या होत्या. मात्र त्या अफवा ठरल्या.आता काँग्रेसमध्ये विलीनीकरणाच्या चर्चा पुढे आणल्या जात आहेत.

शशिकांत शिंदे म्हणाले, नवी दिल्ली येथे झालेल्या इंडिया आघाडीच्या बैठकीत पक्षाच्यावतीने खास.सुप्रिया सुळे सहभागी झाल्या होत्या. भाजप विरोधात प्रभावी धडा उभारण्यासाठी सर्व विरोधी पक्षांनी एकत्र येणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. उद्धव सेनेचे खास.संजय राऊत यांनी व्यक्त केलेल्या भूमिकेला सहमती आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार यांचे मार्गदर्शन इंडिया आघाडीसाठी महत्वाचे ठरणार आहे. विरोधी पक्ष एकसंघ राहिले तर देशाच्या राजकारणात नवे समीकरण निर्माण होऊ शकतील आणि भाजप समोर सक्षम पर्याय उभा राहू शकतो,असेही शशिकांत शिंदे यांनी सांगितले.

# श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या मूर्तीचे तज्ज्ञांकडून निरीक्षण

## आषाढी वारीपूर्वी मूर्तींचे संवर्धन होणार; लायडार स्कॅनचा प्रस्ताव

पंढरपूर,ता.१३(प्रतिनिधी)-

**श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या मूर्तीचे जतन व संवर्धन करण्यासाठी मंदिरात तज्ज्ञ व्यक्तींमार्फत निरीक्षण करण्यात आले. आषाढी यात्रेपूर्वी मूर्तीचे दीर्घकालीन जतन व संवर्धन करण्यासाठी भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण, राज्य पुरातत्त्व विभाग तसेच मूर्ती संवर्धन क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली आवश्यक सल्लामसलत करून निर्णय घेण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिली.**



बैठकीस मंदिर समितीचे सह-अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, मंदिर समिती सदस्य, सल्लागार परिषद सदस्य, स्थानिक महाराज मंडळी, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण व राज्य पुरातत्त्व विभागाचे अधिकारी, मूर्ती संवर्धन तज्ज्ञ तसेच पत्रकार प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस यांनी सांगितले की, मूर्ती दीर्घकाळ टिकावी यासाठी तिचे जतन व संवर्धन करणे अत्यावश्यक आहे. वज्रलेप करण्याबाबत तज्ज्ञांनी आपली मते मांडली असून कोणती पद्धत वापरायची याबाबत पुरातत्त्व विभागाचा सल्ला घेऊन दोन ते तीन दिवसांत निर्णय घेण्यात येईल. दररोजच्या नित्योपचारात दही, दूध, मध यांसारख्या पदार्थांचा वापर होत असल्याने मूर्तीच्या आतील बाजूस काही नुकसान झाले आहे का याची तपासणी करण्यासाठी लायडार स्कॅन करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. मात्र स्कॅनिंगमुळे मूर्तीला हानी होऊ शकते का, याचा अभ्यास करूनच निर्णय घेण्यात येईल. यासाठी केंद्र शासनाची परवानगी आवश्यक असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी सांगितले की,श्री विठ्ठलाची मूर्ती स्वयंभू असून वारकरी भाविकांचा श्वास आहे. मूर्तीचे जतन व संवर्धन मंदिर समितीमार्फत पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येईल. वज्रलेप करण्यास समितीचा विरोध नाही, मात्र सर्व महाराज मंडळी व तज्ज्ञांच्या सामोपचाराने निर्णय घेतला जाईल.

कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले की, मूर्ती जतन आणि संवर्धनाच्या अनुषंगाने आवश्यक उपाययोजना करण्यासाठी भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण, छत्रपती संभाजीनगर तसेच राज्य पुरातत्त्व विभागाच्या तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली सल्लामसलत करून पुढील कार्यवाहीबाबत निर्णय घेण्यात येईल.

बैठकीत एस. सुब्रमण्यम, छ.संभाजीनगरचे उपअधीक्षक डॉ.विनोद कुमार, विलास मंगीराज, डॉ.विलास वाहने, आशीर्वाद ऐरानी, विकास सावंत व महेशाचार्य उत्पात यांनी मूर्ती संवर्धना संदर्भातील तांत्रिक बाबींवर मार्गदर्शन केले.श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेची मूर्ती प्राचीन असून पूर्वीपासून नैसर्गिक पद्धतीने वज्रलेपन करण्यात येत होते. हीच पद्धत पुढेही वापरावी, अशी सूचना वीर महाराज यांच्यासह अन्य महाराज मंडळींनी बैठकीत केली.

## शेतांमध्ये हुमणी किडीच्या भुंग्यांचा प्रादूर्भाव

कराड,ता.१३(प्रतिनिधी)-

**पावसाच्या सुरूवातीच्या सरी कोसळल्यानंतर ग्रामीण भागात एक गंभीर समस्या निर्माण होत आहे. अनेक भागातील शेतांमध्ये सध्या हुमणी किडीच्या भुंग्यांचा मोठ्या प्रमाणावर प्रादूर्भाव दिसून येत आहे. मान्सूनपूर्व किंवा पहिल्या मोठ्या पावसानंतर जमिनीतून बाहेर पडणारे हे भुंगे रात्रीच्या वेळी कडुनिंब, निगुडी, तुती, जांभूळ, बाभूळ, बोर आणि बोरूड यासारख्या झाडांवर मोठ्या संख्येने जमा होऊन पाने फस्त करत आहेत.**

हुमणीची ही केवळ सुरूवात असून, या भुंग्यांचा वेळीच बंदोबस्त न केल्यास पुढे जाऊन त्यांची अंडी आणि अळ्या मुख्य पिकांचे विशेषतः ऊस, आले, हळद, सोयाबीन, भुईमूग मोठ्या प्रमाणावर नुकसान करू शकतात,असे विनायक यादव-पाटील यांनी सांगितले.

# पलूस येथे विद्यार्थ्यांसाठी आज करिअर मार्गदर्शन कार्यक्रम

पलूस,ता.१३(प्रतिनिधी)-

**विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक व व्यावसायिक भवितव्याची योग्य दिशा मिळावी या उद्देशाने प्रदीप कदम यांच्या संकल्पनेतून 'विद्यार्थी करिअर मार्गदर्शन सोहळा' आयोजित करण्यात आला आहे. हा मार्गदर्शन कार्यक्रम रविवार, ता.१४ जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजता श्री मंगल कार्यालय, पलूस येथे होणार आहे.**

या कार्यक्रमात प्रा.तोहिद मुजावर (एम.टेक सिव्हिल) विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. शालेय शिक्षणातील प्रगती, दहावी-बारावीनंतरच्या करिअरच्या विविध संधी, शिष्यवृत्ती योजना, शैक्षणिक क्षेत्रातील नवीन दिशा, सरकारी व खासगी क्षेत्रातील नोकरीच्या संधी तसेच अभियांत्रिकी क्षेत्रातील बदल आणि करिअर नियोजन याबाबत ते सविस्तर मार्गदर्शन करणार आहेत.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पलूस शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव घोंडीराम शिंदे हे राहणार असून प्रमुख पाहुणे म्हणून पीव्हीपी आयटी सांगली येथील प्रा.रोहित पाटील उपस्थित राहणार आहेत.या करिअर मार्गदर्शन सोहळ्याचा लाभ घेण्यासाठी परिसरातील सर्व शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# शक्तिपीठसाठी नागनाथअण्णा नीती अवलंबावी

## डॉ.अण्णासाहेब डांगे यांचे मत

आष्टा,ता.१३(प्रतिनिधी)-

**शक्तिपीठ महामार्गासाठी जमीन हस्तांतरण संपादन करताना क्रांतिवीर डॉ.नागनाथ अण्णा नायकवडी यांनी ४५ वर्षांपूर्वी अवलंबिलेल्या सामंजस्याचे धोरणाचा आदर्श शेतकरी नेते,शासन बाधित शेतकरी यांनी घ्यावा, असे मत माजी मंत्री डॉ.अण्णासाहेब डांगे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे व्यक्त केले आहे.**



डॉ.अण्णासाहेब डांगे यांनी म्हटले आहे की, सांगली जिल्ह्यातील वाळवे येथे हुतात्मा सहकारी साखर कारखान्याच्या उभारणीसाठी जमीन संपादन सुरू झाल्यानंतर संबंधित शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला होता.या परिस्थितीत नागनाथअण्णा नायकवडी यांनी जमिनींच्या मूळ मालकांच्या भावना लक्षात घेत पर्यायी जमिनी उपलब्ध करून देण्याची अभिनव भूमिका स्वीकारली.ही भूमिका शेतकऱ्यांनाही आपलीशी वाटली.

त्याअंतर्गत वाळवे परिसरातील विक्रीसाठी येणाऱ्या जमिनी कारखान्याने बाजारभावाने खरेदी कराव्यात आणि ज्यांच्या जमिनी कारखान्यासाठी संपादित झाल्या आहेत, अशा शेतकऱ्यांना त्यांच्या पसंतीनुसार त्या बदल्यात द्याव्यात,अशी व्यवस्था करण्यात आली.या पद्धतीमुळे शेतकऱ्यांचा विरोध कमी झाला आणि कारखान्यासाठी आवश्यक जमीन कोणताही संघर्ष न होता उपलब्ध झाली. डॉ.डांगे यांनी सांगितले की, संपादित जमीनधारकांना वर्ष-दीड वर्षाच्या कालावधीत पर्यायी जमिनी देण्यात आल्या आणि प्रश्न सामंजस्याने सोडविण्यात आला. हे उदाहरण आजही अनुकरणीय आहे.

शक्तिपीठ महामार्गाबाबत सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर शासन,शेतकरी आणि शेतकरी नेत्यांनी एकत्रितपणे चर्चा करून नागनाथअण्णा नायकवडी यांच्या धोरणाचा विचार करावा व त्यातून मार्ग काढावा, असे मत अण्णासाहेब डांगे यांनी मांडले आहे.

# शंभूतीर्थ परिसर बॅनर्स व हॉकर्समुक्त करावा

## नगरसेवक रवी पवार यांची मागणी

सातारा,ता.१३(प्रतिनिधी)-

**गोडोली तळ्याच्या परिसरात उभारण्यात येणाऱ्या धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या भव्य पुतळ्यामुळे हा परिसर लवकरच 'शंभूतीर्थ' म्हणून ओळखला जाणार आहे. स्वराज्यासाठी प्राणार्पण करणाऱ्या छ.संभाजी महाराजांच्या स्मृतीला साजेसा सन्मान मिळावा आणि या ऐतिहासिक स्थळाचे पावित्र्य अबाधित राहावे, यासाठी संपूर्ण परिसर बॅनर्समुक्त आणि हॉकर्समुक्त करण्याची मागणी स्वीकृत नगरसेवक रवी पवार यांनी केली आहे.**

गोडोली येथील जकात नाक्यालगत असलेल्या तळ्याच्या परिसरात छ.संभाजी महाराजांचा पुतळा उभारण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. या पार्श्वभूमीवर नगराध्यक्ष अमोल मोहिते आणि मुख्याधिकारी विनोद जळक यांना दिलेल्या निवेदनात रवी पवार यांनी या परिसराला विशेष संरक्षण देण्याची आवश्यकता अधोरेखित केली आहे.

निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, इतिहासाचा साक्षीदार असलेल्या गोडोली गावाला शंभूतीर्थाच्या माध्यमातून नवी ओळख मिळणार आहे. भविष्यात हजारो शिवप्रेमी, पर्यटक आणि नागरिक येथे दर्शनासाठी येतील. अशा ठिकाणी व्यावसायिक जाहिरातींचे होर्डिंग्ज, बॅनर्स किंवा अनधिकृत टपऱ्यांची गर्दी दिसणे हे या स्मारकाच्या गौरवाला शोभणारे नाही. शंभूतीर्थ परिसरात प्रवेश करताच प्रत्येकाला इतिहासाचा अभिमान आणि महाराजांच्या कार्याचा प्रेरणादायी वारसा जाणवावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. त्यामुळे गोडोली तळ्याच्या परिसरातील जाहिरातींचे फ्रेम तातडीने हटवून हा भाग 'नो बॅनर्स झोन' आणि 'नो हॉकर्स झोन' म्हणून घोषित करावा, अशी मागणी रवी पवार यांनी प्रशासनाकडे केली आहे. शंभूतीर्थाची ओळख केवळ स्मारकापुरती मर्यादित न राहता स्वच्छता, शिस्त आणि ऐतिहासिक जतनाचा आदर्श निर्माण करणारी ठरावी, अशी भावना शिवप्रेमींमधून व्यक्त होत आहे.

# शिराळा शहरात बंद असलेले स्ट्रीट लाईट अखेर सुरू

शिराळा,ता.१३(प्रतिनिधी)-

**शिराळा शहरातील प्रभाग क्रमांक ३ मध्ये गेल्या काही दिवसांपासून बंद असलेल्या स्ट्रीट लाईट दुरुस्त करून नवीन बल्ब बसवण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे. प्रभागातील कर्तव्यदक्ष नगरसेवक केदार नलावडे यांनी नागरिकांच्या समस्येची दखल घेत प्राधान्यक्रमाने हे लोकाभिमुख काम मार्गी लावले आहे.**

गेल्या काही दिवसांपासून प्रभागातील विविध भागांतील स्ट्रीट लाईट बंद असल्याने रात्रीच्या वेळी नागरिकांना, विशेषतः महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना अंधाराचा सामना करावा लागत होता. यामुळे अपघाताची आणि सुरक्षेची भीती निर्माण झाली होती. नागरिकांनी ही समस्या नगरसेवक केदार नलावडे यांच्याकडे मांडली.

समस्येचे गांभीर्य ओळखून केदार नलावडे यांनी तातडीने पावले उचलली आणि प्रभागातील प्रमुख भागांमधील बंद असलेले स्ट्रीट लाईट बल्ब बदलून घेतले. नेहमीच लोकाभिमुख कामांना आणि समस्यांच्या निराकरणाला प्राधान्य देणारे नगरसेवक म्हणून केदार नलावडे यांच्याकडे पाहिले जाते. स्ट्रीट लाईट अभावी नागरिकांना होणारा त्रास लक्षात घेऊन त्यांनी तात्काळ ही अडचण दूर केल्यामुळे संपूर्ण परिसरातून समाधान व्यक्त होत आहे. प्रभागातील विकासकामांसोबतच नागरिकांच्या दैनंदिन समस्या सोडवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, अशी प्रतिक्रिया यावेळी नलावडे यांनी दिली.

## फळझाडे व फुलझाडांच्या कलमाना मागणी वाढली

कराड,ता.१३(प्रतिनिधी)-

**पावसाळ्याच्या तोंडावर फळझाडे, फुलझाडांची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. वृक्षारोपणाचे कार्यक्रमही विविध सामाजिक, पर्यावरण प्रेमी संस्थांकडून राबविले जातात. या पार्श्वभूमीवर कराड शहर व परिसरातील नर्सरीमध्ये मोठ्या प्रमाणात फळझाडे व फुलझाडांची रोपे विक्रीसाठी उपलब्ध झाली असून त्याची विक्रीही होत आहे.**

नर्सरीमध्ये केसर, हापूस, रत्ना, पायरी, तोतापुरी, आम्रपाली आणि सदाबहार आंब्यांच्या जातींसह चार ते पाच फूट उंचीचे डबलबाटा आंबा कलमे उपलब्ध करण्यात आली आहेत.स्टार फ्रूट व वॉटर ॲपल यांसारखी एक्झोटिक फळझाडे, तसेच सोनचाफा, गुलाब, मोगरा, जाई, जुई आणि विविध रंगीबेरंगी फुलझाडांची रोपेही येथे उपलब्ध असल्याची माहिती नर्सरी व्यवस्थापनाने दिली.

# शक्तिपीठ महामार्गविरोधात दिवसेंदिवस जनआक्रोश तीव्र

## मसुचीवाडी,नवेखेड, जुनेखेडमध्ये शेतकरी महिलांचा एल्गार; महामार्ग रद्द करण्याची मागणी

वाळवा,ता.१३(प्रतिनिधी)-

**प्रस्तावित शक्तिपीठ महामार्गामुळे कृष्णा काठावरील परिसरात संतापाची लाट उसळली असून मसुचीवाडी, नवेखेड आणि जुनेखेड येथे शेतकरी महिला आक्रमक झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. महामार्गामुळे सुपीक शेती, घरे आणि स्थानिकांच्या उपजीविकेला धोका निर्माण होणार असल्याने सरकारने तात्काळ हा प्रकल्प रद्द करावा, अशी मागणी महिलांनी केली.**



मसुचीवाडी येथे शक्तिपीठ महामार्गाला विरोध करताना ग्रामस्थ.

मसुचीवाडी व नवेखेड परिसरात शेकडो महिला, युवक आणि ग्रामस्थ रस्त्यावर उतरले. यावेळी त्यांनी शक्तिपीठ महामार्गाविरोधात जोरदार घोषणाबाजी करत आपला निषेध व्यक्त केला.

यावेळी बोलताना माजी जिल्हा परिषद सदस्या जयश्री पाटील म्हणाल्या, 'हा शक्तिपीठ महामार्ग कोणत्याही परिस्थितीत होऊ देणार नाही. आम्ही सावित्रीच्या लेकी असून आमच्या शेतीवर आमचे आयुष्य आणि मुलांचे शिक्षण अवलंबून आहे. शेतीच राहिली नाही तर आम्ही जगायचे कसे?' असा थेट सवाल त्यांनी सरकारला केला. जबरदस्तीने प्रकल्प राबविण्याचा प्रयत्न झाल्यास त्याला जशास तसे उत्तर दिले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

रूपाली सपाटे म्हणाल्या, 'सरकारने शेतकऱ्यांना विश्वासात न घेता हा निर्णय घेतला आहे. आमच्या विनंतीचा विचार करून योग्य मार्ग काढला तर स्वागतच आहे; अन्यथा शेतकरी तीव्र आंदोलनाचा मार्ग स्वीकारतील. हा निर्णय आम्हाला कोणत्याही परिस्थितीत मान्य नाही.'

छायाताई पाटील यांनीही सरकारवर टीका करताना सांगितले की, 'मोजणीसाठी अधिकारी किंवा कर्मचारी पाठविले तर आम्ही आमच्या जमिनीवर पाऊल ठेवू देणार नाही. आमचा जीव गेला तरी चालेल, पण आमची काळी आई आम्ही वाचवणारच. कोणत्याही परिस्थितीत हा शक्तिपीठ महामार्ग आमच्या भागातून जाऊ देणार नाही.'

या आंदोलनात मसुचीवाडी, नवेखेड व जुनेखेड परिसरातील शेकडो महिला, युवक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. शक्तिपीठ महामार्गाविरोधातील जनआक्रोश दिवसेंदिवस तीव्र होत असून आगामी काळात आंदोलन आणखी तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**भारतीय भांडवली बाजार आणि कॉर्पोरेट जगतात सध्या एका अत्यंत धक्कादायक प्रकरणाने खळबळ उडवून दिली आहे. बाजार नियामक संस्था 'सेबी'ने देशातील अग्रगण्य सुवर्ण निर्यातदार कंपनी असणाऱ्या राजेश एक्सपोर्टस लिमिटेड आणि तिचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक राजेश मेहता यांच्यावर एक मोठा अंतरिम आदेश जारी केला आहे. सेबीने कंपनीवर आणि राजेश मेहता यांच्यावर सिक्युरिटीज मार्केटमध्ये खरेदी, विक्री किंवा कोणत्याही प्रकारचा व्यवहार करण्यास पूर्णपणे बंदी घातली आहे. या कारवाईचे मुख्य कारण म्हणजे कंपनीने आर्थिक वर्ष २०२१ ते २०२५ या ५ वर्षांच्या कालावधीत तब्बल १५.१५ लाख कोटी रुपयांचा (अंदाजे १७५ अब्ज डॉलर्स) एकत्रित महसूल फुगवून दाखवल्याचा प्राथमिक आरोप आहे. जर हा आरोप सिद्ध झाला, तर हा भारतीय कॉर्पोरेट इतिहासातील आजवरचा सर्वात मोठा महसूल गैरव्यवहार ठरेल.राजेश एक्सपोर्टस किंवा तत्सम मोठ्या प्रकरणांमुळे केवळ एका कंपनीचे नुकसान होत नाही, तर संपूर्ण देशाच्या वित्तीय व्यवस्थेच्या विश्वासार्हतेला तडा जातो.**

● रविवार विशेष




# वित्तीय व्यवस्थेच्या विश्वासार्हतेला तडा

भारतीय भांडवली बाजारात वेळोवेळी अनेक घोटाळे उघडकीस आले आहेत. काही घोटाळे शेअरच्या किमती कृत्रिमरीत्या वाढवण्याशी संबंधित होते, तर काही आर्थिक हिशेबांमधील फेरफारांशी. मात्र अलीकडे बाजार नियामक सेबीने राजेश एक्सपोर्ट्स लिमिटेड आणि त्याचे प्रवर्तक राजेश मेहता यांच्याविरोधात केलेल्या कारवाईने गुंतवणूकदार, विश्लेषक आणि कॉर्पोरेट क्षेत्राला मोठा धक्का दिला आहे. सेबीच्या अंतरिम आदेशानुसार वित्तीय वर्ष २०२१ ते २०२५ दरम्यान तब्बल १५.१५ लाख कोटी रुपयांचे उत्पन्न वाढवून दाखवण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. ही रक्कम इतकी प्रचंड आहे की तिची तुलना भारताच्या अनेक वर्षांच्या संरक्षण खर्चाशी केली जात आहे. आरोप सिद्ध होणे आणि आरोप करणे यात मोठा फरक असला तरी या प्रकरणाने भारतीय कॉर्पोरेट गव्हर्नन्स आणि लेखापरीक्षण व्यवस्थेवरील अनेक प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आणले आहेत.

एकेकाळी राजेश मेहता यांना भारतीय उद्योजकतेचे यशस्वी प्रतीक मानले जात होते. बंगळुरूमधील एका पारंपरिक व्यावसायिक कुटुंबातून आलेल्या मेहता यांनी आपल्या भावासोबत छोट्या दागिन्यांच्या व्यवसायातून सुरुवात केली. १९९० च्या दशकात भारतातील सुवर्णदागिने उद्योग मोठ्या प्रमाणात असंघटित स्वरूपात होता. अशा काळात त्यांनी आधुनिक उत्पादन सुविधा उभारल्या आणि सुवर्णदागिन्यांच्या निर्यात क्षेत्रात वेगाने विस्तार साधला. २०१५ मध्ये स्वित्झर्लंडमधील प्रसिद्ध व्हॅलकॅम्बी रिफायनरीचे अधिग्रहण हा त्यांच्या व्यावसायिक प्रवासातील महत्त्वाचा टप्पा ठरला. या व्यवहारामुळे राजेश एक्सपोर्ट्स जागतिक सुवर्णशुद्धीकरण उद्योगातील एक प्रभावशाली खेळाडू बनली. अनेक वर्षे कंपनीचा प्रचंड उलाढाल असलेला व्यवसाय आणि जागतिक उपस्थिती ही गुंतवणूकदारांसाठी आकर्षणाची बाब होती. मात्र सेबीच्या तपासात समोर आलेले आरोप अत्यंत गंभीर स्वरूपाचे आहेत. नियामकाच्या म्हणण्यानुसार कंपनीच्या परदेशी उपकंपन्यांकडून दाखवण्यात आलेल्या उत्पन्नापैकी जवळपास ९९.८ टक्के उत्पन्नाचा पुरेसा स्वतंत्र पुरावा उपलब्ध नाही. अनेक व्यवहारांचे सत्यापन होऊ शकले नाही. कंपनीने ज्या प्रमाणात जागतिक व्यवसाय केल्याचा दावा केला, त्यामागे प्रत्यक्ष व्यावसायिक हालचालींचा पुरावा कमी असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. याशिवाय काही व्यवहारांमध्ये अस्तित्वात नसलेल्या किंवा संशयास्पद व्यवहारांची नोंद करून उलाढाल कृत्रिमरीत्या वाढवली गेल्याचा आरोप आहे.

या प्रकरणातील आणखी एक धक्कादायक बाब म्हणजे अहमदाबादस्थित एका लहानशा ब्रोकिंग कंपनीशी संबंधित व्यवहार. कागदोपत्री हजारो कोटी रुपयांची खरेदी-विक्री दाखवण्यात आली, मात्र कर नोंदी आणि संबंधित पक्षांच्या निवेदनांमध्ये अशा व्यवहारांचा कोणताही ठोस पुरावा आढळला नाही. सेबीच्या मते या नोंदींचा उपयोग कंपनीची उलाढाल फुगवण्यासाठी आणि काही वैयक्तीक व्यवहार लपवण्यासाठी करण्यात आला असावा. याच पार्श्वभूमीवर कंपनीच्या निधीचा वापर प्रवर्तकांच्या वैयक्तिक व्यवहारांसाठी झाला का, हा प्रश्नही निर्माण झाला आहे.

राजेश एक्सपोर्ट्सने हे सर्व आरोप फेटाळले आहेत. कंपनीच्या म्हणण्यानुसार सेबीने काही आर्थिक आकडे चुकीच्या पद्धतीने समजून घेतले असून प्रत्यक्षात उत्पन्न आणि नफा यातील तांत्रिक फरक लक्षात न घेतल्याने हा गैरसमज निर्माण झाला आहे. कंपनीने सर्व आवश्यक कागदपत्रे सादर करण्याची तयारी दर्शवली आहे. त्यामुळे अंतिम निष्कर्ष येईपर्यंत कोणालाही दोषी ठरवणे योग्य ठरणार नाही. तथापि, इतक्या मोठ्या प्रमाणातील संशयामुळे निर्माण झालेली अनिश्चितता ही स्वतःमध्येच चिंतेची बाब आहे. या संपूर्ण प्रकरणातून सर्वात मोठा प्रश्न कॉर्पोरेट गव्हर्नन्सचा निर्माण होतो. एखाद्या कंपनीची उलाढाल हजारो कोटी रुपयांत असते, परंतु नफा अत्यंत कमी असतो, तेव्हा गुंतवणूकदारांनी अधिक सावध होणे आवश्यक असते. अनेक वेळा मोठी उलाढाल ही कंपनीच्या सामर्थ्याचे प्रतीक मानली जाते. मात्र उलाढालीपेक्षा रोख प्रवाह, नफा, कर्जाचे प्रमाण आणि व्यवसायाची गुणवत्ता अधिक महत्त्वाची असते. राजेश एक्सपोर्ट्सच्या बाबतीतही अनेक वर्षे उलाढाल प्रचंड होती, पण निव्वळ नफ्याचे प्रमाण अत्यंत कमी राहिले. अशा परिस्थितीत गुंतवणूकदारांनी केवळ महसुलाच्या आकड्यांवर अवलंबून न राहता आर्थिक पत्रकांचे सखोल विश्लेषण करणे आवश्यक असते.

या प्रकरणामुळे लेखापरीक्षकांची भूमिकाही चर्चेत आली आहे. कंपनीचे आर्थिक अहवाल अनेक वर्षे विविध लेखापरीक्षण प्रक्रियांमधून गेले. मग इतक्या मोठ्या प्रमाणातील संभाव्य विसंगती यापूर्वी का लक्षात आली नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे. भारतातील अनेक मोठ्या आर्थिक घोटाळ्यांमध्ये लेखापरीक्षकांच्या दक्षतेबाबत प्रश्न उपस्थित झालेले आहेत. त्यामुळे नियामक यंत्रणा, स्वतंत्र संचालक, लेखापरीक्षक आणि संस्थात्मक गुंतवणूकदार यांची जबाबदारी अधिक वाढते.

सामान्य गुंतवणूकदारांसाठी या प्रकरणातून काही महत्त्वाचे धडे मिळतात. सर्वप्रथम, कोणतीही कंपनी कितीही प्रसिद्ध असली किंवा तिचे बाजारमूल्य कितीही मोठे असले तरी अंधविश्वास ठेवू नये. दुसरे म्हणजे, एखाद्या कंपनीत मोठ्या संस्थात्मक गुंतवणूकदारांची उपस्थिती आहे म्हणून ती गुंतवणूक पूर्णपणे सुरक्षित आहे, असे समजू नये. अनेक वेळा मोठ्या संस्थांनाही चुकीचे आकलन होऊ शकते. तिसरे म्हणजे, पोर्टफोलिओमध्ये विविधता ठेवणे अत्यावश्यक आहे. एकाच कंपनीत किंवा क्षेत्रात मोठी गुंतवणूक केल्यास अशा घटनांमुळे मोठे नुकसान होऊ शकते. चौथे म्हणजे, वार्षिक अहवाल, रोख प्रवाह, कर्जाची स्थिती आणि व्यवस्थापनाची विश्वासार्हता यांचा नियमित आढावा घेणे आवश्यक आहे.

भारतीय भांडवली बाजार गेल्या दोन दशकांत प्रचंड वेगाने वाढला आहे. लाखो नवीन गुंतवणूकदार बाजारात दाखल झाले आहेत. अशा वेळी पारदर्शकता, जबाबदारी आणि विश्वास या तीन गोष्टी अधिक महत्त्वाच्या ठरतात. राजेश एक्सपोर्ट्स प्रकरणाचा अंतिम निकाल काहीही लागो, या घटनेने बाजाराला एक स्पष्ट संदेश दिला आहे. मोठी नावे, मोठी उलाढाल आणि जागतिक उपस्थिती यापेक्षा व्यवसायातील पारदर्शकता आणि विश्वासार्हता अधिक महत्त्वाची असते. गुंतवणूकदारांसाठीही हा प्रसंग सावधगिरीचा इशारा आहे. शेअर बाजारात संपत्ती निर्माण करण्यासाठी संधी जितक्या मोठ्या आहेत, तितकाच जोखीम व्यवस्थापनाचा आणि सखोल अभ्यासाचा मार्गही महत्त्वाचा आहे. दीर्घकालीन यश हे आकर्षक आकड्यांवर नव्हे, तर मजबूत मूलभूत तत्त्वांवर आधारित गुंतवणुकीतूनच मिळते.

भारतीय भांडवली बाजाराच्या इतिहासात आर्थिक हिशेबांतील फेरफार किंवा लेखांकनातील अनियमितता ही नवीन बाब नाही. २००९ मध्ये उघडकीस आलेले सत्यम कॉम्प्युटर सर्व्हिसेस प्रकरण आजही भारतीय कॉर्पोरेट क्षेत्रासाठी एक मोठा धडा मानले जाते. त्यावेळी कंपनीचे संस्थापक बी. रामलिंगा राजू यांनी हजारो कोटी रुपयांची रोकड आणि मालमत्ता कागदोपत्री दाखवली होती, जी प्रत्यक्षात अस्तित्वातच नव्हती. त्या घोटाळ्यामुळे केवळ कंपनीच कोसळली नाही, तर भारतीय आयटी उद्योगाच्या विश्वासार्हतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. त्यानंतर लेखापरीक्षण नियम अधिक कठोर करण्यात आले, स्वतंत्र संचालकांची भूमिका मजबूत करण्यात आली आणि नियामक संस्थांना अधिक अधिकार देण्यात आले. मात्र प्रत्येक दशकात अशा स्वरूपाची एखादी घटना समोर येते आणि बाजाराला पुन्हा एकदा वास्तवाचे भान करून देते.

जागतिक स्तरावर पाहिले तर अमेरिकेतील एनरॉन आणि वर्ल्डकॉम घोटाळा ही प्रकरणे कॉर्पोरेट इतिहासातील सर्वात मोठ्या लेखांकन घोटाळ्यांपैकी मानली जातात. या कंपन्यांनी अनेक वर्षे गुंतवणूकदार, बँका आणि विश्लेषकांना आकर्षक आकडे दाखवले; मात्र नंतर त्यामागील आर्थिक वास्तव पूर्णपणे वेगळे असल्याचे समोर आले. परिणामी लाखो गुंतवणूकदारांचे अब्जावधी डॉलर बुडाले आणि हजारो कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्या गेल्या. या घटनांनंतर अमेरिकेत कठोर कायदे लागू करण्यात आले. इतिहास सांगतो की, अशा प्रकारच्या प्रकरणांमध्ये सुरुवातीला कंपनीचे आकडे अतिशय प्रभावी दिसतात, परंतु प्रत्यक्ष नफा, रोख प्रवाह आणि व्यवसायातील गुणवत्ता यांचा सखोल अभ्यास केल्यास अनेकदा धोक्याची चिन्हे आधीपासून दिसू लागतात.

**– विश्वास सरदेशमुख**
ज्येष्ठ पत्रकार

● सामाजिक

# मध्य प्रदेशच्या निर्णयाची मिमांसा

लोकसंख्येचा प्रश्न हा कोणत्याही देशासाठी केवळ आकड्यांचा विषय नसतो; तो अर्थव्यवस्था, रोजगार, सामाजिक विकास आणि भविष्यातील मानवी संसाधनांशी थेट जोडलेला असतो. त्यामुळेच काळानुसार लोकसंख्येबाबतच्या सरकारी धोरणांमध्ये बदल होत असतात. मध्य प्रदेश सरकारने अलीकडेच दोनपेक्षा अधिक मुले असलेल्या नागरिकांनाही सरकारी नोकरीसाठी पात्र ठरवण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे जवळपास २५ वर्षांपासून अस्तित्वात असलेल्या दोन मुलांच्या अटीचा शेवट झाला आहे. हा निर्णय केवळ एका राज्यापुरता मर्यादित नसून भारतातील बदलत्या लोकसंख्या वास्तवाचे प्रतिबिंब मानावे लागेल.

२००१ मध्ये मध्य प्रदेशात दोनपेक्षा जास्त जिवंत अपत्ये असलेल्या उमेदवारांना सरकारी सेवेत थेट भरती किंवा पदोन्नतीसाठी अपात्र ठरवण्याचा नियम लागू करण्यात आला होता. त्या काळात राज्यातील एकूण प्रजनन दर ३.९ इतका होता. म्हणजे एका महिलेपासून सरासरी जवळपास ४ मुले जन्माला येत होती. वाढत्या लोकसंख्येमुळे विकासावरील ताण, मर्यादित संसाधनांवरील दबाव आणि रोजगाराच्या संधींवरील स्पर्धा यांचा विचार करून अशा कठोर उपाययोजना करण्यात आल्या होत्या. 'हम दो हमारे दो' ही संकल्पना त्या काळातील लोकसंख्या धोरणाचा केंद्रबिंदू बनली होती.

मात्र गेल्या दोन दशकांत परिस्थिती मोठ्या प्रमाणात बदलली आहे. शिक्षणाचा प्रसार, शहरीकरण, महिलांचे वाढते सक्षमीकरण, आरोग्यसेवांमधील सुधारणा आणि कुटुंब नियोजनाच्या व्यापक मोहिमांमुळे भारतातील प्रजनन दर सातत्याने घसरला आहे. मध्य प्रदेशात तो आता २.० वर आला आहे. लोकसंख्याशास्त्राच्या दृष्टीने २.१ हा 'प्रतिस्थापन प्रजनन दर' मानला जातो. या पातळीखाली प्रजनन दर गेल्यास दीर्घकालीन कालावधीत लोकसंख्या स्थिर राहण्याऐवजी घटू लागते. त्यामुळे पूर्वी लोकसंख्या वाढीची चिंता असलेल्या सरकारांना आता भविष्यातील कार्यक्षम मनुष्यबळाची चिंता वाटू लागली आहे.

ही चिंता केवळ मध्य प्रदेशापुरती मर्यादित नाही. आंध्र प्रदेशनेही अलीकडच्या काळात लोकसंख्या वाढीस प्रोत्साहन देणारे संकेत दिले आहेत. तेथील प्रजनन दर १.५ पर्यंत खाली आला आहे. परिणामी भविष्यात कामगारांची संख्या कमी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. वृद्ध लोकसंख्या वाढत असताना तरुण कार्यबल कमी होणे हे आर्थिक विकासासाठी गंभीर आव्हान ठरू शकते. म्हणूनच तेथील सरकारने अधिक मुले असलेल्या कुटुंबांना प्रोत्साहन देण्याचा विचार पुढे आणला आहे.

जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या भारतानेही आता या बदलत्या वास्तवाकडे गांभीर्याने पाहण्यास सुरुवात केली आहे. एकेकाळी लोकसंख्या नियंत्रणाच्या आक्रमक धोरणांसाठी ओळखला जाणारा चीन याचे सर्वात महत्त्वाचे उदाहरण आहे. १९८० मध्ये लागू करण्यात आलेल्या 'एक मूल धोरणा'मुळे चीनची

**भारतातील लोकसंख्या धोरण आता नियंत्रणापेक्षा व्यवस्थापनाकडे वळत आहे. मात्र कोणत्याही धोरणाचे अंतिम उद्दिष्ट लोकसंख्येची संख्या नसून त्या लोकांचे जीवनमान असले पाहिजे. अधिक शिक्षण, चांगल्या आरोग्य सुविधा, रोजगाराच्या संधी आणि आर्थिक समृद्धी उपलब्ध करून देण्यातच देशाच्या भविष्याची खरी गुरुकिल्ली दडलेली आहे. लोकसंख्या ही ओझे की शक्ती, हे शेवटी त्या समाजाच्या विकासाच्या पातळीवर अवलंबून असते.**



लोकसंख्या वाढ आटोक्यात आली; परंतु त्याचबरोबर जन्मदर झपाट्याने घसरला. परिणामी वृद्धत्वाकडे झुकणारी लोकसंख्या आणि घटणारे कार्यबल ही नवी संकटे निर्माण झाली. त्यामुळे चीनला २०१६ मध्ये दोन मुले आणि २०२१ मध्ये तीन मुले धोरण स्वीकारावे लागले.

भारतातही आज परिस्थिती वेगाने बदलत आहे. देशाचा एकूण प्रजनन दर १.९ वर आला आहे. अवघ्या २५ वर्षांपूर्वी तो ३.३ होता. बिहारमध्ये २.९, उत्तर प्रदेशात २.४ आणि झारखंडमध्ये २.३ असा दर असला तरी बहुतेक राज्यांनी प्रतिस्थापन पातळी गाठली किंवा ओलांडली आहे. यामुळे लोकसंख्या वाढीचा वेग पूर्वीच्या तुलनेत मोठ्या प्रमाणात मंदावला आहे.

अर्थात, याचा अर्थ कुटुंब नियोजनाचे महत्त्व संपले असा होत नाही. लोकसंख्येचे अनियंत्रित वाढणे जितके धोकादायक असते, तितकीच वेगाने घटणारी लोकसंख्याही चिंतेची बाब असते. कोणत्याही राष्ट्राला आवश्यक असते ती संतुलित लोकसंख्या रचना. पुरेसे तरुण कार्यबल, वाढती उत्पादकता आणि वृद्ध लोकसंख्येचा योग्य सांभाळ यांचा समतोल साधणे हेच खरे आव्हान आहे.

**– देवेंद्र व्यास**

● विशेष

# महागाईचा दणका

जागतिक बाजारपेठेतील घडामोडी आणि देशांतर्गत धोरणांमधील तफावत यामुळे सर्वसामान्य जनतेला महागाईच्या तीव्र झळा सोसाव्या लागत असल्याचे चित्र सध्या देशात निर्माण झाले आहे. या समस्येच्या मुळाशी पश्चिम आशियातील वाढता भू-राजकीय तणाव आणि होर्मुझ जलमार्गातील अडथळे कारणीभूत ठरत आहेत. आंतरराष्ट्रीय पातळीवरील पुरवठा साखळी खंडित झाल्याचा थेट आणि नकारात्मक परिणाम भारताच्या अर्थव्यवस्थेवर होत आहे, कारण भारत आपल्या गरजेच्या इंधनासाठी मोठ्या प्रमाणावर आयातीवर अवलंबून आहे. आयात खर्च वाढल्याचे कारण पुढे करत तेल कंपन्यांनी सातत्याने इंधन दरांमध्ये वाढ करण्याचा धडाका लावला आहे. गेल्या अवघ्या एका महिन्यात चार वेगवेगळ्या टप्प्यांत पेट्रोलच्या दरात प्रति लीटर ७.३५ रुपयांची आणि डिझेलच्या दरात ७.५३ रुपयांची मोठी वाढ करण्यात आली आहे. इंधनाचे दर वाढल्यामुळे वाहतूक खर्च वाढून इतर जीवनावश्यक वस्तूही महाग होत आहेत.

इंधन दरवाढीपाठोपाठ स्वयंपाकाच्या गॅसच्या किमतींमध्ये झालेली वाढ मध्यमवर्गीय आणि गरीब कुटुंबांचे आर्थिक बजेट कोलमडवणारी ठरली आहे. व्यावसायिक सिलिंडरचे दर आधीच गगनाला भिडलेले असताना, आता घरगुती रसोई गॅस सिलिंडरच्या दरातही प्रति सिलिंडर २९ रुपयांची वाढ करण्यात आली आहे. गेल्या तीन महिन्यांच्या कालावधीचा विचार केल्यास घरगुती गॅस ग्राहकांना बसलेला हा दुसरा मोठा फटका आहे. यापूर्वी मार्च महिन्यात गॅस सिलिंडरच्या दरात तब्बल ६० रुपयांची वाढ करण्यात आली होती. यामुळे अवघ्या तीन महिन्यांत घरगुती गॅस सिलिंडर एकूण ८९ रुपयांनी महागला आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे आणि गॅसचे दर वाढल्यामुळे तेल कंपन्यांना होणारे



नुकसान भरून काढण्यासाठी ही वाढ अपरिहार्य असल्याचा युक्तीवाद सरकार आणि संबंधित कंपन्यांकडून केला जातो. परंतु, जेव्हा आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती कमालीच्या घसरतात, तेव्हा त्याचा कोणताही थेट फायदा सर्वसामान्य ग्राहकांपर्यंत पोहोचवला जात नाही, याकडेही लेखात लक्ष वेधण्यात आले आहे.

जागतिक बाजारातील मंदीच्या काळात सरकार कर वाढवून स्वतःचा महसूल वाढवते, मात्र जेव्हा जागतिक स्तरावर किमती वाढतात, तेव्हा त्याचा संपूर्ण बोजा ग्राहकांच्या खिशावर टाकला जातो, हा विरोधाभास स्पष्ट दिसून येतो.


सध्याच्या या कठीण परिस्थितीला तोंड देण्यासाठी आणि एलपीजीची उपलब्धता देशात सुरळीत ठेवण्यासाठी सरकारने अनेक पर्यायी उपाययोजना केल्याचा दावा केला आहे. यामध्ये देशांतर्गत गॅस उत्पादनात ६० टक्क्यांहून अधिक वाढ करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. याशिवाय, पश्चिम आशियावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी अमेरिका, कॅनडा आणि अल्जीरिया या देशांमधून अतिरिक्त गॅस आयातीची विशेष व्यवस्था करण्यात आल्याची माहिती सरकारने दिली आहे. कागदावर हे पर्यायी उपाय अतिशय प्रभावी वाटत असले, तरी प्रत्यक्ष जमिनीवर या उपाययोजनांचा कोणताही सकारात्मक किंवा दिलासादायक परिणाम दिसून येत नाही.

देशातील ग्रामीण आणि दुर्गम भागातील वास्तव अतिशय चिंताजनक आहे. एकीकडे सरकार गॅसचा पुरवठा पुरेसा असल्याचा दावा करत असताना, दुसरीकडे ग्रामीण भागातील जनतेला एका गॅस सिलिंडरसाठी अजूनही कित्येक तास लांबच लांब रांगांमध्ये उभे राहावे लागत आहे. सिलिंडर मिळण्यात होणारा विलंब आणि त्याचा तुटवडा यामुळे नागरिकांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे.

गॅस सिलिंडरच्या वाढलेल्या किमतींमुळे आधीच त्रस्त असलेल्या जनतेला आता पुरवठ्यातील त्रुटींमुळे मनस्ताप सहन करावा लागत आहे. सरकारच्या या पर्यायी व्यवस्थापनातील त्रुटींमुळे महागाई नियंत्रणाचे आणि पुरवठा सुरळीत ठेवण्याचे शासकीय दावे केवळ घोषणाच ठरत आहेत, हेच यावरून स्पष्ट होते.

**– राधिका बिवलकर**

## दैनिक पंचांग(सुर्योदयकालीन ग्रहस्थिती)




**रविवार, ता.१४.६.२०२६**,विक्रमसंवत २०८२,शिवशक ३५३, शालिवहन शके १९४८,पराभव नाम संवत्सरे, उत्तरायणे, ग्रीष्म ऋतो, अधिक ज्येष्ठ मासे,कृष्ण पक्षे,चतुर्दशी तिथी, १२.२१ नंतर अमावस्या तिथी, रोहिणी नक्षत्र, २२.१६ नंतर मृग नक्षत्र, वृषभ रास, धृतियोग, १३.१७ नंतर शूल योग, शकुनी करण १२.२१ नंतर, चतुष्पाद करण २२.२४ पर्यंत, दिनमान १२.५६, सुर्योदय ६.०३, सुर्यास्त १९.०२ (कोल्हापूरचे) राहू काळ सायंकाळी ४.३० ते ६, अन्वाधात, दर्श अमावस्या दुपारी १२.२१ नंतर पितृकार्य अमावस्या.

**ज्यो:केशव पेटकर महाराज-९६०४७०९१५९**

## ✻ राशीभविष्य

**मेष**–तुमच्या संकल्पना अपयशी ठरणार नाहीत. तुमच्या प्रबळ इच्छाशक्तीमुळे कामात यश मिळवाल. कामाच्या ठिकाणी अपेक्षेपेक्षा चांगले परिणाम दिसून येतील.

**वृषभ**–नशिबावर हवाला ठेवून बसू नका, त्याऐवजी आपले आरोग्य सुधारण्याचा प्रयत्न करा. आर्थिक संकटाचा सामना करावा लागू शकतो.

**मिथून**– अडचणीवर मात कराल. तुमच्या कार्यक्षमतेने आणि चिकाटीने महत्वाची कामे पूर्ण होतील. वैवाहिक जीवन सुखाचे राहील. कुटुंबासोबत वेळ घालवाल.

**कर्क**–आरोग्याच्या दृष्टीने दिवस सामान्य आहे. मित्र-मैत्रिणींचा सहवास लाभेल. कामात यश मिळेल. तुमचा दिवस सकारात्मक राहील.

**सिंह**–कामात यश मिळवण्यासाठी मेहनत घ्यावी लागेल. जोडीदारासोबत चांगला वेळ जाईल. रागावर नियंत्रण ठेवा. आर्थिक प्राप्ती होईल.

**कन्या**–आजचा दिवस सुंदर असेल. कौटुंबिक कार्यात सहभागी होऊ शकता. भावंडांशी संपर्क साधाल. तुमचा इतरांवर प्रभाव राहील. महत्वाची कामे पार पडतील.

**तुळ**–आजचा दिवस तुमच्यासाठी प्रतिकूलतेचा असू शकतो. मोठे निर्णय विचारपूर्वक घ्या. रागावर नियंत्रण ठेवा. नोकरीत बढतीची शक्यता आहे.

**वृश्चिक**– घरात आनंदी वातावरण राहील. आज सकारात्मक विचार कराल.दिवस चांगला जाईल. कुटुंबासोबत वेळ घालवाल.तुमचा नवीन लोकांशी संपर्क येईल.

**धनु**–आपला संयम ढळू देऊ नका, विशेषत: कठीण समयी नियंत्रण ठेवा.आई -वडिलांच्या आरोग्यावर तुम्हाला धन खर्च करावे लागू शकते.यामुळे तुमची आर्थिक स्थिती बिघडेल.

**मकर**– घरात काम करताना विशेष काळजी घ्यावी लागेल. घरगुती वस्तुंची बेफिकीरपणे हाताळणी करणे तुम्हाला अडचणीत टाकू शकते.कामाच्या ठिकाणी वरिष्ठांकडून प्रशंसा होईल.

**कुंभ**–तुम्हाला व्यर्थ खर्च करण्यापासून स्वतःला थांबवले पाहिजे अथवा गरजेच्या वेळी तुमच्या जवळ पैशांची कमतरता होऊ शकते. कामानिमित्त प्रवासाचा योग.

**मीन**– नव्या आर्थिक करारांना अंतिम स्वरुप मिळाल्यामुळे ताजा अर्थपुरवठा होईल. वादविवाद टाळा.अतिखाणे टाळा. वायफळ खर्च करु नका.

महासत्ता हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक वसंतराव कृष्णाजी दत्तवाडे यांनी तरुण आर्टस् अ‍ॅन्ड प्रेस, गट नं. ४४४/२/३-ए , महासत्ता चौक, इचलकरंजी येथे छापून इचलकरंजी, सांगली, कराड व सातारा येथील कार्यालयातून प्रसिद्ध केले. आर.एन्.आय.रजि.नं. ६३११९/९४ मुख्य कार्यालय:'मँचेस्टर भवन' ४४४ /२/३-ए, महासत्ता चौक, इचलकरंजी-४१६११५. , दूरध्वनी क्रं.-०२३०-२४३४३४५ संपादकीय विभाग,२४३४३४३ जाहिरात विभाग, फॅक्स क्र. २४३५५११. विभागीय कार्यालय- मुंबई -दूरध्वनी क्र. २२६२४५६० , पुणे - दूरध्वनी २४४९१०६० , सातारा दूरध्वनी क्र. २३३४०१. कराड -दूरध्वनी क्र. २२४५६४ , इस्लामपूर- २२४११९., सांगली - दूरध्वनी क्रं.२३७३७५५.✻ कोल्हापूर - दूरध्वनी क्रं. २५४५४०१ , गडहिंग्लज - दूरध्वनी क्र.२२२९४९., निपाणी- दूरध्वनी क्रं.२२२१६५., चिकोडी दूरध्वनी क्र.२७३०३१. टीप- पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी जाहिरात प्रतिनिधी श्री. दि. पा. मोमीन यांचेवर राहील. मा. संपादक किंवा व्यवस्थापकीय संपादक यांचेवर रहाणार नाही.

# महायुतीत धुसफूस नाही, धैर्यशील कदम विजयी होतील

## मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले : महायुतीच्या बैठकीकडे घटक पक्षांची पाठ




**कराड,ता.१३(प्रतिनिधी) –**

**महायुतीमध्ये कोणताही अंतर्गत संघर्ष किंवा मतभेद नसल्याचा दावा सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केला. महायुतीचे उमेदवार धैर्यशील कदम हे अपेक्षेपेक्षा अधिक मताधिक्याने सातारा–सांगली स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीत विजयी होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.**

मंत्री भोसले म्हणाले, पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी केलेल्या वक्तव्याचा नेमका संदर्भ तपासावा लागेल. मात्र महायुतीमध्ये कोणतीही धुसफूस नसून, सर्व घटक पक्ष निवडणुकीत एकत्रितपणे काम करत आहेत. देसाई यांच्या वक्तव्याचा कोणीही चुकीचा अर्थ काढू नये.मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासाठी समृद्धी महामार्ग जितका महत्त्वाकांक्षी प्रकल्प होता, त्याचप्रमाणे शक्तिपीठ महामार्गही राज्याच्या विकासासाठी महत्त्वाचा आहे.या प्रकल्पाबाबत शेतकरी किंवा नागरिकांच्या जमिनीच्या मोबदल्यासंदर्भात काही हरकती असतील, तर त्या शासनापुढे मांडाव्यात. मात्र काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) या विषयाचे राजकीय भांडवल करत असून, विकासकामांमध्ये अडथळे निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असल्याचा आरोप त्यांनी केला.

दरम्यान, विधान परिषद निवडणुकीच्या अनुषंगाने महायुतीची महत्त्वपूर्ण बैठक आयोजिली होती. या बैठकीस मंत्री चंद्रकांत पाटील, मंत्री जयकुमार गोरे, खास.उदयनराजे भोसले, विक्रम पावसकर, जिल्हाध्यक्ष आम. डॉ. अतुल भोसले, आम. मनोज घोरपडे, माजी आम.आनंदराव पाटील, भरत पाटील, सत्यजित पाटील, रामकृष्ण वेताळ यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.शिवसेना शिंदे गटाचे नेते व पालकमंत्री शंभूराज देसाई, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे नेते व मदत–पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी बैठकीस अनुपस्थिती दर्शविल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले. या अनुपस्थितीमुळे महायुतीतील अंतर्गत मतभेद पुन्हा एकदा चर्चेत आले असले, तरी त्यास मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी स्पष्ट शब्दांत फेटाळून लावले.

# श्री विष्णू लक्ष्मी मंदिरात विविध कार्यक्रम



**कुरुंदवाड,ता.१३ (प्रतिनिधी)–**

**येथील पुरातन श्रीमंत श्री विष्णू लक्ष्मी मंदिरात पुरुषोत्तम मास (अधिक ज्येष्ठ) निमित्त श्री विष्णुसहस्रनाम, स्तोत्र पठण, राम रक्षा, गीता अध्याय आणि आरती पुष्पांजली उत्सव सुरू आहे.**

शनिवारी अधिक ज्येष्ठ मासातील कृष्ण पक्षातील श्री विष्णू लक्ष्मीची पूजा नृसिंहवाडी येथील विशाल जोशी यांच्या हस्ते श्रींना पोशाख अर्पण करून पंचामृत अभिषेक करण्यात आला. विष्णू पुराणनिमित्त मंदिराचे पुरोहित दिलीप फाटक व त्यांच्या कुटुंबीयांनी पूजा पाठ केला.१४ रोजी सकाळी ११ वाजता महाप्रसादाचे वाटप करण्यात येईल.

# इमारतीच्या बांधकामासाठी निधीची कमतरता जाणवणार नाही - मंत्री पाटील



**कोल्हापूर, ता.१३ (प्रतिनिधी)–**

**राज्य शासनाकडून सुधारीत मान्यतेनुसार सुमारे ३३० कोटी रुपये खर्च करून शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय (कोल्हापूर)च्या प्रांगणामध्ये विविध इमारती उभा करण्यात येत आहेत.या अत्याधुनिक इमारतींच्या उभारणीसाठी आवश्यक तो निधी शासनामार्फत दिला जाईल,निधीची कमतरता जाणवणार नाही,अशी ग्वाही उच्च व तंत्र शिक्षण तथा संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.**

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या नेचर पार्क या ठिकाणी आढावा बैठक झाली.यावेळी मनपा आयुक्त डॉ.राजेंद्र भारूड, उच्च तंत्र शिक्षण संचालक डॉ.विनोद मोहितकर, सह संचालक डॉ. दत्तात्रय जाधव, प्राचार्य कॅप्टन नितीन सोनजे,समन्वयक रणजीत सावंत,डॉ.किरण कोळेकर,विद्युत विभागाच्या कार्यकारी अभियंता एच.डी.कट्टी आदी उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले, या नूतन इमारतीत पाणी पुरवठ्याच्या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभाग ४ कोटी तर उच्च तंत्र शिक्षण विभागामार्फत ५ कोटी रुपये खर्च करून या ठिकाणी कायम स्वरूपी पाणीपुरवठ्याची सोय केली जाईल.तसेच एमपीएससी मार्फत उच्च तंत्र शिक्षण विभागात सुमारे साडे तीनशे प्राध्यापकांची भरती करण्यात आली आहे.या प्रक्रियेला लवकरच अंतिम स्वरूप मिळेल, असे सांगून,कोल्हापूरच्या शासकीय महाविद्यालयाचा दर्जा अतिशय चांगला असल्याचे निरीक्षणही त्यांनी नोंदविले. शासकीय तंत्रनिकेतन येथे स्थापन करण्यात आलेल्या उत्कृष्टता केंद्राचे उद्घाटन मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते झाले.राज्यात तंत्रनिकेतन स्तरावर कोल्हापूर येथे शासकीय तंत्रनिकेतन या ठिकाणी एकमेव उत्कृष्टता केंद्र उभारण्यात आले आहे. यावेळी मनपाचे जल अभियंता हर्षजित घाटगे यांच्यासह शासकीय व तंत्रनिकेतन महाविद्यालयाचे इतर प्राध्यापक - कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# विकासासाठी एकत्र येण्याची गरज : ॲड. उदयसिंह पाटील



**कराड,ता.१३ (प्रतिनिधी)–**

**सहकार क्षेत्रातील जुने संघर्ष विसरून विकासासाठी एकत्र येण्याची गरज असल्याचे प्रतिपादन रयत संघटनेचे नेते ॲड. उदयसिंह पाटील–उंडाळकर यांनी जयवंतराव भोसले सहकार पॅनेलच्या प्रचारादरम्यान केले.**

कृष्णा सहकारी साखर कारखान्याच्या पंचवार्षिक निवडणुकीच्या रणधुमाळीत भोसले आणि उंडाळकर गटाच्या एकत्रित नेतृत्वाचा संदेश कार्वे (ता. कराड) येथील प्रचारसभेत देण्यात आला.

ते म्हणाले, स्व. जयवंतराव भोसले आणि स्व. विलासकाका पाटील–उंडाळकर यांनी उभ्या केलेल्या सहकार चळवळीचा वारसा जपण्यासाठी सहकार्याचा मार्ग स्वीकारण्याची वेळ आली आहे. राजकीय मतभेद असू शकतात मात्र सहकारी संस्था सक्षम ठेवण्यासाठी सर्वांनी एकत्र येणे आवश्यक आहे. आ. डॉ. अतुल भोसले आणि आपण महायुतीच्या माध्यमातून एकत्र काम करत असल्याचा उल्लेख करत त्यांनी सभासदांनीही विकासाभिमुख भूमिका स्वीकारावी, असे आवाहन केले.

कारखान्याचे चेअरमन डॉ. सुरेश भोसले यांनी, तोडणी–वाहतूक संघटनेतील कथित ६० कोटी रुपयांचा घोटाळा, शेकडो सभासदांच्या बनावट सह्यांद्वारे झालेली कर्जप्रकरणे, तसेच हजारो कामगारांच्या भरतीतील अनियमितता यांचा उल्लेख करत या व्यवहारांतील कोट्यवधी रुपयांचा हिशोब अद्याप स्पष्ट झालेला नसल्याचा दावा केला. कारखाना आपल्या ताब्यात आला तेव्हा आर्थिक परिस्थिती अत्यंत गंभीर होती. राज्यभर झालेली बदनामी दूर करून कारखाना पुन्हा सक्षम करण्यासाठी मोठे प्रयत्न करावे लागल्याचे त्यांनी सांगितले. भोसले आणि उंडाळकर घराण्यांनी सहकार क्षेत्रात केलेल्या योगदानाचा उल्लेख करत त्यांनी भविष्यातही विविध सहकारी संस्थांमध्ये परस्पर सहकार्य कायम राहील, असा विश्वास व्यक्त केला.यावेळी प्रा. धनाजी काटकर,डॉ. सुधीर जगताप, पै. आनंदराव मोहिते, बी.एन. थोरात, सुजित थोरात, रंगराव थोरात , प्रताप कणसे यांच्यासह. कार्वे–काले परिसरातील ऊस उत्पादक शेतकरी व सभासद उपस्थित होते.

# घरकुलांचे वितरण येत्या महिन्याभरात

**निपाणी,ता.१३ (प्रतिनिधी)–**

**नगरपालिकेच्यावतीने राजीव गांधी हौसिंग कार्पोरेशन आश्रय योजना जी प्लस २ अंतर्गत बांधण्यात आलेल्या घरकुलांचे वितरण येत्या महिन्याभरात सर्व आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून करण्यात येईल, अशी ग्वाही जिल्हाधिकारी आणि नगरपालिकेच्या आयुक्तांनी दिले आहे.यामुळे सोमवारी १५ जून रोजी होणारे उपोषण पुढे ढकलण्यात आल्याची माहिती माजी नगराध्यक्ष विलास गाडीवड्डर यांनी पत्रकार परिषदेत दिली.**

ते म्हणाले, शहरातील बेघर गरजूंना हक्काची घरे मिळावीत यासाठी वेळोवेळी पाठपुरावा केला आहे.घरकुल वितरणप्रसंगी गोंधळ घालण्यात आला.योग्य पात्र घरकुल लाभार्थ्यांना न्याय मिळाला पाहिजे. लवकर त्यांना घरे हस्तांतरित केली जावीत या उद्देशाने याचा पाठपुरावा आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांच्याकडे केला.त्यानुसार येत्या १५ जूनपर्यंत घरांचे वितरण न केल्यास नगरपालिकेसमोर उपोषण करण्याचा इशारा दिला होता.

या पार्श्वभूमीवर अधिकारी वर्गाने खुलासा करत लाभार्थींच्या यादींची विविध निकषांनुसार पडताळणी करून पात्र आणि अपात्र लाभार्थ्यांची छाननी करण्यात येईल,त्यानंतर ती यादी जाहीर करण्यात येणार आहे.त्यानंतर घरकुलांचे वितरण करण्यात येणार आहे. त्यामुळे येत्या महिन्याभरासाठी आंदोलन पुढे ढकलण्यात यावे असे आवाहन केल्याने उपोषण आंदोलन पुढे ढकलत असून या कालावधीत घरकुलांचे वितरण न केल्यास उग्र आंदोलन करणार असल्याचे गाडीवड्डर यांनी सांगितले. पत्रकार परिषदेला बाळासाहेब देसाई–सरकार, डॉ.जसराज गिरे, विनोद चोरगे, अनिल संकपाळ, विकास जाधव उपस्थित होते.

### विलास गाडीवड्डर यांचे उद्याचे उपोषण स्थगित



पत्रकार बैठकीत बोलताना विलास गाडीवड्डर, शेजारी बाळासाहेब देसाई–सरकार व इतर.

# श्रीक्षेत्र शांतिगिरीवर उद्या महामस्तकाभिषेक सोहळा

**बेडकिहाळ,ता.१३(वार्ताहर)–**

**कोथळी–कुपानवाडी येथील श्रीक्षेत्र शांतिगिरीवर श्री १००८ चंद्रप्रभ भगवान, श्री १००८ शांतिनाथ भगवान, श्री १००८ महावीर भगवान यांच्या मूर्तींवर महामस्तकाभिषेक सोहळा व वात्सल्य मूर्ती, भारतगौरव आचार्यरत्न प.पू. १०८ देशभूषण महाराज यांची ३९ वी पुण्यतिथी व शांतमूर्ती आचार्य १०८ वरदत्तसागर महाराज यांची २० वी पुण्यतिथी समारंभ, राष्ट्रसंत १०८ आचार्य गुणधरनंदी महाराज सहसंघ, स्वस्तिश्री जिनसेन भट्टारक पट्टाचार्य महास्वामी (नांदणी मठ), स्वस्तिश्री लक्ष्मीसेन भट्टारक पट्टाचार्य महास्वामी (कोल्हापूर), स्वस्तिश्री धर्मसेन भट्टारक पट्टाचार्य महास्वामी (वरुर), चिंचणी मठाचे धर्माधिकारी शिवप्रसाद देवरु, आचार्य १०८ शांतीसेन मुनी महाराज तसेच माताजींच्या दिव्य सानिध्यामध्ये सोमवारी १५ रोजी विविध धार्मिक कार्यक्रम होणार असल्याची माहिती श्री १०८ आचार्यरत्न देशभूषण दिगंबर जैन शांतिगिरी ट्रस्टचे संचालक श्रीपाल मुन्नोळे यांनी पत्रकार बैठकीत दिली.**

आचार्य श्री १०८ शांतसेन मुनी महाराज यांच्या सानिध्यात स्वागत संचालक किरण पाटील यांनी केले. मुन्नोळे म्हणाले, शांतिगिरीवर १५ रोजी पहाटे ५ वाजता मंगल निनाद, ६.३० वाजता ध्वजारोहण, सकाळी ८ ते ९ वा. पंचामृत अभिषेक महाशांतीधारा जिनवाणी,आचार्य श्रींचा प्रतिमा शोभायात्रा, पादुका महाअभिषेक, कार्यक्रम झाल्यानंतर सकाळी ११ ते १ या दरम्यान श्री १००८ चंद्रप्रभू विधान, दुपारी २ ते सायंकाळी ४ पर्यंत विनयांजली सभा झाल्यानंतर सायंकाळी ६ वाजेपर्यंत तिन्ही मूर्तींचा महामस्तकाभिषेक सोहळा होणार आहे.

यावेळी ट्रस्ट कमिटीचे अध्यक्ष ॲड.पद्माकर पाटील, पासगौडा पाटील, पायगौडा खोत , नितीन गांधी, तात्यासाहेब पाटील, कल्लाप्पा मगेन्नावर, तात्यासाहेब पाटील, अनगौडा पाटील, बाळगोडा पाटील, भाऊसाहेब पाटील, संदीप पाटील, तात्यासाहेब खोत, बाहुबली खोत, प्रकाश कुट यांच्यासह सुरेश पांगीरे, रावसाहेब सकलकनावर उपस्थित होते.व्यवस्थापक मनोहर दोड्डनवर यांनी आभार मानले.



महामस्तकाभिषेक सोहळ्याची माहिती देताना श्रीपाल मुन्नोळे, बाजूला किरण पाटील, शांतीसेन महाराज व इतर.

# श्वसनविकार – उपचार विषयावर परिसंवाद

**सांगली, ता. १३ (प्रतिनिधी)–**

**जागतिक दमा दिनानिमित्त जनरल प्रॅक्टिशनर्स फोरम,(सांगली)तर्फे श्वसनविकार – उपचार परिसंवाद आयोजिला होता.**

डॉ. आशिष मडके यांनी, दमा आणि सीओपीडी या विषयावर अस्थमा आणि क्रॉनिक ऑब्स्ट्रक्टिव्ह पल्मोनरी डिसीज यांमधील महत्त्वाचे फरक तसेच श्वसनविकारांची लक्षणे, निदान आणि आधुनिक उपचारांसाठी प्रगत धोरणे याबाबत मार्गदर्शन केले. वैद्यकीय व्यावसायिकांमध्ये श्वसनविकारांबाबतची चिकित्सकता आणि उपचारपद्धती अधिक प्रभावी करण्यासाठी व्यावहारिक दृष्टिकोन मजबूत करणे हा या परिसंवादामागील उद्देश होता. जी.पी. फोरमचे अध्यक्ष डॉ. विनय संकपाळ,सचिव डॉ. विक्रम कोळेकर यांनी या परिसंवादाचे आयोजन केले. यावेळी डॉ. परवेज नाईकवाडे, डॉ. दिलीप शिंदे इतर सदस्य उपस्थित होते.




**महावितरण** — वीज बंद निवेदन

म.रा.वि.वितरण कंपनीच्या मंडल कार्यालयाच्या अंतर्गत येणाऱ्या ग्राहकांना सुचित करण्यात येते अतिशय तातडीच्या दुरुस्तीच्या व देखभालीच्या कामामुळे सोमवार दिनांक **१५.०६.२०२६** रोजी खालील भागातील व आसपास परिसरातील वीज बंद राहणार आहे. तरी वीज ग्राहकांनी सहकार्य करावे. वीज पुरवठा कामाच्या वेळेनुसार दिलेल्या वेळेपूर्वी किंवा नंतर पूर्ववत होऊ शकतो.

| | |
|---|---|
| १ | **३३ केव्ही गारगोटी वाहिनी (कालावधी: स. ०९.०० ते सायं. १७.००) बाधीत क्षेत्र:** पिंपळगाव, पांगीरे, मांगनूर, अरळगुंडी, दिंडेवाडी, बेगावडे, बारवे. |
| २ | **३३ केव्ही ॲक्का वाहिनी (कालावधी: स. १०.०० ते दु. १५.००) बाधीत क्षेत्र:** चंदगड अंतर्गत ॲक्का या वाहिनीवरील ग्राहक |
| ३ | **३३ केव्ही चंदगड वाहिनी (कालावधी: स. १०.०० ते दु. १५.००) बाधीत क्षेत्र:** चंदगड, हेरे, कुर्तनवाडी, हंबीरे, झांबरे |
| ४ | **३३ केव्ही कानुर वाहिनी (कालावधी: १०.०० ते दु. १५.००) बाधीत क्षेत्र:** कानुर, कुरणी, पुंद्रा, बिजूर |
| ५ | **३३ केव्ही शहापूर वाहिनी (कालावधी: स. १०.०० ते सायं. १८.००) बाधीत क्षेत्र:** तारदाळ, खंजीरे इंडस्ट्रीयल इस्टेटचा काही भाग, तुळजा भवानी मंदिर परिसर, कोरोची नाका, तुळजा भवानी अपार्टमेंट |
| ६ | **३३ केव्ही प्राईड इंडिया वाहिनी (कालावधी: स. ०९.०० ते सायं. १७.००) बाधीत क्षेत्र:** यड्राव परिसर अंतर्गत प्राईड इंडिया या वाहिनीवरील ग्राहक |
| ७ | **३३ केव्ही रुई–चंदूर वाहिनी (कालावधी: स. ०८.०० ते दु. १६.००) बाधीत क्षेत्र:** चंदूर, रुई अंतर्गत येणारा काही भाग, कोरोची अंतर्गत येणारा काही भाग, शहापूर अंतर्गत येणारा काही भाग |
| ८ | **३३ केव्ही शिरदवाड वाहिनी (कालावधी: स. १०.०० ते दु. १५.००) बाधीत क्षेत्र:** शिवनाकवाडी, शिरदवाड, लाटवाडीचा काही भाग |
| ९ | **३३ केव्ही पार्वती वाहिनी (कालावधी: स. १०.०० ते दु. १५.००) बाधीत क्षेत्र:** यड्राव, तारदाळ, खोतवाडी काही भाग |
| १० | **३३ केव्ही जीआईएस वाहिनी (कालावधी: स. १०.०० ते दु. १५.००) बाधीत क्षेत्र:** तांबे माळ, इचलकरंजी मेन रोड, एसटी स्टँड परिसर, शाहू कॉर्नर, ओल्ड गांधी कॅम्प परिसर, पाणीपुरवठा केंद्र, कुडचे मळा, निरामय परिसर व लक्ष्मी प्रोसेसिंग एच टी ग्राहक |
| ११ | **३३ केव्ही सोनगे वाहिनी (कालावधी: स. ०९.०० ते दु. १२.००) बाधीत क्षेत्र:** चिमगाव, अवचीतवाडी, शिंदेवाडी, दौलवाडी, यमगे, हळदी, हळदवडे, करंजीवने |
| १२ | **३३ केव्ही खडकेवाडा वाहिनी (कालावधी: स. १०.०० ते सायं. १७.००) बाधीत क्षेत्र:** खडकेवाडा, चिखली, बिळूंकी, गलगले, लिंगनूर, अर्जुने, देवचंद कॉलेजचा काही भाग |
| १३ | **३३ केव्ही दुधाळी वाहिनी (कालावधी: स. ०८.०० ते दु. १२.००) बाधीत क्षेत्र:** दुधाळी, गंगावेश, पापाची तिकटी, महाद्वार रोड, शिवाजी पेठ परिसर, साकोली कॉर्नर, फुलेवाडी रिंग रोड, रंकाळा परिसर, खानसरीचा भाग, बुधवार पेठ, सोन्या मारुती चौक, हरी मंदिर, लक्षतीर्थ वसाहत, मस्कुती, शुक्रवार गेट, बाजार गेट, सिद्धार्थ नगर, खोल खंडोबा, कसबा गेट, पंचगंगा हॉस्पिटल रोड, शनिवार पेठ, पोस्ट ऑफिसचा परिसर |
| १४ | **३३ केव्ही सी–ब्लॉक वाहिनी (कालावधी: स. ०८.०० ते दु. १२.००) बाधीत क्षेत्र:** फाय स्टार एमआयडीसी परिसर अंतर्गत सी–ब्लॉक या वाहिनीवरील सर्व ग्राहक |
| १५ | **११ केव्ही इंदिरा नगर वाहिनी (कालावधी: स. ०८.०० ते सायं. १७.००) बाधीत क्षेत्र:** इंदिरा नगर |
| १६ | **३३ केव्ही उत्तुर वाहिनी (कालावधी: स. १०.०० ते दु. १३.००) बाधीत क्षेत्र:** बहिरेवाडी, मुमेवाडी, चव्हाणवाडी, पेंढारवाडी, अर्धाळ, चिमणे, धामणे, होन्याळी, करपेवाडी, हालेवाडी, वडकशिवाले, महागोंड, वजारे, बेलेवाडी, महागोंडवाडी, झुलपेवाडी, घटागरवाडी, कुसळवाडी |
| १७ | **३३ केव्ही कागल वाहिनी (कालावधी: स. १०.०० ते सायं. १८.००) बाधीत क्षेत्र:** कागल |
| १८ | **३३ केव्ही कुरुंदवाड वाहिनी (कालावधी: स. ११.०० ते दु. १३.००) बाधीत क्षेत्र:** कुरुंदवाड, नृसिंहवाडी, हेरवाड, तेरवाड, बस्तवाड, अकिवाट, भैरेवाडी |

कोप/पीआरओ नं. ८९/२०२६–२७ — अधीक्षक अभियंता (कोमं), कोल्हापूर


# कृषी चर्चा सत्राच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवा

## –आ.अशोकराव माने



कृषी कार्यशाळेच्या शुभारंभप्रसंगी आम.अशोकराव माने, जालिंदर पांगरे, पोपट पाटील व इतर.

**हातकणंगले, ता.१३ (प्रतिनिधी)**

**कृषी चर्चासत्रांच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी कृषी विभागाने प्रयत्न करावेत, असे आवाहन आम. अशोकराव माने यांनी केले. हातकणंगले येथे राष्ट्रीय खाद्य तेल अभियान जमीन आरोग्य व खरीप पिक व्यवस्थापन कार्यशाळा झाली.**

ते म्हणाले, शेतकऱ्यांनी तज्ञ लोकांचे मार्गदर्शन घेऊन शेतीतून अधिक उत्पन्न घेण्यासाठी प्रयत्न करावेत. चुकीची औषधे बियांणे–खते शेतकऱ्यांच्या माती मारू नयेत.कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी यासाठी बैठक बोलावली आहे. कृषी शास्त्रज्ञ डॉ.शांतिकुमार पाटील म्हणाले, नियोजनाने व्यवसायिक होऊन शेती करा. एआय तंत्र ज्ञानाने बारा महिने हवामान तापमान वातावरण याचा एकत्रित वापर करून शेती करण्याची गरज आहे. शेतकऱ्यांनी पाण्याचे योग्य नियोजन करण्यासाठी एआय तंत्रज्ञानाचा वापर करावा. यामुळे जमिनीतील पाण्याचा पोत सुधारण्यास मदत होईल.

वरिष्ठ शास्त्रज्ञ व कृषी विज्ञान केंद्र (तळसंदे) चे प्रा.डॉ जयवंत जगताप यांनी पाऊस लांबणीवर पडत चालल्याने शेतकऱ्यांनी पाण्याचे नियोजन करावे.पाण्याची बचत करा, लावणी ऐवजी खोडवे ठेवा. पाण्याचे प्रमाण बघून पिकांचे नियोजन करा, असा सल्ला दिला.प्रास्ताविक तालुका कृषी अधिकारी स्वप्नील माने केले.

कार्यक्रमास पं.स.सभापती अश्विनी बिरांजे, जि. प. सदस्य सलिम महात, जिल्हा कृषी अधिक्षक जालिंदर पांगरे, पोपट पाटील,पं.स. सदस्य माया लोखंडे, माधुरी परीट, नंदू माळी, डॉ.अभयकुमार बागडे, प्रकाश कौंदाडे,शुभम पाटील, विश्वास चव्हाण, रमेश परीट, नंदु मिसाळ, महादेव जाधव यांच्यासह शेतकरी उपस्थित होते .

# कोजिमाशिच्या चेअरमनपदी राजेंद्र पाटील ; प्रकाश कोकाटे व्हा. चेअरमन

**सैनिक टाकळी,ता.१३ (प्रतिनीधी)–**

**कोल्हापूर जिल्हा माध्यमिक शिक्षण सेवकांची सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी राजेंद्र मारुती पाटील तर व्हा.चेअरमनपदी प्रकाश रामचंद्र कोकाटे यांची बिनविरोध निवड झाली. शिक्षक नेते दादासाहेब लाड यांच्या मार्गदर्शनाखाली निवडी झाल्या.अध्यक्षस्थानी निवडणूक निर्णय अधिकारी चंद्रकांत इंगवले होते.**





निवड प्रक्रियेचे वाचन मुख्य कार्यकारी अधिकारी जयवंत कुरडे यांनी केले.शाहूपुरी येथील मुख्य कार्यालयातील बैठकित चेअरमनपदासाठी राजेंद्र पाटील यांचा व व्हा. चेअरमन पदासाठी प्रकाश कोकाटे यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने ही निवड बिनविरोध झाली. यावेळी मनोहर पाटील,शीतल हिरेमठ,श्रीकांत कदम, अविनाश चौगले, बाळ डेळेकर,डॉ.दत्तात्रय घुगरे, दिपक पाटील, सचिन शिंदे, राजाराम शिंदे,राजेंद्र रानमाळे, मदन निकम, उत्तम पाटील, शरद तावदारे, पांडुरंग हळदकर,श्रीकांत पाटील,सुभाष खामकर,जितेंद्र म्हैशाळे,ऋतुजा पाटील,पांडुरंग पाटील यांच्यासह उपमुख्य कार्यकारी अधिकारी उत्तम कवडे उपस्थित होते. सभासदांनी स्वाभिमानी सहकार आघाडीवर विश्वास ठेवून चौथ्यांदा एकहाती सत्ता दिली . त्यामुळे सभासदांचे हित डोळ्यासमोर ठेऊन दिलेल्या वचननाम्याची वचनपूर्ती टप्याटप्याने सुरु केली आहे.सर्वांना विश्वासात घेऊन काटकसरीचा व आदर्शवत असा पारदर्शी कारभार केला जाईल, असे राजेंद्र पाटील व प्रकाश कोकाटे यांनी सांगितले.

# भिशीच्या नावाखाली लाखोंची फसवणूक

**ईश्वरपूर, ता.१३ (प्रतिनिधी)–**

**जय भवानी भिशी मंडळाच्या माध्यमातून अधिक व्याजासह पैसे परत देण्याचे आमिष दाखवून लाखो रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी एका विरुध्द ईश्वरपूर पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे.**

माहितीनुसार, रेटरे धरण (ता.वाळवा) येथील वैशाली सुरज होटकर (वय ४०) यांनी फिर्याद दिली आहे.महेश वसंत पाटील (रा. कामेरी, ता. वाळवा) याने कोणतीही कायदेशीर परवानगी न घेता जय भवानी भिशी मंडळ स्थापन केले. नोव्हेंबर २०२४ ते नोव्हेंबर २०२५ या कालावधीत फिर्यादीसह इतर सभासदांनी भरलेली एकूण ३ लाख ८५ हजार ७०० रुपयांची रक्कम महेश पाटील याने परत न करता फसवणूक केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.अधिक व्याजासह पैसे मिळतील, असे आश्वासन देऊन ही रक्कम स्वीकारण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.



## केन विल्यमसनच्या निवृत्तीनंतर न्यूझीलंड संघात विल यंगला स्थान

लंडन,ता.१३–

**इंग्लंडविरुद्ध सुरू असलेल्या तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील उर्वरित दोन सामन्यांसाठी न्यूझीलंड क्रिकेट संघाने अनुभवी फलंदाज विल यंगचा संघात समावेश केला आहे. संघातील महत्त्वाचा फलंदाज केन विल्यमसन याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला.**

३३ वर्षीय विल यंग १४ जून रोजी इंग्लंडमध्ये दाखल होणार असून सोमवारपासून संघासोबत सरावाला सुरुवात करणार आहे.मालिकेतील पहिल्या कसोटीत इंग्लंडने न्यूझीलंडवर मात करत आघाडी घेतली आहे. आता दुसरा कसोटी सामना १७ जूनपासून ओव्हल मैदानावर खेळवला जाणार असून किवी संघ पुनरागमनाच्या निर्धाराने मैदानात उतरणार आहे. विल यंगने डिसेंबर २०२५ मध्ये आपला अखेरचा कसोटी सामना खेळला होता. २०२० मध्ये कसोटी क्रिकेटमध्ये पदार्पण केलेल्या यंगने आतापर्यंत २३ कसोटी सामने खेळले आहेत. संघातील स्थान कायम राखण्यासाठी त्याला सातत्याने संघर्ष करावा लागला असला तरी, संधी मिळाल्यावर त्याने महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.दरम्यान, निवृत्तीनंतरही केन विल्यमसन काही दिवस संघासोबत राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. संघातील संक्रमणाचा काळ सुरळीत पार पडावा आणि युवा खेळाडूंना मार्गदर्शन मिळावे, यासाठी आपण काही काळ संघासोबत राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# भारताचा अफगाणवर एकतर्फी विजय

## शुभमन गिलची शानदार खेळी : मालिकेत १–० ने आघाडी



धरमशाला,ता.१३ –

**अफगाणिस्तानविरुद्ध पहिल्या वनडे सामन्यात भारतीय क्रिकेट संघाने शनिवारी ७ विकेट्सने दणदणीत विजय मिळवला. भारताने अफगाणिस्तानला पराभूत करत तीन सामन्यांच्या वनडे मालिकेत १–० अशी आघाडी घेतली आहे. भारताच्या विजयात कर्णधार शुभमन गिलसह पदार्पणवीर गुरनूर ब्रार आणि हर्ष दुबे यांनी मोलाचा वाटा उचलला. तसेच केएल राहुलने फिनिशरची भूमिका बजावली. पावसाचा अडथळा आल्याने हा सामना २५–२५ षटकांचा करण्यात आला होता.**

अफगाणिस्तानने भारतासमोर १९५ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग भारताने २२.५ षटकात ३ विकेट्स गमावत विजय मिळवला. भारतासाठी शुभमन गिलने नाबाद अर्धशतकी खेळी केली. भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील तीन वनडे सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना धरमशालेच्या मैदानावर झाला. या सामन्यात आधी पावसाने जोरदार बॅटिंग केली. त्यानंतर पहिल्या डावात फलंदाजी करण्यासाठी आलेल्या अफगाणिस्तानकडून रहमानुल्लाह गुरबाजने अवघ्या ४८ चेंडूंचा सामना करुन दमदार शतकी खेळी केली. या खेळीच्या बळावर अफगाणिस्तानने पहिल्या डावात १९४ धावांपर्यंत मजल मारली. त्यानंतर धावांचा पाठलाग करताना कर्णधार शुभमन गिलची बॅट चांगलीच तळपली. त्याचे शतक थोडक्यात हुकले. पण शेवटपर्यंत टिकून त्याने भारताला हा सामना ७ गडी राखून जिंकून दिला.



पावसामुळे हा सामना सुरु होण्यास बराच उशीर झाला होता. त्यामुळे षटके कमी करण्यात आली. ५:३० ला सामना सुरु झाल्यानंतर प्रत्येकी २५–२५ षटकांचा सामना खेळवण्याचा निर्णय घेण्यात आला. पहिल्या डावात फलंदाजीसाठी आलेल्या अफगाणिस्तानचा डाव अवघ्या १९४ धावांवर आटोपला. भारताला हा सामना जिंकण्यासाठी १९५ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना रोहित शर्मा आणि शुभमन गिलची जोडी मैदानावर आली. या जोडीने पहिल्या विकेटसाठी ४६ धावा जोडल्या.

रोहित अवघ्या १६ धावांवर धावबाद होऊन माघारी परतला. त्यानंतर इशान किशनने ३४ धावांचे योगदान दिले.टी–२० संघाचा कर्णधार बनलेला श्रेयस अय्यर वनडे पदार्पणात फ्लॉप ठरला. त्याने १५ चेंडूत अवघ्या १२ धावा केल्या. त्यांनंतर केएल राहुल आणि शुभमन गिलने मिळून सामना संपवला. गिल ८४ धावांवर नाबाद राहिला. तर केएल राहुल ३९ धावांवर नाबाद राहिला. भारताने हा सामना ७ गडी राखून जिंकला. यासह मालिकेत १–० ने आघाडी घेतली आहे.

या सामन्यात नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या अफगाणिस्तानचा डाव १९४ धावांवर आटोपला.पण अफगाणिस्तानला हवी तशी सुरुवात करता आली नव्हती. इब्राहिम जादरान १, तर सेदिकुल्लाह अटल ० तर रहमत शाह अवघ्या ३ धावा करुन माघारी परतला. कर्णधार हसमतुल्लाह शाहिदीने २७ धावांचे योगदान दिले. सलामीला आलेल्या रमहमानुल्लाह गुरबाजने ५१ चेंडूंचा सामना करत १०२ धावांची खेळी केली. अफगाणिस्तानला सुरुवातीला मोठे धक्के बसले होते. पण त्यानंतर रहमानुल्लाह गुरबाजच्या शतकी खेळीच्या बळावर अफगाणिस्तानने दमदार पुनरागमन केले. पण तो बाद झाल्यानंतर अफगाणिस्तानला हवा तसा शेवट करता आला नाही. अफगाणिस्तानचा संपूर्ण डाव २४.५ षटकात १९४ धावांवर आटोपला.

**कर्णधार शुभमन गिलने स्लिपमध्ये क्षेत्ररक्षण करताना एका हाताने भन्नाट झेल घेतला. अफगाणिस्तानकडून अल्लाह गजनफर स्ट्राईकवर होता. डावखुऱ्या हाताच्या हर्षने राऊंड द विकेटचा मारा करत ऑफ स्टंपच्या बाहेरच्या लाईनवर चेंडू टाकला. अल्लाह गजनफरने या चेंडूवर मोठा फटका मारण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी चेंडू बॅटचा कडा घेऊन वेगाने स्लिपच्या दिशेने गेला. गिलने एका हाताने डाईव्ह मारुन भन्नाट झेल घेतला.**



### रोहित शर्माने घडवला इतिहास!

दरम्यान, या सामन्यासाठी मैदानात उतरताच रोहित शर्माच्या नावे मोठ्या रेकॉर्डची नोंद झाली आहे. रोहित शर्मा हा भारतासाठी वनडे क्रिकेट खेळणारा सर्वात वयस्कर खेळाडू ठरला आहे. त्याने माजी भारतीय क्रिकेटपटू मोहिंदर अमरनाथ यांचा रेकॉर्ड मोडून काढला आहे. मोहिंदर अमरनाथ यांनी जेव्हा हा रेकॉर्ड आपल्या नावावर केला होता. त्यावेळी त्यांचे वय ३९ वर्ष आणि ३६ दिवस इतके होते. आता रोहितने हा रेकॉर्ड मोडून काढला आहे. भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील पहिल्या वनडे सामन्यावेळी रोहितचे वय ३९ वर्ष आणि ४४ दिवस इतके आहे.



## काव्या मारनच्या सनरायझर्स लीड्स संघाची धुरा जॅक क्राउलीकडे

लंडन,ता.१३–

**इंग्लंडच्या द हंड्रेड स्पर्धेत काव्या मारन यांची मालकी असलेला सनरायझर्स लीड्स हा संघ खेळतो. इंग्लंडच्या २८ वर्षीय स्टार फलंदाज जॅक क्राउली यांच्या खांद्यावर या संघाच्या कर्णधारपदाची जबाबदारी सोपवली आहे. यापूर्वी संघाची धुरा हॅरी ब्रूकच्या खांद्यावर होती.**

हॅरी ब्रूक या संघात एक फलंदाज म्हणून असेल. जबाबदारीतून मुक्त केल्याने हॅरी ब्रूकला मोकळेपणाने फलंदाजी करता येणार आहे. आता जॅक क्राउलीच्या नेतृत्वात संघ नव्या पर्वात कशी कामगिरी करतो याकडे लक्ष असणार आहे. त्याच्या खांद्यावर संघाला जेतेपद मिळवून देण्याची जबाबदारी असणार आहे. जॅक क्राउलीने द हंड्रेड स्पर्धेत आतापर्यंत २३ सामने खेळले आहे. त्यात ३० च्या सरासरीने ५४० धावा केल्या आहेत. चेन्नईच्या भारतीय मिडिया समूह असलेल्या सन ग्रुपने गेल्या वर्षी नॉर्दन सुपरचार्जर्सला ११५५ कोटी रुपयांना खरेदी केले होते.यॉर्कशायरने ईसीबीच्या ४९ टक्के हिश्श्याव्यतिरिक्त, सुपरचार्जर्समधील आपला ५१ टक्के हिस्सा विकण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे सन ग्रुपचा या कंपनीवर १००टक्के मालकी हक्क आहे.

# भारत आज पाकशी भिडणार

## महिला टी–२० विश्वचषकातील सलामीची लढत

बर्मिंगहॅम,ता.१३ –

**आयसीसी टी–२० विश्वचषक स्पर्धेतील गट १ मध्ये भारताचा सामना कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानशी रविवारी होईल. या जागतिक स्पर्धेत भारत आणि पाकिस्तान यांच्यात कोणतीही स्पर्धात्मक चुरस दिसत नाही. या संघाविरुद्ध भारताची कामगिरी चांगली आहे, पण हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील संघ कोणतीही चूक न करता विजय मिळवण्यासाठी प्रयत्नशील असणार आहे.**

भारत आणि पाकिस्तान यांच्यात आतापर्यंत १६ टी–२० सामने खेळले गेले आहेत. भारतीय महिला संघाने १३ सामने जिंकले आहेत, तर पाकिस्तानने तीन सामने जिंकले आहेत. टी–२० विश्वचषकातील दोन्ही संघांमधील सामन्यांबद्दल विचार केला, तर ते आठ वेळा हे संघ आमनेसामने आले आहेत.भारताने सहा वेळा विजय मिळवला आहे, तर पाकिस्तानने केवळ दोन वेळा विजय संपादन केला आहे. २०२४ च्या टी–२० विश्वचषकातही



भारत आणि पाकिस्तान यांच्यात सामना झाला होता. या सामन्यात भारतीय महिला संघाने सहा गडी राखून विजय मिळवला होता.

भारतीय संघाकडून पाकिस्तानविरुद्ध सलामीवीर स्मृती मानधना आणि शफाली वर्मा यांच्याकडून एका भक्कम सुरुवातीची अपेक्षा असेल. फेब्रुवारीमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध ८२ धावा केल्यानंतर, मानधनाने पुढील सहा सामन्यांमध्ये १३, १२, ३७, ०, ३२ आणि ८ धावा केल्या. शफालीने जोहान्सबर्गमध्ये ६४ धावा केल्यानंतर, पुढील पाच सामन्यांमध्ये ९, ४, २, २२ आणि ११ धावा केल्या. हरमनप्रीत कौरने दक्षिण आफ्रिका आणि इंग्लंडविरुद्ध अर्धशतके झळकावून पुनरागमन केले होते. जेमिमा रॉड्रिग्ज, रिचा घोष आणि भारती फुलमाली यांच्यावरही धावा करण्याची जबाबदारी असेल.

भारत या सामन्यासाठी भारतीला अंतिम ११ क्रिकेटपटूंमध्ये स्थान देण्याची शक्यता आहे.गेल्या वर्षी एकदिवसीय विश्वचषक जिंकणाऱ्या हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली, भारत सलग दुसऱ्या आयसीसी विजेतेपदाच्या शोधात आहे. पाकिस्तानविरुद्धही भारताची कामगिरी उत्कृष्ट राहिली आहे. ही लय कायम ठेवणे संघासाठी फायदेशीर ठरेल. भारताच्या पहिल्या सामन्यातील विजयामुळे त्यांचे मनोधैर्य वाढेल.

**भारतीय संघ एका कठीण गटात आहे, ज्यात ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिकेसारखे बलाढ्य संघ आहेत. भारतासाठी दिलासादायक बाब ही आहे की, गेल्या वर्षीच्या एकदिवसीय विश्वचषक विजेत्या संघातील बहुतेक क्रिकेटपटू या टी–२० विश्वचषक संघातही आहेत. भारतीय संघ आपल्या अंतिम ११ क्रिकेटपटूंमध्ये मोठे बदल करण्याची शक्यता कमी आहे.**

## इंग्लंड संघाच्या साहित्याची चोरी; सुरक्षेवर प्रश्नचिन्ह

वॉशिंग्टन,ता.१३ –

**२०२६ फिफा विश्वचषक अमेरिका, मेक्सिको आणि कॅनडा येथे सुरू झाला असून, चाहते फुटबॉल सामन्यांचा आनंद घेत असतानाच अमेरिकेत व्हिसा आणि फुटबॉलपटूंच्या तपासणीसंदर्भात समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यातच विश्वचषक सामन्यांसाठी अमेरिकेत आलेल्या इंग्लंड फुटबॉल संघाच्या स्टार फुटबॉलपटूं बूट आणि मॅच बॉल चोरीला गेले आहेत.**



इंग्लंडचा पहिला सामना १८ जून रोजी डॅलस येथील एटी अँड टी स्टेडियमवर ग्रुप एल मधीलच क्रोएशिया संघाविरुद्ध होईल. ही घटना तेव्हा घडली, जेव्हा संघाचे साहित्य फ्लोरिडामधील त्यांच्या स्पर्धेपूर्वीच्या तळावरून मिसूरीमधील स्वूप सॉकर व्हिलेजमध्ये नेले जात होते. चोरीला गेलेल्या वस्तूंमध्ये इंग्लंडच्या काही प्रमुख फुटबॉलपटूंच्या बुटांचा समावेश होता. या तपासाच्या संदर्भात दोन जणांना ताब्यात घेण्यात आल्याचे सांगितले. इंग्लंड फुटबॉल असोसिएशनने स्पर्धेसाठी विस्तृत लॉजिस्टिकल योजना तयार केली होती. मात्र, या चोरीमुळे संघाच्या सपोर्ट स्टाफसमोर एक मोठे आव्हान उभे राहिले आहे.

## दोहा डायमंड लीगमधून नीरजची माघार

नवी दिल्ली,ता.१३–

**भारताचा स्टार भालाफेकपटू नीरज चोप्रा १९ जून रोजी होणाऱ्या दोहा डायमंड लीगमध्ये सहभागी होणार नाही. ऑलिम्पिक सुवर्ण आणि रौप्य पदक विजेता असलेला चोप्रा सध्या पाठीच्या दुखापतीतून सावरत असून, त्याने या प्रतिष्ठित स्पर्धेतून माघार घेतली आहे.**



नीरज चोप्रा सध्या स्वित्झर्लंडमधील बिएन येथे ४७ दिवसांच्या ऑफ–सीझन प्रशिक्षण शिबिरात सहभागी झाला आहे. त्याच्यासोबत त्याचे दीर्घकाळचे फिजिओथेरपिस्ट ईशान मारवाह आणि प्रशिक्षक जय चौधरी आहेत. आगामी राष्ट्रकुल आणि आशियाई खेळांवर लक्ष ठेवून नीरज आपल्या तंदुरुस्तीवर काम करत आहे. गेल्या वर्षी, नीरजने दोहा डायमंड लीगमध्ये आपल्या कारकिर्दीतील पहिला ९० मीटरपेक्षा जास्त भालाफेक करून ९०.२३ मीटरचा राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित केला होता. तथापि, जर्मनीच्या ज्युलियान वेबरने आपल्या अंतिम प्रयत्नात ९१.०६ मीटर भालाफेक करून ही स्पर्धा जिंकली होती.

नीरजच्या अनुपस्थितीमुळेही, दोहा डायमंड लीगमधील पुरुषांची भालाफेक स्पर्धा अत्यंत रोमांचक होण्याची अपेक्षा आहे. श्रीलंकेचा जागतिक क्रमवारीत अव्वल असलेला रोमेश थरंगा पाथिरागे, पाकिस्तानचा ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेता अर्शद नदीम आणि त्रिनिदाद व टोबॅगोचा विश्वविजेता केशॉर्न वॉलकॉट हे मुख्य आकर्षण असतील. ग्रेनेडाचा माजी विश्वविजेता अँडरसन पीटर्स, अमेरिकेचा विश्व कांस्यपदक विजेता कर्टिस थॉम्पसन, केनियाचा अनुभवी ज्युलियस यिगो आणि झेक प्रजासत्ताकचा याकूब हे देखील स्पर्धेत सहभागी होतील.

## सिंधूचे आव्हान संपुष्टात



सिडनी,ता.१३–

**दोन वेळची ऑलिम्पिक पदक विजेती पीव्ही सिंधूची ऑस्ट्रेलियन ओपन २०२६ मधील प्रभावी वाटचाल उपांत्य फेरीतच संपुष्टात आली. महिला एकेरीच्या सामन्यात जपानच्या विद्यमान विश्वविजेत्या अकाने यामागुचीने तिला २२–२०, २१–१२ असे पराभूत केले.सिंधूने सामन्याची जोरदार सुरुवात केली आणि पहिल्या गेममध्ये बहुतांश वेळ आघाडी कायम ठेवली. पण, यामागुचीने सावध पुनरागमन करत सामना ड्यूसपर्यंत नेला आणि अखेरीस पहिला गेम जिंकला.**

पहिल्या गेममधील विजयामुळे मिळालेला वेग जपानी खेळाडूने दुसऱ्या गेममध्येही कायम ठेवला. सिंधूने सुरुवातीलाच आघाडी घेतली, परंतु त्यानंतर यामागुचीने सातत्याने गुण मिळवत १८–९ अशी भक्कम आघाडी घेतली. अखेरीस सिंधूचा शॉट नेटमध्ये गेल्याने सामना संपला. सिंधूने यापूर्वी उपांत्यपूर्व फेरीत चायनीज तैपेईच्या चेन सु–यूला अवघ्या २७ मिनिटांत २१–६, २१–९ असे पराभूत करून अंतिम चारमध्ये प्रवेश केला होता.

जागतिक क्रमवारीत १०व्या स्थानावर असलेल्या सिंधूची २०२६ च्या बीडब्ल्यूएफ वर्ल्ड टूर हंगामातील ही दुसरी उपांत्य फेरी होती. यापूर्वी ती जानेवारीमध्ये मलेशिया ओपनच्या अंतिम चारमध्ये पोहोचली होती. सिंधू या स्पर्धेच्या माध्यमातून सय्यद मोदी इंटरनॅशनल २०२४ नंतरचे आपले पहिले बीडब्ल्यूएफ वर्ल्ड टूर विजेतेपद मिळवण्याच्या प्रयत्नात होती. जरी तिचा विजेतेपदाचा प्रवास तिथेच संपला असला तरी, तिची उपांत्य फेरी गाठणे हे या हंगामात तिच्या सुधारत असलेल्या फॉर्मचे लक्षण मानले जात आहे.

## वर्ल्ड योगासन चॅम्पियनशिपमध्ये प्रांजल व्हन्नाला दोन सुवर्णपदके

सोलापूर,ता. १३–

**पहिल्या वर्ल्ड योगासन चॅम्पियनशिप २०२६ स्पर्धेत सोलापूरच्या प्रांजल सोमनाथ व्हन्ना हिने भारताचे प्रतिनिधित्व करत दोन सुवर्णपदके पटकावून जागतिक स्तरावर देशाचा तिरंगा अभिमानाने फडकावला.**

अवघ्या १५ व्या वर्षी प्रांजलने आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, खेलो इंडिया, राज्य आणि जिल्हास्तरीय स्पर्धांमध्ये ४० हून अधिक पदके जिंकण्याचा मान मिळवला आहे. तिच्या पदकांमध्ये सुवर्णपदकांची संख्या सर्वाधिक असून ती महाराष्ट्रातील उदयोन्मुख योगासनपटूंमध्ये अग्रस्थानी मानली जाते. प्रांजलने वयाच्या पाचव्या वर्षापासून रिदमिक जिम्नॅस्टिकमध्ये कारकीर्द सुरू केली. २०१६ ते २०२१ या कालावधीत तिने जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर अनेक पदके जिंकली.

प्रांजलने 'खेलो इंडिया युथ गेम्स'मध्ये सलग चार वर्षे पदके जिंकण्याचा विक्रम केला आहे. बिहार येथे झालेल्या खेलो इंडिया २०२५–२६ स्पर्धेत तिने दोन सुवर्ण आणि एक रौप्य पदक मिळवले.आशियाई योगासन स्पर्धेतही तिने भारताचे प्रतिनिधित्व केले होते.